# पाण्यातले दिवस

प्रल्हाद जाधव

## भाग एक

तसे दिवस, असे दिवस…

———

एक

रायगड जिल्ह्यातील पोलादपूर हे माझे गाव. तेथील सावित्री नदीमध्ये डुंबण्यात आणि मासेमारी करण्यात माझे बालपण गेले. त्या दिवसांच्या आठवणी 'पाण्यातले दिवस' या माझ्या पुस्तकात आल्या आहेत. हे पुस्तक प्रसिद्ध होऊन आता जवळपास ३० वर्षे पूर्ण झाली आहेत.
'राजहंस'ने प्रसिद्ध केलेल्या या अगदी छोट्या म्हणजे जेमतेम ६५ पानांच्या पुस्तकाने मला उत्तम प्रसिद्धी, अनेक चाहते मिळवून दिले. आज इतक्या वर्षांनंतरही मला अधुन-मधून कौतुकाचे एखादे पत्र येते, एखाद्या वाचकाचा खुशीचा फोन येतो. कुठेतरी त्या पुस्तकाचा गौरवपूर्ण उल्लेख होतो आणि मी पुनःपुन्हा आनंदाचा धनी होत राहतो. अगदी खरे सांगायचे तर पोलादपूर, सावित्री नदी आणि त्याला जोडून येणारे माझे नाव पाहून मला स्वतःचा अभिमान वाटतो, धन्य वाटते. लेखकाला यापेक्षा दुसरे काय हवे?

या पुस्तकाची दुसरी आवृत्ती का येत नाही, असे मला अनेक जण विचारत. त्यासाठी मागे लागत. सुप्रसिद्ध साहित्यिक आणि माझे मित्र भारत सासणे अनेक वर्षांपासून दुसऱ्या आवृत्तीचा आग्रह धरत होते. 'लाईफ ऑन मिसीसीपी' या मार्क ट्वेन यांच्या पुस्तकाचे उदाहरण ते मला देत. ते द्विखंडात्मक जगप्रसिद्ध पुस्तक. लहानपणी ट्वेन यांनी मिसीसीपी नदीवर केलेली भ्रमंती आणि मोठे झाल्यानंतर पुन्हा त्याच मार्गाने केलेल्या दुसऱ्या भ्रमंतीचे मनोवेधक वर्णन त्यात आले आहे. तुम्हीही त्याच धर्तीवर तुमचे अनुभव नव्याने सांगायला हवेत असा सासणे यांचा आग्रह असायचा.

'पाण्यातले दिवस' या पुस्तकाला १९९३ साली महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट ललित गद्याचा पुरस्कार मिळाला. सुप्रसिद्ध ललित लेखक रवींद्र पिंगे त्या पुरस्कार समितीचे अध्यक्ष होते. अर्थात् हे मला नंतर समजले. एकदा पिंग्यांची भेट झाली तेव्हा या पुस्तकाला पुरस्कार द्यावासा का वाटला,  असे मी त्यांना विचारले. ते म्हणाले "मासे खाण्याविषयी आणि माशांच्या पाककृतींविषयी माहिती देणारी अनेक पुस्तके मराठीत आहेत पण मासेमारीविषयी ललित अंगाने माहिती देणारे हे पहिलेच पुस्तक आहे."  त्यांच्या या उत्तराने मी सुखावलो होतो…

भारतीय नौदलाचे प्रमुख ॲडमिरल जयंत नाडकर्णी यांना हे पुस्तक आवडले होते. अर्थात ही ऐकीव माहिती! त्यांना भेटायची संधी कधी मिळाली नाही. माझे एक आवडते लेखक मारुती चितमपल्ली यांना एकदा नागपुरात भेटायला गेलो. त्या पहिल्याच भेटीत, "तुमचे 'पाण्यातले दिवस' मी वाचले आहे आणि ते माझ्या संग्रही आहे" असे  सांगून त्यांनी मला आश्चर्याचा धक्का दिला होता.

पुण्यात कोथरूडजवळ पिरंगुट येथे राणी लक्ष्मीबाई मुलींचे सैनिकी स्कूल आहे. तेथील आठवीच्या वर्गातील ३०,३५ मुलींनी मला एकाच वेळी स्वतंत्र पत्रे पाठवून ते पुस्तक का आवडले ते कळवले होते. पुस्तकाची निर्मिती आणि त्याच्या लेखन प्रक्रियेविषयी अनेक प्रश्न त्यांनी विचारले होते. त्यांच्या वर्गात या पुस्तकाचे जाहीर वाचन झाले असणार हे उघडच होते!

पुण्यामध्ये फायबरच्या बोटी तयार करणाऱ्या कंपनीतील एक वरिष्ठ अधिकारी ह्या पुस्तकाच्या प्रेमात होते. (मी त्यांचे नाव विसरलो.) फायबरची एक छोटी होडी तयार करून द्याल का; त्या होडीतून मला सावित्री नदीत फिरायचे आहे असे मी त्यांना विचारले होते. लोक आपल्या घरासमोर गाड्या लावतात, मोटरसायकली लावतात. आपल्या घरासमोर होडी असावी असे मला वाटायचे.

मुंबईतील व्हीजेटीआयचे निवृत्त प्रोफेसर प्रभाकर अच्युत केणी यांनी माझ्याशी ओळखदेख नसताना एकदा  मला फोन केला. ते म्हणाले, " तुमचे 'पाण्यातले दिवस' हे पुस्तक मी उशाला घेऊन झोपतो. रोज त्याची पूजा करतो. रोज त्यातील एखादे प्रकरण वाचतो."  ते माझी चेष्टा करत आहेत अशी मला खात्री वाटत होती. मी त्यांची बरीच उलट तपासणी घेतली. नंतर लक्षात आले की हा माणूस खरे बोलत आहे! पाणी आणि मासे हा एरवीही त्यांच्या आवडीचा विषय! एकदा ते पोलादपूरला गेले. त्यांच्या एका नातेवाईकासोबत सावित्रीवर फिरून आले. पुस्तकातील मजकुराच्या सत्यासत्यतेची त्यांनी प्रत्यक्ष पडताळणी करून घेतली. अर्थात् हे मला नंतर कळले. अशा तऱ्हेने व्हीजेटीआयमधील एका विद्वान प्रोफेसराने जणू परीक्षा घेऊन मला विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण केले होते!

पुस्तक प्रकाशित होऊन तीस वर्षांचा काळ लोटल्यानंतर केणीसरांनी मला लिहिलेले पत्र जसेच्या तसे मी या पुस्तकाच्या शेवटी दिले आहे. आपला असा एखादा चाहता असू शकतो हा दिलासा लेखकांप्रमाणेच साऱ्याच कलावंतांना या पत्रामुळे मिळू शकेल असे मला वाटते. येथे भवभुतीचे ते सुप्रसिद्ध वचन उद्धृत केल्याशिवाय राहवत नाही. त्याने म्हटले आहे : 'कालो ह्ययं निरवधिः विपुलाच पृथ्वी...' काळ अनंत आहे आणि पृथ्वी विपुल आहे, तुमचा एखादा समानधर्मा तुम्हाला कधी ना कधी कुठे ना कुठे भेटणारच आहे!

तर वेगवेगळ्या वयोगटातील, वेगवेगळ्या स्तरातील अनेक वाचक आपापल्या परीने या पुस्तकाविषयी आजही अधुन-मधून प्रतिक्रिया व्यक्त करत असतात. माझे कौतुक करत असतात. अगदी ताजे उदाहरण सोलापूर येथील डॉ. गीता जोशी आणि डॉ. सुलेखा आराध्ये यांचे. त्या पुस्तकातील काही भागांच्या अभिवाचनाचा एक जाहीर कार्यक्रम त्यांनी सोलापुरातील त्यांच्या मित्रमंडळीसाठी केला. त्यातील ५० मिनिटांचा संकलित भाग रसिकांसाठी युट्युबवर उपलब्ध करून दिला. वाचनाच्या परवानगीसाठी त्यांनी मला फोन केला तेव्हा मला खूप आश्चर्य वाटले. दोघीही मराठीच्या निवृत्त प्राध्यापक! "कशाला मासेमारीवरील पुस्तकाच्या भानगडीत पडता?" असे मी त्यांना विचारले. पण त्यांनी ऐकले नाही. अर्थात् त्यांना पुस्तक आवडल्याची ती पावती होती!

जानेवारी २०२४ मध्ये पुण्याला 'रा.चिं. ढेरे केंद्रा'मार्फत झालेल्या 'सरिता संमेलना'त प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना भारत सासणे यांनी या पुस्तकाचा आवर्जून उल्लेख केला. नद्यांविषयी साहित्यिक अंगाने भाष्य करणाऱ्या

मराठीतील मोजक्या पुस्तकांविषयी ते बोलत होते. मला ते खूप अभिमानास्पद वाटले. मी पुन्हा विचारात पडलो. दुसरी आवृत्ती काढा असे ते सारखे म्हणत होते त्याची आठवण झाली.

खरेतर मला जे काही सांगायचे होते ते आधीच सांगून झाले आहे. आता नव्याने आणखी काय सांगणार असा प्रश्न होता.पण हो नाही करता करता, हे पुस्तक मी कसे लिहिले आणि त्यानंतर पुढील ३०-३५ वर्षांत त्या अनुषंगाने माझ्या भावविश्वात काय काय बदल झाले याची कहाणी सांगता येईल असे माझ्या लक्षात आले. आणि म्हणूनच आता पुन्हा या लेखनाच्या निमित्ताने तुमच्यासमोर येत आहे.

***

दोन

'पाण्यातले दिवस'या पुस्तकाचे लेखन माझ्या हातून कसे झाले, आणि ते प्रसिद्ध कसे झाले याविषयी थोडे सांगतो.

नाशिक येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून रुजू झालो तेव्हा तेथे विनायकदादा पाटील यांच्याशी ओळख झाली. हळूहळू दोस्ती झाली. तो माणूस तसा जगन्मित्रच होता.
महाराष्ट्रातील दिग्गज साहित्यिकांशी त्यांची उठबस होती.
आमची भेट झाली की मी नवीन काय लिहीत आहे याविषयी ते आठवणीने विचारणा करीत. 'पाण्यातले दिवस'चा कच्चा आराखडा आणि त्यातील काही भाग माझ्याकडे आधीच लिहून तयार होता. त्याविषयी मी कधीतरी त्यांच्याशी बोललो आणि विसरून गेलो. एक दिवस त्यांचा फोन आला. ते म्हणाले, "मी माजगावकरांशी (श्री.ग.) बोललो आहे. 'पाण्यातले दिवस' ते माणूसच्या दिवाळी अंकात छापत आहेत; त्यांना स्क्रिप्ट पाठवून द्या!"

माझी चांगलीच अडचण झाली. कारण तोवर त्या लेखनाला काही खास आकार आलेला नव्हता. माझ्या गतीने आणि माझे समाधान होईल अशा पद्धतीने ते व्यवस्थित लिहून काढायचे तर त्याला किती वेळ लागेल हे सांगता येत नव्हते. दरम्यान माझी जळगावला बदली झाली. कामाचा व्याप वाढला. दिवाळी जवळ येत होती तसतसे माझे टेन्शन वाढत चालले होते. शेवटी 'आपल्याला हे जमत नाही' असे सांगण्यासाठी एकदा माजगावकरांना फोन लावला. फोनवर माझे नाव सांगताच ते म्हणाले, "अहो स्क्रिप्ट लवकर पाठवा, वाट पहात आहे, अंकाची पाने राखून ठेवली आहेत." मला काही बोलण्याची संधी न देता त्यांनी फोन बंद केला. आपण जणू एखाद्या भोवऱ्यात सापडून अधिक खोलात गरगरत चाललो आहोत असे मला वाटू लागले. काही दिवाळी अंक तोवर बाजारात दाखलही झाले होते. आणि तरीही श्री.ग. आपल्यावर इतका विश्वास दाखवत आहेत आणि आपल्या लेखनाची वाट पाहत आहेत याचे मला आश्चर्य वाटत होते.

मग तो कच्चा आराखडा आणि कोऱ्या कागदाची चळत समोर घेऊन मांडी ठोकून बसलो. जे काही सांगायचे होते झपाझप लिहून काढले. आणि सुमारे ऐंशी-नव्वद पानांचे ते बाड व्यवस्थित एका पाकिटात बंद करून श्री.ग.ना पाठवून दिले. चार-पाच दिवसांनी घाबरत घाबरत त्यांना फोन लावला. 'कसे झाले आहे' हे विचारायचे होते. पण मला काही बोलू न देता ते म्हणाले "तुमच्या लिखाणातील फक्त पहिला परिच्छेद वाचला आणि मी ते जसेच्या तसे

कंपोजसाठी सोडून दिले!" एवढ्या मोठ्या संपादकाचे असे सर्टिफिकेट कधी आपल्याला मिळेल असे मला वाटले नव्हते. मी खुश झालो. यात थोडा नशिबाचा भागही असणार याची मला जाणीव होती. Luck is smiling on you...असे का म्हणतात आणि लेखकाला त्याची गरज का असते हे लक्षात आले!

माणूस च्या ८८-८९ चा दिवाळी अंकात 'कव्हर स्टोरी' म्हणून 'पाण्यातले दिवस' सुंदर रेखाटनांसह प्रसिद्ध झाले. मुखपृष्ठावर पाण्याच्या लाटा आणि एका कोपऱ्यात पाण्यात गळ टाकून बसलेला एक छोटा मुलगा असे चित्र होते. अर्थात् मला ते खूप आवडले... एकदाचे लिहून झाल्यामुळे आणि ते नीट प्रसिद्ध झाल्यामुळे मोकळे मोकळे वाटत होते. आता ते लेखन आपले राहिले नाही असा एक उदात्त भावही मनात उदयाला येत होता. 'आपण त्याचे पुस्तक काढू' असे श्री.ग. म्हणाले होते आणि त्यांचा तो शब्द पुढे दिलीप माजगावकरांनी पाळला.

अवघ्या पासस्ट पानांचे, तीस रुपये किमतीचे हे छोटुकले पुस्तक 'राजहंस'तर्फे यथावकाश प्रसिद्ध झाले. १९९३ सालचा महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट ललित गद्याचा पुरस्कारही त्यास मिळाला. मला आठवते अकराशे प्रती काढल्या होत्या. पुस्तकाला उठाव नव्हता पण दरवर्षी नियमितपणे प्रतींचा हिशेब आणि मानधन येत होते. एक दिवस अचानक 'राजहंस'कडून शिल्लक पंधरा-वीस प्रतींचे पार्सल आणि एक पत्र आले. 'आमच्या ग्रंथव्यवहारातून या पुस्तकाला आम्ही आता निरोप देत आहोत' अशा आशयाचे ते पत्र होते. मी निर्विकारपणे ते वास्तव स्वीकारले आणि नेहमीच्या कामाला लागलो...

***

तीन

या लेखनाची थोडी पार्श्वभूमी आणि आणखी काही तपशील समजून घेणे योग्य होईल. १९७९ मध्ये मी मुंबईत एम.ए. करत होतो. विषय अर्थात् मराठी साहित्य! दुर्गा भागवत यांचे ललित लेखन आणि त्यांनी अनुवादित केलेले थोरोचे साहित्य तेव्हा आवडीने वाचत होतो. दरम्यान एकदा श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांचे 'डोह' हाती आले. ते वाचून मला वाटले की, आपल्यालाही असे काहीतरी सांगायचे आहे. ते वाटणे हळूहळू प्रबळ होत गेले. जणू आतून काहीतरी उचंबळून बाहेर येऊ पाहत होते. मग मी जसे सुचेल तसे लिहायला सुरुवात केली. गंमत म्हणजे लेखनाच्या जोडीने त्याला साजेशी रेखाचित्रे काढू लागलो. चित्रकलेशी माझा काहीही संबंध नाही तरीही मला चित्रे काढावीशी का वाटली हे कोडे अजूनही उलगडत नाही. ते बाड काही वर्षे माझ्याकडे पडून होते. मी अधून मधून ते काढून पहात असे आणि पुन्हा बाजूला ठेवून देत असे.

'माणूस'च्या दिवाळी अंकाच्या निमित्ताने या विषयाने पुन्हा डोके वर काढले तेव्हा मी ते कागद बाहेर काढून त्या मजकुरावर एक नजर टाकली. त्याचा अधिक गंभीरपणे विचार करू लागलो. आपण देत असलेली माहिती शास्त्रीयदृष्ट्या बरोबर आहे की नाही हे तपासून घ्यावे असे मनात आले. तोवर माझी जळगावला बदली झाली होती.सुदैवाने तेव्हा जळगावला सुनील कुलकर्णी नावाचे 'जिल्हा मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी' कार्यरत होते. अतिशय संवेदनशील आणि या विषयातील तज्ज्ञ माणूस! मी त्यांच्याकडे जाऊन बसू लागलो. त्यांच्याशी गप्पा करू

लागलो. माझ्या शंका त्यांना विचारू लागलो. त्यांनी मला त्यांच्याकडील काही महत्त्वाचे संदर्भ उपलब्ध करून दिले. प्रत्यक्ष चर्चेत हवी ती माहिती दिली. ती मी लेखनाशी पडताळून पाहू लागलो. त्यांनी दिलेल्या संदर्भांची खातरजमा करून घेण्यासाठी इतरही काही वाचू लागलो. विविध कोशांतील माहिती चाळू लागलो. आवश्यक त्या सुधारणा, दुरुस्त्या करू लागलो. आपण योग्य दिशेने चाललो आहोत हे लक्षात आले आणि मग मी निवांत झालो. सुनील कुळकर्णी यांची भेट झाली नसती तर या लेखनाला वजन प्राप्त झाले नसते हे नक्की! म्हणूनच मी या पुस्तकात अगदी पहिल्या पानावरच त्यांच्याविषयीची  कृतज्ञता व्यक्त केली आहे.

खोटे, अतिशयोक्त किंवा वाचकाची फसवणूक होईल असे काहीही मला लिहायचे नव्हते. म्हणून लेखनाच्या प्रारंभीच 'कल्पनेचा एक डोळा उघडा ठेवून हे मी लिहिले आहे.' असे स्पष्ट केले आहे. आणि खरेच होते ते! कारण पाण्याखालचे जग जाणून घ्यायचे तर तेव्हा तशी काही साधनसामग्री उपलब्ध नव्हती. माझ्याकडे होडी नव्हती, काचेची पाणबुडी नव्हती, ग्लास-मास्क नव्हता की ऑक्सिजन सिलेंडरही नव्हता. एक-दीड मिनीट श्वास रोखून पाण्याखालची नदी जेवढी निरखता येईल तेवढी निरखणे एवढेच माझ्या हाती होते. अर्थात् तेही त्यावेळी माझ्याकडून नकळतपणे होत होते. आपण यावर पुढे काही लिहिणार आहोत याची तेव्हा मला अजिबात कल्पना नव्हती. जमेची बाजू म्हणजे माझी कल्पनाशक्ती आणि काहीतरी नवी गोष्ट सांगण्याची तीव्र इच्छा! पुढे अनेक वर्षांनी मी तांबट पक्षावर एक पुस्तक लिहिले; तेव्हाही पक्षिनिरीक्षणाची कोणतीही साधने वापरावी लागली नाहीत याचा मला येथे उल्लेख करावासा वाटतो.

आता परिस्थिती खूप बदलली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान  वेगाने पुढे गेले आहे. माशांचे जनन-मरण, जलावरणातील सूक्ष्म व्यवहार. पशुपक्षी, कीडा-मुंगी, फुलपाखरे, जंगले, नद्या, समुद्र, आकाश यांविषयीचे तपशील कॅमेऱ्याने अचूक टिपून जसेच्या तसे जगासमोर मांडणे सहजशक्य झाले आहे. त्यामुळे लेखकाने अशा प्रकारच्या लेखनात आता कल्पनेच्या भराऱ्या मारणे शहाणपणाचे राहिले नाही. उलट ते त्याच्या मर्यादा उघड करण्यासारखेच झाले आहे.

मी लिहीत असताना माझी कल्पनाशक्ती लढवत होतो त्यामुळे काही ठिकाणी अतिशयोक्ती किंवा सत्याचा विपर्यास झाला असेल याची मला आजही जाणीव आहे. पण वाचकांनी अशा तपशीलाकडे दुर्लक्ष करून मी सांगत असलेल्या गोष्टीत अधिक आनंद घेतला असे लक्षात येते. नदीत डुंबणारा आणि मासेमारी करणारा तो भाबडा मुलगा वाचकांना खूप आवडला हे स्पष्टच होते. हा अर्थात् वाचकांच्या मनाचा मोठेपणा म्हणायला हवा. विद्यापीठीय संस्कार न झालेल्या त्यांच्या निर्मळ अभिरुचीचे ते लक्षण होते. हा गरीब भाबडा मुलगा पुढे एका चित्रपटकथेचा नायक होईल असे जर कोणी मला तेव्हा सांगितले असते तर मी त्याला वेड्यात काढले असते.

***

चार

दुसऱ्या आवृत्तीसाठी प्रकाशकांना विनंती करावी असे ठरवले तेव्हा तीत आपण नवे काय सांगणार आहोत याचा आधी विचार करू लागलो. 'सांगू शकलो नाही' अशा काही गोष्टी या लेखनात मागे राहिल्या आहेत का याचा शोध घेऊ लागलो. सावित्रीविषयी किंवा मासेमारी करणाऱ्या 'त्या मुलाच्या' कौटुंबिक जीवनातील काही महत्त्वाचे दुवे सुटले आहेत का, काही चुकीची माहिती दिली गेली आहे का याचा विचार करीत होतो.

कृष्णा, कोयना, वेण्णा, सावित्री आणि सरस्वती या नद्या महाबळेश्वरमधून उगम पावतात असा उल्लेख मी मूळ संहितेत केला होता. पण तेथे सरस्वतीऐवजी गायत्री असे  असायला हवे होते. (ती दुरुस्ती दुसऱ्या आवृत्तीत केली आहे.) अलिकडे पुण्यात झालेल्या सरिता संमेलनात प्रा. प्रणव गोखले यांनी दिलेल्या व्याख्यानामुळे हे लक्षात आले. पुराणकथेतील एका संदर्भानुसार महाबळेश्वर येथील एका यज्ञविधीसाठी सावित्री उशिरा पोहोचली, ती पोहोचायच्या आधीच यज्ञाची कार्यवाही सुरू झाल्यामुळे ती चिडली आणि तिने देवांना शाप दिला. तेथून कृष्णा, वेण्णा, कोयना, गायत्री (कृष्णेची उपनदी) पश्चिमेला वाहत गेल्या आणि सावित्री 'आपल्याला गृहीत धरणाऱ्या देवांचे तोंड पाहणे नको' म्हणून उत्तरवाहिनी झाली...

अतिबल आणि महाबल नावाचे दोन राक्षस होते. त्यातील महाबल राक्षसाचा शंकराने वध केला; असा एक संदर्भ प्रा. गोखले यांच्या व्याख्यानात येतो. पोलादपूरच्या बाजूला कापडे गावाजवळ सावित्री नदीच्या काठी महाबळ नावाचे ठिकाण आहे. तेथे असणारे शंकराचे देऊळ आणि महाशिवरात्रीला तेथे भरणारी जत्रा प्रसिद्ध आहे. ते व्याख्यान ऐकून हा संदर्भ आठवला. डोक्यात वीज चमकावी तसे झाले. महाबळ राक्षस, त्याचा वध करणाऱ्या शंकराचे तेथील देऊळ आणि सावित्री नदी ह्या तिघांना एकत्र आणणारा अतिशय बोलका असा तो संदर्भ! पुराणकथांकडे पाहण्याचा माझा आधीचा दृष्टिकोन शंकेखोर स्वरूपाचा होता. पण  हळूहळू त्यांकडे मी अधिक मोकळेपणाने आणि उदार वृत्तीने पाहू लागलो. हा मोकळेपणा एरवीच्या जगण्यातही मी स्वीकारू लागलो आहे असे लक्षात आले. ही नवी जाणीव मनात उदयाला येण्याचे कारण म्हणजे अर्थात् सावित्री नदी!

हे लेखन करताना आमच्या कौटुंबिक पार्श्वभूमीविषयी आणखी काही लिहायला हवे होते का असा प्रश्न मनात येत होता.

पोलादपूरला आमची मूळ जागा. घर. एकत्र कुटुंब. वडील कुटुंबात सर्वात मोठे. ते तलाठी होते. त्यामुळे विविध ठिकाणी बदल्यांचे धक्के खात शेवटी आम्ही पुन्हा पोलादपूरला पोहोचलो. मूळ जागेत आमच्यासाठी साधेसे पण स्वतंत्र घर बांधले. तोवर काही काळ आमचे कुटुंब पोलादपूरचे उपनगर म्हणता येईल अशा गाडीतळावर भाड्याने राहत होते. तेथून मागील डोंगराचा पायथा धरून चोळई नदीवर जाता यायचे. चोळई ही सावित्रीची उपनदी. तिथे तळावरच्या बाया भांडी घासणे, कपडे धुणे,अशा गोष्टी करत. आजूबाजूची गाईगुरे तेथे पाण्यासाठी, डुंबण्यासाठी येत असत.

मी अनेकदा आईबरोबर चोळईवर जायचो. वाटेत झाडांची गर्दी असायची. आंबा, जांभूळ, काजू आणि कोकमाची झाडेही होती. एखाद्या जंगलातून जात आहोत असे वाटायचे. चोळईच्या काठावर फांद्या पसरून आकाशात झेप घेणारी काही उंच झाडे होती. त्यांवर चेंडूच्या आकाराची, अंगावर केसर असणारी गोल फळे यायची. या झाडाला गावाकडे नीव म्हणतात. मी थोडा मोठा झालो आणि वाचनाचे क्षेत्र विस्तारले तेव्हा कळले की ती कदंबाची झाडे! पक्ष्यांनी टोकरून खाली पडलेली त्यांवरची ती केशरी रंगाची आंबटगोड फळे आम्ही चवीने खायचो. दात आंबायचे. ती चव आणि फळांचा तो हिरवा-पिवळट- केशरी रंग आजही नजरेसमोरून हलत नाही.

आईविषयी या पुस्तकात मी फार काही लिहिले नाही.  त्याची गरज नव्हती. कारण “सारे काही त्या गंगामाईलाच माहीत आहे” हे तिचे कथन म्हणजे जणू एक महावाक्यच होते...शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रातील सगळ्याच सासुरवाशिणींचे जणू ते मनोगत ठरावे!

आई सही करण्यापुरते शिकली होती. एकेक अक्षर लावत पेपरमधील बातम्या, गोष्टींची पुस्तके वाचायची. उत्तमोत्तम साहित्य आपल्या कानावरून गेले पाहिजे असे तिला वाटायचे. मी तिला साने गुरुजींची धडपडणारी मुले, जयवंत दळवी यांची महानंदा ही कादंबरी वाचून दाखवली होती. टारझन आणि सिंदबाद यांच्या कथाही तिला खूप आवडत. ते दिवस असे होते की गावच्या वाचनालयात नंबर लावून ती पुस्तके मिळवावी लागत.

रत्नागिरी जिल्ह्यातील खेडजवळ भोस्ते नावाचे एक छोटेसे गाव आहे; ते आईचे माहेर. आईचे माहेरचे नाव चंपा! वडिलांचे नाव कलनाथ आणि आडनाव रजपूत. चंपा म्हणजे चाफा! इतके काव्यात्म नाव तिच्या वडिलांना कसे सुचले असेल याचे आजही मला आश्चर्य वाटते!

आई पूर्णपणे धार्मिक वृत्तीची होती. तिला वर्षभराचे पंचांग तोंडपाठ असायचे. कोणता सण कधी आहे, पौर्णिमा कधी, अमावस्या कधी, दसरा-दिवाळी कधी, शिमगा कधी, दहीहंडी कधी, गणपती कधी हे तिला नीट माहीत असायचे. ती स्वयंपाक उत्तम करायची. पुरणपोळ्या आणि मोदक यासारखे पदार्थ तिला कोणी करायला शिकवले असतील असा प्रश्न आजही मला पडतो. वेगवेगळ्या सणांसाठी देवाला दाखवण्याचा वेगवेगळा प्रसाद तयार करणे ही तिची खासियत. नवरात्रात नऊ दिवस देवीसाठी रोज वेगळा प्रसाद असायचा. कधी पिकलेला चिबूड साल काढून, कापून, तुकडे करून त्यावर साखर टाकून ती प्रसाद म्हणून द्यायची. चुलीतील निखाऱ्यात रताळी भाजून त्यात दूध आणि गूळ कालवून ती जो प्रसाद तयार करत असे त्याला तोड नाही. एखादे वांगे चुलीवर भाजून त्यात दही, गूळ मिसळून ते मिश्रण भातात कालवून ती एक चवदार पदार्थ तयार करायची. देव ‘पारधीला जाण्या’च्या दिवशी आणि ‘देव पारधीवरून परत येण्या’च्या दिवशी ती तो प्रसाद म्हणून सर्वांना द्यायची. दहीहंडीच्या दिवशी तिच्या हातचे गूळ आणि किसलेले खोबरे घातलेले दही-पोहे सर्व बालगोपाळांना मिळायचे. जन्माष्टमीला ती करत असलेल्या सुंठवड्याचीच चव अजूनही जिभेवर रेंगाळते. तिच्या हातची बोटव्याची खीर, तवशाचे ढेबरे, गव्हाचे सत्व, किसलेले खोबरे भरून तळलेल्या हिरव्या मिरच्या अशा अनेक पाककृती तिच्याबरोबर काळाच्या उदरात गडप झाल्या. मांसाहारी पदार्थ सुध्दा ती फक्कड बनवायची.

चिनीमातीच्या बरणीत आंब्याचे लोणचे भरून तिचे तोंड फडक्याने बांधून ठेवणारी, श्रीखंडासाठी पडवीच्या वाश्याला चक्का टांगून ठेवणारी, कोहळ्यांच्या वड्यांसाठी रात्री भिजवून ठेवलेले पीठ दुसऱ्या दिवशी फसफसून वर आलेले पाहून खुश होणारी, भाकऱ्या करता करता तापलेल्या तव्यावर जोंधळ्याचे दाणे टाकून गरमागरम लाह्या तयार करून देणारी... अशी आईची कितीतरी रूपे मला सतत आठवत असतात.

आमच्याकडे कुलस्वामिनी काळेश्वरीचे मोठे खटले! सासरी मोठी म्हणून आईला सगळे कुलाचार पार पाडावे लागत. माझ्या आजोबांना दोन बायका,आठ मुले,तीन मुली. तो सारा गोतावळा; शिवाय आम्ही पाच भावंडे! पहाटे पाच ते मध्यरात्रीपर्यंत तिचा दिवस असे. दिवसाचे शेवटचे काम म्हणजे सासऱ्यांचे पाय चेपून देणे. “सारे काही त्या गंगामाईलाच ठाऊक आहे” असे ती का म्हणायची त्याचा अर्थ तेव्हा उलगडत नसे पण हळूहळू ते लक्षात येऊ लागले. नदीत अंघोळ करताना, भांडी घासताना, कपडे धुताना ती नदीशी बोलत असेल, आपले दुःख तिला सांगत असेल,आपले अश्रू कोणाला दिसू नयेत म्हणून ते नदीच्या पाण्यात वाहू जाऊ देत असेल यात काय शंका?

आईचे सासरे अर्थात् माझ्या वडिलांचे वडील कर्तृत्ववान गृहस्थ होते. त्यांचे नाव दाजी काळू जाधव. फार पूर्वी कधीतरी सातारा जिल्ह्यातील वाईवरून ते पोलादपूरला येऊन स्थायिक झाले.माझे वडील जुन्या मॅट्रिपर्यंत शिकलेले. म्हणजे आमच्या घराण्यात शिक्षण घेणारी आमची दुसरी पिढी! घरी बांगड्या विकण्याचा व्यवसाय होता. म्हणजे बायकांनी टोपलीत बांगड्या, डूल, मनगट्या, वाळे, चमक्या, नथी,पाटल्या,हार आणि असेच काही अलंकार घेऊन आजूबाजूच्या गावात जायचे आणि विक्री करायची. मुला-मुलींचे नाक-कान टोचायचे! पुरुषांनी मासेमारी करायची. या परिपाठामुळे गोसावी-नाथजोगी असे उपनामही आम्हाला लाभले होते. म्हणजे थोडक्यात सांगायचे तर आम्ही भटके-विमुक्त! मुळांचा शोध घेत गेलो तर तो गोरक्षनाथांपर्यंत जातो. गोरक्षनाथ निवृत्तीनाथांचे तर निवृत्तीनाथ ज्ञानेश्वरांचे गुरु. ज्ञानेश्वरांपासून कुमार गंधर्वांपर्यंत आणि पुढे मर्ढेकरांपर्यंत अनेक थोर नाथपंथी माणसे माझ्या वाचन-व्यवहारात मला भेटून गेली. असे संदर्भ हाती आले की छान वाटायचे. अभिमान वाटायचा. नाथांनी वेदप्रामाण्य नाकारले याचेही खूप अप्रूप वाटायचे... तसे पाहिले तर ही अवांतर माहिती पण ती दिल्याशिवाय आपल्याकडे एखाद्या माणसाचे नीट ‘मूल्यमापन’ करता येत नाही, हे कटू वास्तव आहे.

तर बांगड्या आणि तत्सम अलंकार-विक्रीच्या पार्श्वभूमीवर आजूबाजूच्या गावातील अनेक गोरगरीब स्त्रिया आईच्या मैत्रिणी झाल्या होत्या. आई एखाद्या गावात गेली की त्या तिला जेऊखाऊ घालत. भाकरी देत. आई अनेकदा भाकऱ्या घरी घेऊन यायची. आम्ही त्या अधीरपणे खायचो. कधी कधी मी आईबरोबर अशा ‘फेरी’साठी जात असे. सावित्रीच्या काठाने पुढे पुढे जाताना, येथे ‘बायांचा आसरा’ आहे, येथे आपला ‘राखणदार’ राहतो, यासारखे उल्लेख ती करायची. चालता चालता ती काही गोष्टी मला एका पक्षासाठी तिने पिचू पोपट हा शब्द वापरला पॅराकिट म्हणजे पिचू पोपट हे पन्नास साठ वर्षानंतर मला कळले. चीट पाखरू हा शब्दही प्रथम तिच्याच तोंडून ऐकला. हाताच्या अंगठ्याएवढा अगदी छोटा पक्षी म्हणजे चिटपाखरू. त्याला सनबर्ड किंवा फिन्च असे आपण म्हणू शकतो असे नंतर लक्षात आले. हे सगळे ज्ञान आईकडे कुठून आले असेल याचे मला आश्चर्य वाटायचे. चालता चालता भैरीचे देऊळ दिसले की डोक्यावरची टोपली वरच्यावर तोलत दोन्ही हात जोडून नमस्कार करायची. रस्त्याच्या बाजूला दिसणाऱ्या रुईच्या झाडावरील फुलांच्या कळ्या ती दोन्ही हातांनी टपाटप फोडायची आणि त्यांचे मुके घेत त्या

झाडाला नमस्कार करायची. यामुळे आपली चांगली विक्री होईल अशी तिची श्रद्धा होती. मला आजही कधी रुईचे झाड  दिसले तर तेथे क्षणभर थांबून त्या कळ्या मी आवर्जून फोडतो, त्यांचा तो 'टापटूप' आवाज ऐकतो आणि मला जिचा अर्थ माहीत नाही अशा त्या अज्ञात परंपरेसमोर नतमस्तक होतो.

***

पाच

आज इतक्या वर्षानंतर सावित्री आणि तिच्या परिसराकडे पाहताना मनात काय येते, असा प्रश्न अर्थातच पडतो. इतर नद्यांच्या तुलनेत सावित्री ही जलद गतीने वहात समुद्राला मिळणारी नदी. हे तिचे महात्म्य आणि तिचा 'क्रांतिकारी स्वभाव' लक्षात घेता ती गंगा, यमुना, नर्मदा, गोदावरी या नद्यांसारखी नावारुपाला यायला हवी होती. तिची परिक्रमासुद्धा लोकप्रिय ठरू शकली असती. पण झाले उलटेच. सावित्रीवर जेवढे अत्याचार झाले तेवढे देशातील कोणत्याच नदीवर झाले नसतील. आजही तिच्यातून वाळूचा प्रचंड उपसा होत असतो. भयंकर विषारी असे रसायनुक्त पाणी सातत्याने तीत सोडले जाते. महाडजवळ जेथे ही नदी खाडीला मिळते त्या भागातील पाणी आजही रक्तासारखे लाल आणि मृतप्राय झालेले पहायला मिळते. माणसाच्या करंटेपणाचे असे दुसरे उदाहरण दाखवून देता येणे अवघड!

महाबळेश्वरच्या दिशेने पुढे जाताना पोलादपुरच्या पुढे बाजिरे येथे सावित्रीवर धरण बांधले गेले. त्यामुळे मुक्तवाहिनी हे तिचे माहात्म्य कायमचे संपुष्टात आले. खालच्या अंगाला पोलादपूर-चरई असा पूल झाल्यामुळे या दोन गावांना जोडणारा होडीचा प्रवास आधीच बंद झाला होता. होडीने पलीकडच्या किनाऱ्यावरील गावाला जायचे ही एक रम्य कल्पनाच राहिली. नदीतील बरेचसे डोह दगड-गाळ, प्लास्टिक आणि तत्सम कचऱ्याने भरले गेले. राडारोडा, पाण्याच्या बाटल्या, सिमेंटच्या पिशव्या, गोणपाटे अशा वस्तू पात्रात साठू लागल्या. किनाऱ्यावरील सुपीक गाळात पिकणारी कलिंगडे, चिबूड, भोपळे, वांगी, मिरच्या, माठासारख्या पालेभाज्या दिसेनाशा झाल्या.

गावातील कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी मष्णवट्याच्या बाजूला एक जागा तयार करण्यात आली. पण ते काम अनेकदा अशास्त्रीय पद्धतीने आणि निष्काळजीपणाने होत असल्यामुळे नदीतील प्रदूषण वाढू लागले. तेथे जमा झालेली घाण, कचरा अनेकदा तसाच सोडून दिला जात असल्याने तो वाहत खालच्या भागात जाऊ लागला. आपला कचरा दुसऱ्याच्या घरासमोर नेऊन टाकावा तसाच हा वरवरचा उपाय ठरला आहे.

नदीवर धरण झाले. त्यामुळे आजूबाजूचे पारंपरिक मासेमार विस्थापित झाले. कंडाळाने मासेमारी करणारी गोपाळ म्हणून एक जमात होती ती तर नाहीशीच झाली. मला आठवते, कातकरवाडीवर गोपाळाचे एक कुटुंब होते. कंडाळाने मळ्याचे मासे पकडून तो रोज बाजारपेठेत यायचा आणि संध्याकाळी रिकामी टोपली डोक्यावर घेऊन हातातल्या पिशवीत मीठ-मिरची डाळ तांदूळ घेऊन झुलत झुलत आपल्या वाडीवर परतायचा. पुढे त्याचे काय झाले हे कळायला मार्ग नाही. मासेमारीच्या पद्धती बदलल्या. पुढे  इतर जातीधर्माचे लोकही पोटापाण्यासाठी

मासेमारीच्या धंद्यात उतरले. माशांना प्रतिस्पर्ध्याचा दर्जा देत मासेमारी करण्याची खिलाडूवृत्तीचे संवर्धन करणारी पद्धत इतिहासजमा झाली आणि तिला संवेदनाहीन व्यापाराची अवकळा आली.

नदीच्या बाजुबाजूने जीव दडपून टाकणारा राक्षसी महामार्ग तयार झाला. या मार्गावर अधुन-मधून तुरुंगांसारख्या भिंती उभ्या झाल्या. एका भागात राहणाऱ्या माणसांना दुसऱ्या भागात काय चालले आहे ते  दिसणे बंद झाले. या भागातील प्राण्यांना त्या भागात जाणे येणे अवघड होऊन बसले. हिरव्या-पिवळ्या माळरानांची, शेतीभातीची, डोंगरदऱ्यांची निर्दयी विभागणी झाली. पूर्वीच्या रस्त्यावर अनेक पुरातन वृक्ष दिसत. लहानमोठी देवळे, छोटेमोठे तलाव, पाणथळीच्या जागा, प्राणी-पक्षांचे निवारे दिसत. माणूस अद्यापही नोंदवू शकला नाही अशा ज्ञात-अज्ञात जिवांचा सर्वत्र रहिवास होता. ते सारे वैभव आणि त्या परिसराविषयी वाटणारी आपुलकी या विकासाने परकी करून टाकली... एका नव्या विनाशपर्वाचा प्रारंभ झाला.

गावच्या परिसरात देवराईसारखी काही ठिकाणे होती. ती हळूहळू नाहीशी होत गेली. गावात वरपासून खालपर्यंत पिंपळाची मोठमोठी किमान पंधरा झाडे होती. ती तोडली गेली. त्यावर हक्काने लटकणारी वटवाघळे नाहीशी झाली. काही बकुळीची जुनी झाडे होती तीही गेली. त्यात घरटी करून राहणारे धनेश मागे मागे हटत गावाबाहेर हद्दपार झाले. माणूस आणि पक्षी यांच्यातही दुरावा निर्माण होऊ लागला! सिमेंट काँक्रिटची, आतून-बाहेरून चकचकीत टाइल्स लावलेली भेसूर घरे गल्लोगल्ली उभी राहू लागली. माणसांच्या संवेदना बदलू लागल्या. माणसे अधिकाधिक बधीर, व्यवहारी, आत्मकेंद्रित होत गेली.

पावसाळा सुरू झाला की पावसाचे पाणी डोंगरावरून खाली वाहू लागायचे. डोंगरउतारावरील घरांच्या मागून- पुढून वाहणाऱ्या पावसाच्या पहिल्या पाण्यातून उड्या मारत वर जाणारे चंदेरी मासे पूर्वी दिसायचे. ते लाख मोलाचे दृश्य काळाच्या पडद्याआड गेले. भातलावणीच्या वेळी खाचरात लहान मोठे मासे सापडायचे तेही मिळेनासे झाले. पोलादपूरच्या हद्दीतून जाणाऱ्या हायवेच्या बाजूने प्रचंड मोठे, बंदिस्त गटार तयार झाले. पावसाळा सुरू झाल्यावर आणि पहिले पाणी वाहू लागल्यावर त्या गटारातून आता मासे कदाचित वर जातही असतील पण त्यांना तो पूर्वीचा सूर्यप्रकाश, ती मोकळी हवा, ते विशाल आकाश दिसत नसेल. त्यांची ती चंदेरी चमचम आणि डावी उजवीकडे फिरणाऱ्या झोकदार शेपट्यांची नजाकत यापुढे कुणालाही दिसणार नाही. माणसाच्या उथळ, नतद्रष्ट इतिहासात या निरीक्षणाची नोंद यापुढे कधीच होणार नाही. ज्या माशाने एकेकाळी माणसाचे अस्तित्व टिकून राहावे यासाठी मदत केली त्या माशाचे आकाशही माणसाने गिळून टाकावे यापेक्षा आणखी दुर्दैव ते काय असू शकते?

माझी ही भूमिका कदाचित अनेकांना पटणार नाही. त्यांना गतिमान रस्ते मिळाले, नदीकाठी बसायला कठडे बांधून मिळाले, नदीत उतरायला बांधीव पायवाटा आणि घाट झाले, नळातून थेट घरात बारमाही पाणी मिळू लागले. उन्हाळ्यातही नदीच्या आजूबाजूला गारवा टिकून राहू लागला... हे त्यांचे म्हणणे खरे असेलही पण यात पशुपक्ष्यांचा आणि जैवविविधतेच्या संरक्षणाचा विचार झालेला नाही हे लक्षात घ्यायला हवे. सौंदर्यदृष्टीची जाणीवपूर्वक जोपासना करणे यापेक्षा उपलब्ध निधीचा विनियोग करून टार्गेट पूर्ण करणे हा मुद्दा सरकारी कामाच्या पार्श्वभूमीवर वरचढ ठरला. ‘सर्वेऽत्र सुखीन:सन्तु’ या प्रार्थनेत अंतर्भूत असणाऱ्या पशु-पक्षांना आणि इतर

जीवजंतूंना माणसाने जणू कायमचे हद्दपार करून टाकले. काय अर्थ आहे अशा प्रार्थनांना असा विचार या पार्श्वभूमीवर  मनात येऊ लागला.

***

सहा

मी भारतातील अनेक लहान मोठ्या नद्या विविध ऋतूंमध्ये पाहिल्या आहेत. त्यांच्या काठाने फिरलो आहे. अनेक नद्यांच्या काठी वस्तीस राहिलो आहे. त्यांचे पाणी प्यायलो आहे. त्यांचे उगम पाहिले आहेत. संगमांवर रेंगाळलो आहे. त्यांतून जलविहार केला आहे.

श्रीनगरजवळील वेरीनागमधून उगम पावणारी झेलम, लडाखमधून भारतात प्रवेशणारी सिंधू मी पाहिली आहे. त्र्यंबकेश्वर जवळ ब्रह्मगिरीवरून निघणारी गोदावरी, कर्नाटकातील थलकावेरी येथून निघणारी कावेरी, भीमाशंकर येथून निघणारी भीमा असे अनेक नद्यांचे उगम मी पाहिले आहेत. गोव्याच्या मांडवीपासून केरळमधील पेरियार नदीपर्यंत अनेक नद्यांची विविध रूपे पाहिली आहेत. रावी, चिनाब, सतलज, कावेरी, नर्मदा, गोदावरी, तापी अशा नद्या पुनः पुन्हा जवळून पाहिल्या आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड येथील पर्लकोटा नदीच्या काठी, मेळघाटातील कोलखास येथे सिपना नदीच्या काठी भटकंती केली आहे, राहिलो आहे. अनेक नद्या वाहत वाहत, कधी संथपणे तर कधी अतिप्रचंड आकार धारण करत, दोन्ही किनारे फुलवत-फळवत समुद्राला कशा मिळतात हे पाहिले आहे.

गोदावरी, कावेरी, झेलम यासारख्या नद्यांचे उगम मी जसे पाहिले आहेत तसेच नद्यांचे उगम कोरडे कसे पडतात हेही पाहिले आहे. भीमाशंकर येथून होणारा भीमेचा उगम हे त्याचे एक उदाहरण. कर्नाटकात सोमेश्वर बीचवर बैंदूर नदी आणि अरबी समुद्राचा मनोरम संगम पाहिला आहे.
उत्तराखंडमध्ये भागीरथी आणि अलकनंदेच्या मीलनातून गंगेचा उगम कसा होतो आणि तेथील लाल आणि हिरव्या रंगाचे पाणी एकमेकांना मिठीत कसे घेते ते पाहिले आहे. धौलीगंगेच्या काठी तंबूत मुक्काम ठोकला आहे. लडाखमध्ये बास्पा आणि झंस्कार या नद्यांचा रोमहर्षक संगम पाहिला आहे. लेहजवळ झंस्कार नदीच्या काठी वजा तीस अंश सेल्सिअस तपमानामध्ये तंबूमध्ये दोन मुक्काम केले आहेत. अशाच भर थंडीत युमथांग व्हॅलीत तिस्तेच्या जलधारेत हात घालून हाडापर्यंत शिरणाऱ्या थंडीचा थरार अनुभवला आहे.

हिमालयात  ‘एव्हरेस्ट बेस कॅम्प’ला जाताना पहिले तीन दिवस नेपाळमधील दूधकोशी नदीच्या सानिध्यात राहण्याचे भाग्य मला मिळाले आहे. तिचा घोष तनामनात साठवून घेतला आहे. हिमनद्यांचा जन्म कसा होतो तेही अगदी जवळून स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले आहे, अभ्यासले आहे. त्या सगळ्या अनुभवासंबंधी यथाशक्ती लिहिले आहे. अशा भाग्यशाली क्षणांपेक्षा लेखकाला आणखी काय हवे?

मात्र इतके सारे असले तरी, कुठेही गेलो तरी मी सावित्रीला विसरू शकत नाही.ती जणू माझ्या आतून सतत वाहत असते, चैतन्याने सळसळत असते, कोणत्या ना कोणत्या रूपात माझ्या साहित्यातून आविष्कृत होत असते. कचरा किनाऱ्यावर फेकून देत मधल्या धारेने झुळझुळत राहणे हा तिचा धर्म! माणसानेही याप्रमाणेच आपले दुःख, अडचणी  किनाऱ्यावर फेकून देत निर्मळपणे वाहत राहिले पाहिजे; अशी प्रेरणा ती सदैव मला देत असते. नद्या आपल्या आतील ओल जपून ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. खालच्या दिशेने थोडे खणले की त्यांच्या आतील ओले पाझर उमलू लागतात. तसेच माणसाच्या मनातील चांगुलपणाचे पाझर अडचणीच्या प्रसंगातही उमलते राहू शकतात हे जणू सावित्रीने मला शिकवले आहे...

आज अवतीभवती मोठ्या प्रमाणावर निराशाजनक परिस्थिती दिसते, गोंधळून जायला होते, प्रसंगी हतबल व्हायला होते. एकूणच माणसाला संभ्रमात टाकणारा कालखंड सुरू आहे. पण जेव्हा जेव्हा मी पोलादपूरला जातो आणि सावित्रीच्या काठावर बसून तिच्या पाण्यात हात घालतो तेव्हा तेव्हा येथील मासे धावत येतात आणि माझ्याशी जणू हस्तांदोलन करतात. माझ्याशी सलगी करतात. मला धीर देतात. यात काहीही अतिशयोक्ती नाही. ‘ओल्ड मॅन अँड द सी’ही जगप्रसिद्ध कादंबरी लिहिणाऱ्या अर्नेस्ट हेमिंग्वे यांनी यशस्वी लेखनाची काही सूत्रे सांगितली आहेत. त्यातील एक असे आहे की, आपण लिहीत असलेले प्रत्येक वाक्य खरे असायला हवे. लिहिताना ते सूत्र माझ्या मनात कायम जागे असते.

सावित्रीच्या काठी माझ्या आई-वडिलांची समाधी आहे. पोलादपूरला गेलो की तेथे जाऊन क्षणभर हात जोडून उभा राहतो. डोळे मिटून घेतो. तिच्या समाधीभोवती हळूहळू जंगली वनस्पतींचे रान माजले आहे. कंपाउंड केले होते ते तुटले आहे, फरशा निसटल्या आहेत. मातीचे ढिगारे वाढत चालले आहेत... तिच्या नावाची तेथील पाटीही नाहिशी झाली आहे... “माझ्या समाधीजवळ प्राजक्ताचे झाड लावा” असे आईने म्हटले होते, ते कायमचे राहून गेले. केवढी सौंदर्यदृष्टी होती तिच्याजवळ! पण आम्ही सगळे करंटे निघालो. “सारे काही त्या गंगामाईला माहीत आहे” असे म्हणत दुःखाचे कढ आपल्या आत गिळत जगणाऱ्या आईच्या नशिबी मेल्यानंतरही मोकळा श्वास घेणे नाही हे जगण्याचे क्रूर वास्तव आहे.

माझीही एक दिवस अशीच माती होणार आहे.आज आपण जिंकलो असे ज्यांना वाटते त्यांना भरडून काढण्यासाठी काळाचा पुढच्या क्षणाचा वरवंटा तयारच असतो. त्यातून  कुणाचीच सुटका नाही. कुसुमाग्रजांनी हे सत्य किती नेमक्या शब्दात सांगितले आहे.
ही क्षुद्र बाहुली कोण करी निर्माण?
बेताल नाचवी, सूत्रधार हा कोण?
मातीतच अंती त्याचेही निर्वाण?
स्वामित्व जगाचे अखेर अमच्या हाती
मातीवर चढणे एक नवा थर अंती!

***

सात

आजूबाजूला हे सगळे स्थित्यंतर होत असताना माझ्यात काय बदल झाले याविषयी सुद्धा थोडे बोलले पाहिजे. वय वाढत गेले तसतसे जगण्याचे वास्तव किती कठोर आहे याचे भान येत गेले. बदलत्या काळाच्या झपाट्यात माणसाच्या भावभावना, संवेदना तळाशी गडप होऊ लागल्या तर व्यवहार वरच्या पातळीवर येऊ लागले. व्यवहाराने जणू माणसाचे जगणे व्यापून टाकले. कोरोनाच्या कालखंडात या वास्तवाने अधिकच विक्राळ रूप धारण केले. भाबडी, संवेदनशील माणसे मूर्ख ठरू लागली तर चतुर धोरणी, मुत्सद्दी, क्रूर माणसे यशस्वी मानली जाऊ लागली. अहंकाराच्या अजगराने प्रत्येकाला गिळून टाकले. आमच्या घरातही भाऊबंदकीतून जमिनीचा वाद उभा राहिला. सगळा चिखलगाळ घुसळला गेला, घाण वर आली. नात्यांचे अर्थ उलटपालट झाले. स्वार्थाच्या अजगराने निर्मळ नातेसंबंधांचे माणिक गिळून टाकले. आपुलकीचे स्नेहाचे भावबंधनाचे बुडबुडे फुटून हवेत विरून जाऊ लागले. गावाच्या टोकाला सावित्रीच्या काठी असणारी आई-वडिलांची समाधी आणि वरच्या बाजूला नेहमी माझी वाट पाहणारे माझे घर; या दोन्हीत काय फरक आहे असा भयचकित करणारा प्रश्न पडू लागला!

याला माझ्याकडे काय उत्तर होते?

टेथीस महासागराचा तळ क्षणार्धात कसा वर आला आणि त्याने एव्हरेस्टचे रूप कसे धारण केले हे मी डोळसपणे अभ्यासले आहे. एका क्षणात होत्याचे नव्हते होणे म्हणजे काय याचा अंदाज मला येऊ शकतो. सहा कोटी वर्षांचे वय असणाऱ्या हिमालयाच्या तुलनेत वयाची जेमतेम सत्तर ऐंशी वर्षे गाठणाऱ्या माणसाची मिजास ती काय? आणि विश्वात असे अवाढव्य, अक्राळ-विक्राळ बदल होत असताना तेथे एवढ्याशा त्या पोलादपूरची किती आसक्ती बाळगावी? यानिमित्ताने अशा उन्नत विचारांच्या पातळीवर जाऊन मी पोहोचलो हे काय कमी आहे?

एकदा भेटलेल्या नदीला माणूस पुन्हा भेटू शकत नाही असे म्हणतात. कारण त्या क्षणाचे ते पाणी वाहून पुढे निघून गेलेले असते. घराच्या बाबतीतही  'यू नेव्हर गो होम अगेन!' असे म्हटले जाते. क्षणाक्षणाला सारे बदलत असते. त्यामुळे त्याच नदीला, त्याच घराला तुम्ही पुन्हा भेटणे हा एक भ्रम असतो. या क्षणी तुमचा जो श्वास चालू असतो तीच तुमच्यातील नदी आणि तेच तुमचे घर असते. या दिशेने विचार करत असताना हळूहळू नदी,गाव,घर या संकल्पनांचे मनातील अर्थ बदलत गेले. अधिक प्रगल्भ झाले असे म्हणूया! या दोन्ही गोष्टींकडे आता मी अधिक तटस्थपणे पाहू शकतो. 'इदं न मम्...' या भावनेचा उदयही मनात झाला आहे. इथे मी केवळ चार दिवसाचा पाहुणा होतो. येताना काही सोबत आणले नाही आणि जाताना काही सोबत घेऊन जाणार नाही... हे लक्षात आले आहे.

मी एक लेखक आहे. जगण्याच्या समग्र अनुभवासाठी समोर येणाऱ्या प्रत्येक अनुभवाला समतोलपणे आणि जागरूकपणे सामोरे जाणे माझ्यासाठी आवश्यक आहे. मुख्य म्हणजे माझे जगणे हे माझे जगणे आहे. माझी सुखदुःखे, माझ्या भावभाववना, माझ्या अडचणी केवळ माझ्या आहेत आणि त्यातून माझा मलाच मार्ग काढायचा आहे. शेवटी तर पत्नी किंवा मुलेही सोबत असणार नाहीत; हे शहाणपण मी या काळातच जाणू शकलो. मुख्य म्हणजे नैराश्य ही सुंदर भावना आहे त्यातून आपल्याला शिकता येते हेही या कालखंडाने शिकवले. नवनिर्मितीसाठी

नैराश्य अनेकदा पोषक ठरते हे लक्षात घेण्याइतपत माझ्या नव्या आकलनाने वळण घेतले. या सर्व उलटसुलट मंथनातून, गुंतागुंतीच्या जगण्यातून माझे एका सुंदर चित्रपटकथेच्या दिशेने सरकणे हा या साऱ्याचा उत्कर्षबिंदू होता. त्यातूनच 'पाझर' ही चित्रपट कथा जन्माला आली.या चित्रपटकथेचा जन्म कसा झाला आणि त्यासाठी 'पाण्यातले दिवस' हे पुस्तक कसे कारणीभूत ठरले याविषयी जाता जाता थोडे सांगतो.

***

आठ

मी साहित्याचा विद्यार्थी. लेखन-वाचनाचा नाद असणारा आणि शब्दांच्या जगात वावरणारा! नोकरी मिळाली ती महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागात. तीही लेखन-वाचन-संपादनाशी संबंधित. बातम्या, लेख, जिंगल, जाहिराती, गाणी,कथा, कविता, माहितीपट अशा विविध क्षेत्रांतील लेखन हा कामाचा भाग होता. त्याला जोडूनच ललित लेख, कविता, नाटक-एकांकिका असे असे माझे विविधांगी लेखन सुरू असायचे. पुस्तके प्रसिद्ध होत होती. कमी-अधिक दाद मिळत होती.

आपण एखादा पूर्ण लांबीचा चित्रपट लिहावा असे अधून मधून मनात येत असे. तसे दोन-तीन प्रयत्न करून झाले पण ते केवळ हौसेच्या पातळीवर होते. चित्रपट विश्वाची जवळून ओळख नव्हती. त्यातील खाचाखोचा माहिती नव्हत्या. नोकरीतील धावपळीमुळे आणि नेमक्या मार्गदर्शनाअभावी त्या लेखनात परिपूर्णता येत नव्हती. पण तरीही त्या भिंतीवर डोके आपटून घेणे मी थांबवले नाही. जगाला चकित करून टाकेल असा एखादा चित्रपट आपल्याकडून लिहून झाला पाहिजे असे सतत मनात होते.

निवृत्त झाल्यानंतर बऱ्यापैकी निवांतपणा मिळाला. मग मुंबईत 'स्क्रीन रायटर्स असोसिएशन'चे प्रमुख अंजूम राजाबली यांच्या कार्यशाळेत, चित्रपटकथा कशी लिहावी याबाबतचे शास्त्रशुद्ध धडे गिरवले. एखादी चांगली गोष्ट सांगता आली पाहिजे, ती वेगळी असली पाहिजे, स्वतःची असली पाहिजे आणि मुख्य म्हणजे जीवनाच्या जवळ जाणारी असायला पाहिजे हे लक्षात आले. अभिजात चित्रपटांचा जन्म याच विचारधारेतून झालेला आहे. 'पथेर पांचाली' ते 'राशोमान' अशी अनेक उदाहरणे डोळ्यासमोर होती. अशा प्रकारचे वेगळे असे सांगण्यासारखे आपल्याकडे काय आहे; यावर विचार करत असताना 'पाण्यातले दिवस' हे माझे लेखन नजरेसमोर आले. या लेखनाच्या रूपाने समोर 'नांगरलेली भूमी' तयार असून ती आपल्याला साद घालत आहे असेही लक्षात आले.

पोलादपुरातील माझे बालपण, सावित्री नदीचा परिसर,
त्या नदीतील मासेमारीसंबंधीच्या गोष्टी हा भोवताल माझ्या जगण्याचा भाग होता. तो माझ्या स्वप्नात, माझ्या श्वासात, माझ्या दैनंदिन जीवनात सर्वत्र भरून राहिला होता. हेच भावविश्व हाताशी घेऊन काही वेगळी गोष्ट सांगावी असे ठरवले. महाराष्ट्रातच काय पण जगातील इतर कोणत्याही भागात घडू शकेल असे हे कथानक समोर दिसू लागले. जगभरातील सर्वच सुजाण प्रेक्षकांना ते आपलेसे वाटेल असा विश्वास मनात निर्माण झाला. इतकेच

नाही तर ही गोष्ट जर मी सांगितली नाही तर ती जगासमोर कधीच येणार नाही हेही लक्षात आले. मी सांगत असलेली गोष्ट आणि ते वातावरण मराठी चित्रपटात यापूर्वी कधी आल्याचे आठवत नव्हते. तो आपला जमेचा मुद्दा ठरेल हे लक्षात आले, मग आणखी जोमाने कामाला लागलो. लेखकाच्या मनातील एखादा सृजनशील विचार ललितलेखन, कथा, चित्रपटकथा अशी आविष्काराची वेगवेगळे रुपे घेत कसा पुढे येतो हेही यातून अभ्यासकांच्या लक्षात येईल अशी माझी नम्र धारणा होती.

चित्रपटासाठी आवश्यक असणारी 'एका ओळीतील गोष्ट' अर्थात 'वन लाईन स्टोरी' निश्चित केली आणि कामाला लागलो. सावित्रीत मासेमारी करणारा तो हरी नावाचा मुलगा आणि तेथील त्याचे माशांचे विश्व चित्रपटकथेच्या रूपात हळूहळू साकार होऊ लागले. आणि जवळपास दोन-अडीच वर्षांच्या चिंतन-मंथन-अभ्यासातून 'पाझर' जन्माला आली.

नदीचे सतत वाहत राहणे हे महत्त्वाचे सूत्र. तिच्यातील मासे, मासेमार आणि तिचा सांस्कृतिक भोवताल सदैव चैतन्यशाली रहावा हा तिचा प्राण तर धरणामुळे निर्माण होणारे प्रश्न आणि त्या पार्श्वभूमीवरील पर्यावरण रक्षणाचा मुद्दा ही तिची पृष्ठभूमी होती. ही कथा नुसती सावित्रीशी निगडित नाही तर नदीकाठची संस्कृती आणि पर्यावरणाच्या अनुषंगाने ती व्यापक पातळीवर टोकदार भाष्य करणारी आहे हे लक्षात आले. ती सांगत असताना आपण सावित्रीचे नाव आणि मराठी भाषा जगाशी जोडणार आहोत असा विश्वास आणि अभिमान मनात होता.

कोणत्याही लेखकाचे लेखन हे काही प्रमाणात आत्मपर असते. माझ्या चित्रपटकथेचा नायक हरी हा एक लहान मुलगा आहे. त्यात मी थोडासा दिसतो हे खरे आहे पण पण त्याचे विश्व चितारताना मला बरेच स्वातंत्र्य घ्यावे लागले हे स्पष्ट आहे. चित्रपट पाहणाऱ्या प्रत्येक प्रेक्षकाला तो मुलगा आपणच आहोत असे वाटायला लावणे आवश्यक होते. प्रेक्षकाला अनुभवाच्या पातळीवर नेणे मोठे आव्हान होते. त्यादृष्टीने कथेची रचना करत गेलो. कथा फुलवण्यासाठी आवश्यक असणारा संघर्ष सध्याच्या सामाजिक आणि राजकीय वातावरणाच्या रूपात आपोआपच समोर आला. इतर आवश्यक तपशील, बारकावे आणि कंगोरे आपोआप समोर येत गेले. कथा स्वतःच्या अंगाने पुढे सरकू लागली. पहिला कच्चा मसुदा तयार झाला. वारंवार पुनर्लेखन केले आणि ती जवळपास अंतिम टप्प्यावर आणली. अर्थात सद्यस्थितीत ही केवळ लेखकाची गोष्ट असून त्यात दिग्दर्शक आणि अन्य तांत्रिक शाखांचा मोठा सहभाग असणार आहे याचे भान होतेच! मनासारखे काम झाल्यानंतर 'पाझर' हे नाव अंतिम करून 'स्क्रीन रायटर्स असोसिएशन'कडे तिची नोंदणी केली आणि निर्माता दिग्दर्शकाच्या शोधात फिरू लागलो. तो शोध अजूनही सुरूच आहे...

सिनेमाची निर्मिती हे खूप खर्चाचे आणि कष्टाचे काम. त्यात थोडी नशिबाची साथही असावी लागते. 'पथेर पांचाली' हा सत्यजित राय यांचा विश्वविख्यात चित्रपटही पैशांसाठी रखडला होता. दर्जेदार आणि व्युत्पन्न चित्रपटांची निर्मिती करणाऱ्या प्रत्येक निर्मात्याला या अवस्थेतून जावे लागते याची मला कल्पना होती. पैसा कुठून येणार हा प्रश्न माझ्यासमोरही होताच. या क्षेत्रात आपले कोणी गॉडफादर नाही याचीही मला कल्पना होती. म्हणून काही मोजक्या दिग्दर्शक, कलावंतांना आणि मान्यवर मित्रांना ती वाचून दाखवणे सुरू केले. ऐकणारे प्रभावित होत होते. सर्वांना ती

आवडत होती. जागतिक पातळीवर स्वीकारला जाणार आहे अशा एका चित्रपटाची आपण निर्मिती करणार आहोत हे लक्षात येणारा दिग्दर्शक आणि निर्माता मिळाला की पुढचे काम सोपे होणार आहे हे मला माहीत होते. अशा प्रकारच्या वाचनातून या कथेची बातमी कर्णोपकर्णी होऊन काहीतरी मार्ग सापडेल असा विश्वास होता...

कथेचा हा ऐवज पुस्तकरूपाने रसिकांपर्यंत पोहोचवण्याचा आणखी एक मार्ग आपल्यासमोर उपलब्ध आहे हेही एकदा लक्षात आले. 'पाण्यातले दिवस' या पुस्तकाची दुसरी आवृत्ती येणार असेल तर त्यात ही कथा देणे तार्किक आणि सुसंगत ठरणार होते. या विचाराने मला अधिकच बळ मिळाले मग चित्रपटकथेतील तांत्रिक भाग वगळून केवळ कथेच्या रूपात नव्याने तयार केली. तिचे वाचन करताना वाचकाचा काहीही रसभंग होणार नाही उलट त्याला तिचा आनंद घेता येईल अशी रचना केली. 'पाण्यातले दिवस' या पुस्तकाला अजूनही जसे नवनवीन चहा ते मिळत राहतात त्याचप्रमाणे ही कथा वाचून एखाद्याला चित्रपट निर्मितीची प्रेरणा मिळेल, तसा कोणीतरी चाहता आज ना उद्या भेटेल असे मनात आले म्हणून हा सारा प्रपंच केला आहे.

माझ्या कथेवरील हा सिनेमा जेव्हा व्हायचा तेव्हा होईल पण माझ्या मनातील सिनेमा मात्र आता लिहून पूर्ण झाला आहे. मनाच्या रजतपटावर एका अतिशय तृप्त आणि चिंब भावावस्थेत मी तो अनुभवलाही आहे. ते समाधान, तो आनंद माझ्यासाठी खूप मोठा आहे. वाचकही आपल्या मनाच्या रजतपटावर या खेळाचा आनंद घेतील आणि त्यासाठी त्यांना काहीही खर्च येणार नाही हे  मुद्दाम नमूद करीत आहे.

मी दिवास्वप्न पहात आहे असे म्हणा फारतर; पण स्वप्न पाहण्यात काय चुकीचे आहे? 'येस, आय हॅव अ ड्रीम!' असे फक्त मार्टिन ल्युथर किंग यांनीच म्हणायचे का?
आणि हो, माझ्या या विश्वासाला आधार देण्यासाठी आपल्याकडे भवभूतीसारखा मानदंड आहेच की! त्याने म्हणून ठेवले आहे :

उपत्स्यते हि मम कोऽपि समानधर्मा,
कालोऽह्ययं निरवधि विपुला च पृथ्वी...
काळ विपुल आणि पृथ्वी अथांग आहे. आज ना उद्या कोणीतरी समानधर्मा भेटेलच!

***

## भाग दोन (मूळ)

मासेमारीशी आता माझा काहीही संबंध राहिलेला नाही. पण काही क्षण असे येतात की ते मला भूतकाळाच्या काठावर ओढून नेतात आणि मासेमारीसंबंधीच्या आठवणींत चिंब भिजवून टाकतात.

खरे तर मला मासेमारीचे शास्त्रशुद्ध शिक्षण कुणीच दिले नाही. आणि ते मी माझे भाग्य समजतो - कारण एकदा का शास्त्राच्या कचाट्यात सापडलो असतो की मी वस्तुस्थितीपासून फार दूर गेलो असतो असे मला वाटते...

मला लहानपणीचा एक प्रसंग आठवतो. आजोबांनी एकदा विचारले, “तू मोठा झाल्यावर आंगठेबहाद्दर होणार की सहीबहाद्दर ?” त्यावर मी “आंगठेबहाद्दर” असे उत्तर दिले. त्यावर घरातली सर्व मंडळी खो खो हसली होती. आपलं काय चुकलं ते मला कळलं नाही म्हणून मी रडू लागलो, तेव्हा आजोबा समजूत घालीत म्हणाले, “ठीक आहे, तू आंगठेबहाद्दर झालास तरी हरकत नाही - मी तुला मासे मारायला शिकवीन!"

दुर्दैवाने आजोबांकडून मासेमारी शिकण्याची संधी मला कधी मिळाली नाही. कारण मी मासेमारीचे ज्ञान अवगत करायचे वय गाठेपर्यंत त्यांना मृत्यूने गाठले होते... आज त्या घटनेला बरीच वर्षे झाली आहेत, पण ती जणू काही काल - परवाच घडून गेल्यासारखी आठवत आहे.

ज्या क्षणी आजोबांनी, 'तुला मासे मारायला शिकवीन’ असे म्हटले, त्या क्षणी त्यांनी नकळतपणे माझ्या मनावर मासेमारीचा एक संस्कार केला होता. 'मासेमारी' ह्या शब्दाशी अगदी जवळचे नाते निर्माण करणारा तो पहिला धडा माझ्या मनाच्या कोऱ्या पाटीवर नुसताच गिरवला गेला नाही तर कोरला गेला. त्या एका वाक्याने माझ्या मनावर जी मोहिनी घातली तशी मोहिनी खूप काही शिकूनही प्रचलित अभ्यासक्रम घालू शकला नाही. माझ्या मासेमारीच्या छंदाला ती घटना कारणीभूत आहे असे मला अगदी ठामपणे वाटते.

माझ्या बालपणीची केवळ आठ- दहा वर्षे मासेमारीच्या छंदात गेली असतील, पण आज इतक्या वर्षानंतरही त्या दिवसांची नशा डोक्यातून उतरलेली नाही. आणि म्हणूनच मी जेव्हा रायगड जिल्ह्यातील पोलादपूर ह्या माझ्या गावी जातो तेव्हा सर्वप्रथम सावित्री नदीवर फेरफटका मारण्यासाठी जातो. ती बाब मला नैमित्तिक स्वरुपाचे धार्मिक कृत्य करण्याइतकी गरजेची वाटते.

सह्याद्रीच्या सुरम्य डोंगररांगांतील क्षेत्रमहाबळेश्वर ह्या ठिकाणाहून सावित्री उगम पावते. कृष्णा, कोयना,वेण्णा, गायत्री आणि सावित्री अशा पाच नद्यांचे ते उगमस्थान!  त्यांतील कृष्णा, कोयना, वेण्णा आणि गायत्री ह्या दक्षिणेकडे तर सावित्री उलट्या दिशेने महाबळेश्वरमार्गे पोलादपूर- महाडकडे वहायला लागते. ढवळी, कामथी, लहुळसे, देवळा, पितळवाडी, घागरकोंड, रानवडी, पोलादपूर, लोहारमाळ, दिवील, पार्ले, धारवली, सवाद, बिरवाडी, महाड, केंबुर्ली, वहूर, दासगावमार्गे पुढे जाऊन खाडीला मिळते. ह्या मार्गात तिला ढवळी, कामथी, चोळई, काळ, गांधारी इत्यादी नद्या येऊन मिळतात. संगमांच्या ह्या छोट्या- छोट्या ठिकाणी शुभ्र पाण्याच्या खळखळाटाचे

संगीत आणि त्यावरील उत्फुल्ल तुषारांचे नर्तन यांची जी जुगलबंदी चालू असते. तो जणू एक अनुपम्य सोहळाच असतो. मी गावी जातो त्या वेळी या सोहळ्याचा साक्षीदार होण्याचे भाग्य मला लाभते.

सावित्रीच्या आठवणी किंवा तिचे काल्पनिक सान्निध्यसुद्धा मनात आनंदाचे मोहोळ उठवते... सावित्रीची सर्वांत पहिली आठवण आईशी निगडित आहे. ती सावित्रीचा उल्लेख 'गंगामाई' असा करायची आणि ‘सारे काही त्या गंगामाईलाच ठाऊक आहे' असे काहीतरी गूढ बोलायची. आजीसुद्धा सावित्रीचा उल्लेख सदैव 'गंगा' असा करायची.
नदी कोणतीही असो; तिला गंगा असे म्हणण्याची पद्धत गावोगावी आहे. गंगा ही पवित्र जलवाहिनी, प्राणदायिनी ! तिच्याच काठावर संस्कृत्या वसल्या, बहाराला आल्या आणि नाहीशा झाल्या. उत्पत्ती, स्थिती आणि लय ह्यांची साक्षीदार, आदिमाताच ती !

वेदांपासून उपनिषदे आणि पुराणांपर्यंत अनेक ठिकाणी नद्यांची थोरवी वर्णन करण्यात आलेली आहे. सावित्रीकडे पाहून ती प्रत्यक्ष अनुभवास येते. तिच्या अमृतासारख्या गोड आणि स्फटिकासारख्या शुभ्र पाण्याकडे कितीही वेळ पहात राहिले तरी मन भरत नाही. असे देहभान हरपून पहात राहिले की तिच्या काठावरचे दगडधोंडेसुद्धा रत्न-माणकांसारखे वैभवशाली वाटू लागतात. तिच्यातील चैतन्याशी नाते जडते. जगण्याची प्रेरणा मिळते....

भारतातल्या बहुतेक नद्या उत्तरेकडून दक्षिणेकडे वहात जातात, पण सावित्री मात्र दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहाणारी एकमेव आणि सर्वात कमी लांबी असणारी एकमेवद्वितीय नदी आहे. देवळा, पितळवाडी, पोलादपूर, महाड परिसरातील छोट्या-मोठ्या डोंगरदऱ्यांतून वहात वहात तेथील लाल मातीत रुजून हिरव्याकंच झाडझाडोऱ्याच्या रुपाने पुन्हा उमलून बाहेर पडणाऱ्या अशा चैतन्यमयी नदीला आईने ‘गंगा’ म्हणावे हे योग्यच होते, पण “सारे काही त्या गंगामाईला ठाऊक आहे” ह्या तिच्या बोलण्याचा अर्थ समजायला खूप वर्षे जावी लागली.

प्रत्येक ऋतूमध्ये सावित्रीच्या वेगवेगळ्या रुपाचे दर्शन होते. पण आषाढातील दुर्गा आणि आश्विनातील गौरी ही तिची दोन रूपे कायम मनात रेंगाळत राहतात. तिच्या ह्या दोन्ही रुपांचे दर्शन प्रतिवर्षी घडत रहाते... पावसाळ्यात सावित्रीला एकदा तरी पूर येतो. गंगाबायचा घाट, त्याखालचा नंदी, उंबराच्या फुगीमधला उंबर, सारे काही पाण्याखाली जाते. छाती दडपून टाकणारे पाणी आणि त्याचा घनगंभीर गर्जनेसारखा तो घोंघों आवाज पूर ओसरुन गेल्यावरही मन:पटलावर सत्ता गाजवीत रहातो. मात्र अशा तऱ्हेनं प्रचंड क्रोध व्यक्त करणारी सावित्री उर्वरित काळासाठी पुन्हा प्रेमळ रुप धारण करायला सिद्ध असतेच !

मुलाला कडवर घ्यावे तसे सावित्रीने पोलादपूरला आपल्या कुशीत जागा दिलेली आहे. पोलादपूरला तिच्या कुशीची संगत अडीच-तीन किलो मीटर इतकीच लाभली असेल, पण एवढ्याशा ह्या पल्ल्यामध्ये तिने आपल्या अंतरंगात जे काही मोजके डोह निर्माण करुन ठेवले आहेत त्यांच्या अक्षय पाण्याने आणि सौंदर्याने पोलादपुरातील चराचराला शेकडो वर्षांची सुखद संगत दिलेली आहे.

बाजीऱ्याच्या धरणापासून खाली उतरले की डाव्या अंगाने मोरगिरीकडून येणारा एक लहानसा ओढा सावित्रीला मिळालेला दिसतो. त्याला लागूनच खालच्या बाजूला एक छोटासा डोह लागतो. त्याला विशिष्ट असे नाव नाही, पण त्याची प्राकृतिक रचना लक्षात घेऊन ‘कोंडी’ असे त्याचे नामकरण करावयास हरकत नाही.

कोंडीच्या खालच्या अंगाला एकीकडून येणारी चोळई आणि सरळ जाणाऱ्या सावित्रीचा सुरेख संगम झालेला आहे. त्या संगमाला बेडकी असे म्हणतात. त्याही खाली सुमारे अर्ध्या किलोमीटर अंतरावर मधोमध एक बेट तयार झाले असून त्याला जुटा असे म्हणतात. जुट्यात काही जणांनी वहिवाटीने शेती केली आहे. जुट्याला मधोमध ठेवून सावित्रीचा मुख्य भाग पूर्वेकडून जोराने उसळत जातो, तर पश्चिमेकडचा भाग अडखळत, ठेचकळत संथपणे पुढे जाऊन उंबराच्या फुगीजवळ मुख्य प्रवाहाला मिळतो.

पूर्वेकडून निघालेला प्रवाह हंडीच्या डोहाशी क्षणभर थबकतो. उजवीकडून प्रदक्षिणा घालावी तशी मुरड घालून पुन्हा खाली चालता होतो आणि पुढे गंगाबायचा घाट, उंबराची फुगी, बामणाचा पाणवठा, आणखी दोन छोटे छोटे घाट, हत्तीमहाल आणि चिखलीची बाग ह्या डोहांतून आपले चापल्य दाखवीत, उसळत-उसळत महाडच्या दिशेने वाहू लागतो...

पिढ्यान् पिढ्या वर्षोनुवर्षे सावित्री ह्या मार्गावरुन अप्रतिहतपणे वहातच आहे !

कोंडी हा सावित्रीमधील एक देखणा डोह आहे. कोंडी हे नाव कोंडमारा ह्या अर्थाचे वाहक असले तरी ह्या कोंडीची वृत्ती मात्र नेमकी त्याच्या उलट आहे. गावच्या टोकाला डोंगराच्या तळाशी रस्त्यावरच्या एका जुनाट वटवृक्षाचे प्रतिबिंब काळजाशी धरुन कोंडी मुकाटपणे बसलेला दिसतो. कोंडीच्या परिसरात निवांतपणो फार असतो. तिथे पोहणारांची किंवा मासेमारांची गर्दी नसते. अगदी कडक उन्हाळ्यात गेले तरी थारा लागणार नाही इतके खोल पाणी आणि वर येताच जवळच्या अंतरावर दोन्ही किनारे हे कोंडीचे वैशिष्ट्य! आणि म्हणूनच अनेकांना तो प्रेमळ मित्रासारखा आश्वासक वाटतो.

सूर मारण्यासाठी तेथे पाण्यातूनच वर आलेला एक नेटका दगड आणि पाण्याखालून पलिकडे पोहोचले की बाहेर पडणाऱ्या कातळात निसर्गत:च निर्माण झालेली सोफासेटसारखी एक आरामशीर जागा ह्यामुळे कोंडीतील पोहणे सुखकारक होते. ही बाह्य रचना हा जसा माणसांच्या आकर्षणाचा भाग होता त्याचप्रमाणे कोंडीची विलक्षण म्हणावी अशी अंतर्गत रचनाही विविध प्रकारच्या माशांच्या आकर्षणास कारणीभूत ठरली होती.

कोंडीच्या तळाशी किंचितसे तोंड उघडलेल्या शिंपल्याच्या आकाराचा एक खडक आहे. त्याचा आतील भाग पोकळ असल्यामुळे वांबी किंवा आहिरासारख्या माशांना तेथे रहाणे फारच सुरक्षित वाटत असावे. खडकाच्या उघड्या फटीतून आत जाणे म्हणजे तर दरवाजातून घरात जाण्यासाराखेच त्यांना वाटत असणार!

नदीच्या काठाकडे राहणाऱ्या माशाने जर गळ ओढून कपारीत नेला तर तो सोडवणे किंवा माशासह बाहेर काढणे सोपे असते. पण नदीच्या पात्रातच मधोमध तळाशी असणाऱ्या खडकात जर माशाने गळ नेला तर तो तोडून काढण्याखेरीज दुसरा पर्याय नसतो. त्यामुळे कोंडीत मासेमारी करणे हे मात्र मोठे आव्हान असते.

अट्टल मासेमारांना आव्हानात्मक स्थितीत मासेमारी करणे नेहमीच आवडते. त्यानुसार आज्या कधी पोलादपूरला आले की मला घेऊन कोंडीत वांबी मारण्यासाठी जात. हे आज्या म्हणजे माझे तसे लांबचे आजोबाच. पण त्यांना आजोबा म्हणायच्या ऐवजी आम्ही आज्या म्हणत असू. एकदा एक वांब त्यांचा गळ घेऊन त्या मधल्या कपारीत जाऊन बसली होती, तेव्हा तास-दीड तासाची कडवी झुंज देऊन, त्यांनी तिला बाहेर खेचत आणून काठावरच्या वाळूत कशी फेकून दिली, तो प्रसंग आजूनही मला जसाच्या तसा आठवतो. त्या वेळी आजोबांच्या चेहऱ्यावर दृग्गोचर झालेले ते विजयी भावही अजूनही मला जसेच्या तसे आठवतात.

आज्यांचे पूर्ण नाव दगडू कृष्णाजी महाजन असे होते. पण  मोठ्या ऐटीने डी. के. महाजन असे ते सांगत. माशाच्या जन्माला येण्याच्या ऐवजी चुकून माणसाच्या जन्माला आले की काय एवढी त्यांची माशांशी आणि पाण्याशी सलगी ! हे आज्या म्हणजे जलचर सृष्टीचा चालता-बोलता ज्ञानकोशच होते. इतकेच काय पण रामायण-महाभारतासारख्या ग्रंथांतील अनेक संदर्भ, कथा ते बोलता बोलता सांगत आणि आमचे प्रबोधन घडवून आणत. प्रचलित शिक्षणपद्धतीवर त्यांचा विश्वास नसावा. कारण आम्हाला ते नेहमी गूढ आणि दुर्बोध कोडी घालून निरुत्तर करीत, आणि मग “तुमी कितीबी ग्रॅज्वेट शिका, त्यातलं गम्य तुमाला समजायचं नाही” असं भरतवाक्य करीत. माझ्यावर त्यांची फार माया होती. मासेमारीतील अनेक रहस्ये त्यांनी मला अगदी आवर्जून सांगितली होती.

एकदा का गरी घेऊन आज्यांनी पाण्यात बुडी मारली की सोबत एखादा भलामोठा मासा घेऊनच ते वर येत. कधी खूप दूरवर गेले तर काठावर परतताना त्यानी हातातल्या तंगुसात गुंतवून आणलेली दहाबारा माशांची माळ हमखास दृष्टीस पडे. मासा कितीही बलाढ्य असला तरी पाण्यातल्या पाण्यात त्याचे नरडे फोडणारा आणि मस्ती जिरवून त्याचे कलेवर बाहेर काढणारा असा दुसरा मासेमार मी अद्याप पाहिला नाही. ‘पानाला चुना लावायच्या आत’ मासा मारुन आणणारा माणूस म्हणून त्यांची देशावर आणि कोकणात ख्याती होतीच!

कोंडीच्या निवांत परिसरात निवांतपणे त्यांची मासेमारी सुरू असताना काठावर बसून त्यांना सोबत करण्याची संधी मला अनेकदा मिळाली होती, आणि ते क्षण म्हणजे मला आयुष्यातील असीम सुखाचा ठेवा आहे असे वाटते.

कोंडीच्या खालच्या बाजूला हंडी नावाचा डोह आहे. हंडी आणि कोंडीमधील साम्य एकच, आणि ते म्हणजे त्यातील पाण्याची अथांग खोली. ती सोडल्यास दोन्ही डोहांच्या अंतर्गत आणि बाह्य रचना पूर्णपणे भिन्न स्वरुपाच्या आहेत. हंडीच्या गूढ काळसर पाण्यातून कभिन्न काळ्या कातळाचा एक सुळका दिमाखाने छाती बाहेर काढून जगाकडे बघत उभा असतो. गावातील तरुण धाडसी मुलं त्या सुळक्याचा वापर पोहोण्याच्या तालावातील शिडीप्रमाणे सूर मारण्यासाठी करतात. त्या सुळक्याच्या पोटात निसर्ग नावाच्या स्थापत्यविशारदाने कोणता चमत्कार करुन ठेवला आहे याची मात्र त्यांना कल्पना नसणार.

पाण्यात खाली गेलेल्या सुळक्याच्या अंगावर लहानमोठ्या आकाराची अनेक विवरे आहेत. ती विवरे भुयारांसारखी लांबच लांब आणि आतून वळणावळणांची असून, त्यांची तोंडे खोलवर खाली पाताळाच्या दिशेने असणाऱ्या खूप मोठ्या विवरामध्ये उघडत असतात. सुळक्याच्या तळाशी, घराला गॅलरी असावी तशी मोठी फट असून, तिच्यात शिरुन आतील बंदिस्त आणि अवघड धाटणीच्या वाटा शोधून माशांना अमिष दाखवियाची कसरत मी अनेकदा केलेली आहे.

एखादी दुमजली इमारत पाण्यात बुडवून ठेवावी तशी त्या सुळक्याची रचना आहे. टेरेसवर खेळणारी मुले जशी जिन्यावरुन धांगडधिंगा घालत वरखाली फिरत
असतात तशीच तेथे माशांची ये-जा सुरु असते. मोठमोठ्या वांबा त्या चिंचोळ्या विवरातून मुक्तपणे पण तितक्याच सावधपणे जा-ये करत असतात. त्या डोहात वरुन एखादा छोटासा दगड जरी पडला तरी त्याच्या तरंगांबरोबर ‘सावधान!’चा संदेश क्षणार्धात सर्व सुळक्यात पसरत असतो आणि सर्व मासे सावध डोळ्यांनी एकमेकांना ‘सांभाळा रे बाबांनो’ असे सुचवत अधिक सुरक्षित ठिकाणी म्हणजे तळघराकडे पसार होत असतात.

ह्या तळघरातली एक कोठी खास आहिरांसाठी राखून ठेवण्यात आली आहे. तिचा आकार आडव्या पडलेल्या रांजणासारखा असून तिच्या तोंडावर बाहेरच्या बाजूने गोलाकार अशी गारगोटीची खरबरीत नक्षी आहे. त्या नक्षीवरून हात फिरवल्यानंतर एखादी गाय आपल्या खरबरीत जिभेने आपला हात चाटत आहे असे वाटते. वांबी किंवा आहीर पाठीला खाज सुटली की ते तेथे जाऊन पाठ खाजवून घेत असावेत असे मला वाटे.

त्या कोठीत आहिरांचा पिढ्यान् पिढ्यांचा राहुटा आहे. आज्यांनी तेथे शेराच्या झाडाचा चीक मारला की माऱ्याच्या टप्प्यातील एखादा आहीर आंधळा होऊन तडफडत बाहेर येत असे. त्या वेळी त्याला पकडायचे सोडून बाकीचे आहीर आता कुठे गेले असतील असा प्रश्न मला पडे. असे वाटायचे की कोठीला आतून एक चोरदरवाजा असावा आणि त्यातून ते नदीच्या उगमापर्यंत म्हणजे अगदी क्षेत्रमहाबळेश्वरपर्यंत पसार होत असावेत.

बेडकी, उंबराची फुगी, बामणाचा पाणवठा, हत्तीमहाल, चिखलीची बाग, गंगाबायचा घाट, ह्या प्रत्येक ठिकाणाला आपापले असे सौंदर्य आहे. त्या बाह्यात्कारीसौंदर्याचा आस्वाद घेणे ही जितकी सुखद बाब त्याहीपेक्षा त्यांच्या आंतरिक सौंदर्याचे पान करणे हा मला मोठ्या आनंदाचा ठेवा वाटत असे. मात्र त्यासाठी जसा पाण्यात डोळे उघडे ठेवण्याचा सराव हवा तसाच कल्पनेचा एक अंत:चक्षू उघडा करता येण्याचा सरावही असणे आवश्यक होते.

हत्तीमहाल हा डोह पोलादपूरच्या हद्दीच्या अखेरच्या टप्प्यात, पात्राचा मधेमध कातळांच्या गर्दीत अडकून पडल्यासारखा दिसतो. ह्या डोहात गावच्या सार्वजनिक गणपतीचे विसर्जन केले जाते. आणि ह्या डोहातूनच पावसाळ्यात पोलादपूर आणि चरई ह्या दोन गावांतील दळणवळण एकमात्र होडीने चालू राहाते. ह्या डोहात मनसोक्तपणे डुंबण्याची संधी मला अनेकवार मिळालेली आहे. गणपती विसर्जनानंतर एकदोन वेळा त्या गणपतीचा

पाण्यात पाठलाग करुन त्याचे पुढे काय होत असेल हे पाहण्याचा मूर्ख उद्योगही मी केला होता हे इथे कबूल करायला संकोच वाटत नाही.

हत्तीमहालाला काही जण हत्तीमाळ असेही म्हणतात. फार वर्षापूर्वी सर्कशीतला एक हत्ती पाणी पिण्यासाठी तेथे आला असता पाण्यात बुडून मेला आणि त्यामुळे त्याला हत्तीमाळ असे नाव पडल्याचे काही जण सांगतात. सहजगत्या हत्ती बुडावा इतकी त्या डोहाची खोली ! त्यात बुडी मारून तळाची वाळू घेऊन वर येणे हे एखाद्या क्रमिक पुस्तकातील अभ्यास करुन उत्तीर्ण होण्याइतके खचितच सोपे नाही. तेथे प्रदीर्घ अनुभव, दांडगी चिकाटी आणि दम रोखून धरण्यातल्या निष्णातपणाची गरज ही त्यासाठीची पूर्व अट होती.

हत्तीमहाल हे नाव नेमके कसे पडले असेल, या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर अद्यापही मला सापडलेले नाही. त्याविषयी अनेक प्रकारचे तर्क करण्याची खोड मला  लागली होती. एकदा असाच कल्पनाशक्तीचा रबर ताणत असताना, हत्तीचे शीर आणि गणपतीचे शीर एकच असते, त्यामुळे अशा शिरांचा संचय करणारा महाल म्हणजे हत्तीमहाल का नसावा, असा एक युक्तिवाद स्वतःशीच करून बघण्याइतपत मी मजल मारली... त्यासंबंधी अधिक विचार करता करताच मी झोपी गेलो आणि एखाद्या अभिजात कवितेतील तरल उत्कट प्रतिमेसारखा हत्तीमहाल माझ्यासमोर साकार झाला...

हत्तीमहालाचे रंगीबेरंगी काचांच्या लक्ष तुकड्यांनी बनलेले महाद्वार माझ्यासाठी खुले झाले. मी त्यातून आत शिरलो आणि विलक्षण कुतूहलाने साऱ्या महालात फिरु लागलो. आरसपानी काचेच्या त्या विशाल घुमटात फिरताना माझ्या शरीराची असंख्य प्रतिबिंबे माझ्याबरोबरच हालचाल करीत असताना दिसली.

माझे शरीर नाहीसे होऊन माझे रुपांतर एका छोट्या चंदेरी माशात झाले होते. मी जणू मेटामॉर्फिक होऊन काचेतील प्रतिबिंबाशी अंग घासत घासत मागेपुढे, वरखाली, गोलाकार फिरु लागलो होतो. क्षणात सुळकांडी मारुन मी वर जायचो, वरच्या काचेवर डोळा घट्ट दाबून त्यापलिकडे काय असेल हे जाणून घेण्याचा प्रयत्न करायचो, तर क्षणात तळाशी सूर घेऊन खोल खोल पाताळात काय चालले असेल याची चाहूल घ्यायचो...

माझीच असंख्य रुपे मला सर्वत्र दिसत होती. माझ्या पंखांची किंवा शेपटीच्या पात्याची सूक्ष्मशी हालचालही त्या आरशात टिपली जात होती. अशातच एका विशिष्ट क्षणी एका विचित्र रंगाचा प्रकाशझोत माझ्या अंगावर पडला. त्यापाठोपाठ एकामागून एक असे असंख्य प्रकाशझोत वेगवेगळ्या कोनांतून माझ्यावर पडू लागले. त्या प्रकाशझोतांचे भाले माझ्या सर्वांगाला भोसकत माझ्या प्राणापर्यंत आले, तेव्हाच्या त्या निर्णायक क्षणी मी एक जोरदार उसळी घेतली आणि तारा तुटावा तशा गतीने खोलवर पाताळात कोसळू लागलो...

खाली पडताना मला असे वाटले की आपल्या शरीराचे आता असंख्य तुकडे होणार. पण सुदैवाने मी शाबूत होतो आणि तळाशी गेल्यावर तिथल्या बर्फासारख्या थंडगार पाण्यात स्वतःला सावरून पुन्हा पोहायलाही लागलो होतो. एक मनमोकळा श्वास घ्यावा असा विचार करुन मी कल्ल्यात पाणी भरून घेणार तोच तेथे करंगळीएवढ्या

जाडीचा, उबदार सुगंधी पाण्याचा एक झरा माझ्या अंगावर धावून आला आणि मी त्याच्या त्या आक्रमक धारेतून उगमाच्या दिशेने तिरपत - तिरपत निघालो. त्या प्रवाहात तोल सावरता सावरता माझी शेपटी अगदी मेटाकुटीला आली. पण अखेर मी त्या झऱ्याच्या उगमस्थानाशी पोहोचलो... एका विशिष्ट जागी मी निकराचा प्रयत्न करुन स्वतःला पुढे रेटले. माझे अंग खरचटले, खवलांतून रक्त येऊ लागले, पण तरीही मी पुढे एक निर्णायक उसळी घेतली आणि पुढच्या क्षणी केशरी पाण्याच्या एका प्रचंड धबधब्यातून पुन्हा कुठेतरी खाली कोसळू लागलो. जिथे येऊन पडलो तिथे सारीकडे केशरी रंगाची मऊशार मातीच माती पसरली होती. त्या मातीतून क्रमाक्रमाने एकेक अवयव तयार होत गणपतीच्या मूर्ती तयार होत होत्या आणि त्या चिं चिं आवाज काढत माझ्याभोवती फेर धरून नाचत होत्या.

हत्तीमहालाजवळून जाताना ह्या स्वप्नाची हमखास आठवण होते. आणि हो,का कुणास ठाऊक, पण हत्तीमहालात मासेमारीसाठी जावे असे मला कधीही वाटले नाही.

गावच्या मध्यवर्ती म्हणता येईल असा एक मोठा घाट आहे, त्याला ‘गंगाबायचा घाट’ असे म्हणतात. त्या घाटाच्या बाजूला शाळा होती. उजवीकडे दत्ताचे तर डावीकडे गंगाबायचे छोटेसे देऊळ होते. शाळेच्या खिडक्या मोठ्या होत्या आणि त्यांना गज नव्हते. त्यामुळे शाळा सुटताच त्या खिडक्यांतून उड्या मारून आम्ही नदीकडे पळत असू. पिंपळाखालच्या मैदानात मुलांचे खेळणे सुरु होई आणि मी घाटावर बसून सावित्रीच्या प्रवाहाकडे पहात राही.

गंगाबायचे देऊळ आणि दत्ताचे देऊळ समोरासमोर होते. त्या देवळांना लगटून दोन मोठे बुरुज होते आणि त्यांच्या मधून नदीच्या दिशेने उतरत जाणाऱ्या पायऱ्या होत्या. घाटाचे हे चित्र आजही आहे तसेच आहे. खाली उतरताना विशिष्ट पायऱ्यावर ग्रामदेवतांच्या काही मूर्ती आहेत. एका पायरीवर नंदी आहे. लोक जाता-येता त्यावर हळदीकुंकू वाहतात. कोणी संध्याकाळी त्याच्यासमोर तेलवात लावून जाते. पावसाळा सुरु झाला आणि सावित्रीला पूर आला की त्यात नंदी बुडून जातो. बुरुजांच्या टाळूपर्यंत पाणी चढते.
पूर ओसरला की गंगाबायच्या घाटावर बायकांची नेहमीप्रमाणे धुणी-भांडी सुरु होतात आणि लहान लहान नवशिकी पोरं तंगुसाऐवजी केसरी वापरून दांड्या, खवल, पितुर्ड्या, भिंगुर्डे मारत बसतात.

घाटाच्या खालच्या अंगाला आणखी एक छोटा पण तीव्र उताराचा घाट आहे. आजूबाजूच्या परिसरातील बाया दोन्ही भांडी करण्यासाठी तेथे जातात शिवाय त्या परिसरातील गणपतीचे विसर्जनही तेथेच होते तेथे खाली उतरताना एक पुरातन असे पिंपळाचे झाड लागायचे. त्यावर असंख्य वटवाघळे लटकलेली असत. रात्री-बेरात्री त्यांचे सामूहिकपणे चित्कारणे म्हणजे गावाचे पार्श्वसंगीत होते. ते वगळले असते तर गावाच्या अस्तित्वाला काही अर्थच उरला नसता. पण एक दिवस विजेच्या तारांना अडथळा होतो म्हणून ते झाड तोडले गेले. वटवाघळे सैरभैर झाली. पुन्हा ती गावात कधीच दिसली नाहीत. गावाचा तो तुकडा कायम मुका झाला...

मध्यवर्ती घाटासमोरच्या पात्रात दगडांच्या वेढ्यात अडकून पडल्यासारखे एक उंबराचे मोठे झाड आहे. वरून येणारे पाणी त्या अडथळ्याशी क्षणभर थबकते आणि अचानक गिरकी घेऊन पुढे धावू लागते. त्यामुळे तिथे एक भोवरा

तयार झाला आहे. त्यालाच उंबराची फुगी असे म्हणतात. नदीला पाणी भरपूर असले की त्या फुगीतील भोवऱ्याला आक्रमक स्वरुप येते, त्यामुळे अनेकांचा तिथे पोहायला जायचा धीर होत नाही.

पूर आला की उंबराचे झाड त्यात शेंड्यापर्यंत बुडून जाते. ग्रहणाच्या रात्री गावातला एक मांत्रिक नदीत बुडी मारून पाण्याखाली मंत्र उजवत असल्याचे आई सांगत असे. त्याची आठवण होऊन उगाचच पाण्याखाली बुडालेला उंबर आता मंत्र उजवीत असेल असे मला वाटायचे. पाण्याच्या प्रचंड रेट्याने मेटाकुटीला आलेल्या त्याच्या फांद्या हात मागे बांधून ठेवलेल्या मुलाच्या हातासारख्या दुखऱ्या झाल्या असतील आणि पाण्याच्या झोताने त्याच्या अंगावरच्या खपल्या उडून त्याच्या संपूर्ण खोडावर असंख्य लालभडक डोळे उघडले असतील असे मला वाटायचे. ते चित्र अनेक दिवस आणि रात्री माझ्या नजरेसमोरून हटत नसे.

***

सावित्री आणि चोळईच्या सुखद संगमाचे दर्शन बेडकी ह्या डोहाशी होते. बाजीऱ्याला वळसा घालून नाकासमोर पोलादपूरची वाट धरणाऱ्या सावित्रीला गावाच्या वेशीपाशी असणाऱ्या पुलाजवळ दक्षिणेच्या डोंगरातून आलेली चोळई नदी आवेगाने मिठी मारावी तशी भेटते. सावित्रीच्या वरून आलेल्या लोंढ्याशी संघर्ष करणारे चोळईचे पाणी माघार घेते आणि त्यामुळे तेथे पाण्याचा फुगवटा निर्माण होतो. मागे फिरणारे पाणी सामान्यपणे ज्या आकारात फिरते तो आकार पाण्यावर तरंगणाऱ्या बेडकीप्रमाणे असल्यामुळे ह्या डोहाला बेडकी असे नाव पडले असावे. संगमाच्या ह्या ठिकाणी प्रचंड अजगराप्रमाणे सुस्तावून पडलेल्या कातळावर दोन्ही नद्यांनी आपले डोके आपटून आपटून जो उंच-सखल भाग तयार केला आहे त्याचा फायदा उठवून गोऱ्या साहेबाने त्यावर पूल बांधलेला आहे. महाबळेश्वरकडे जाताना हा पूल ओलांडूनच पुढे जावे लागते.
-
पुलाच्या चार-पाच गाळ्यांतून शिस्तीत जावे लागल्यामुळे संतापलेले पाणी खाली येताच कोपिष्ट गती धारण करते आणि पुढच्या खडकावर धावून जाते. वर्षानुवर्षे चालू असलेल्या ह्या आक्रमणामुळे त्या खडकामध्ये एक मोठी घळ निर्माण झाली आहे. त्या घळीचा फायदा उठवून वांबी, शिंगटी, कोलंबी, असले मासे आपापली जागा निश्चित करून तेथे नांदत असतात.

बेडकीत विस्तृतपणे पसरलेल्या खडकाच्या माथ्यावर बसून खालील माशांची गळाने शिकार करणे हा एक अवर्णनीय अनुभव असायचा. कधी कधी संध्याकाळ होईपर्यंत आम्ही तेथे मासे धरण्यासाठी थांबत असू. त्या वेळची त्या खडकांची ऊब कायम माझ्या स्मरणात राहिलेली आहे. तेथील खडक दिवसभर सोसलेल्या सूर्याच्या प्रखर उष्णतेचे एका आगळ्या उबेत परिवर्तन करीत आणि अंधार पडून थंड हवा सुटली तरी ती आम्हाला पुरवीत राहत.

गावात असा अवखळपणा करणारी सावित्री गावाबाहेर पडून जेव्हा लोहारमाळाकडे कूच करते तेव्हा तिचे पात्र खूप विस्तृत आणि संथ होते. गावातील सलग खडकांची मालिका खंडित होऊन लहान-लहान दगडगोट्यांचे आणि त्यात

वाढणाऱ्या लव्हाळी, शेरणीसारख्या पाणवनस्पतींचे साम्राज्य सुरू होते. तिच्या व्यक्तिमत्वात एकप्रकारची आल्हाददायक शीतलता निर्माण झाल्यामुळे त्या भागात बगळे, पाणकोंबड्या, खंडे इ, पक्ष्यांचाही संचार सुरू झालेला दिसतो. हा भाग चिखलीची बाग म्हणून ओळखला जातो.

चिखलीच्या बागेच्या पलिकडच्या काठाला, कासवाने पाण्यातून पाठ वर काढावी तसा एक खडक बाहेर आलेला दिसतो. त्या खडकाचा आधार घेऊन काही काटेरी झुडुपेही वाढलेली दिसतात. नदीतील पाण्याची पातळी जसजशी कमी होत जाते तसतशी ती पातळी दर्शविणाऱ्या रेषा खडकावर उमटत रहातात. त्या रेषांमुळे त्या खडकावर एक प्रकारची निळसर-काळसर झाक निर्माण झालेली दिसते. दुपारच्या लख्ख उन्हात त्या खडकाचे पाण्यातील प्रतिबिंब एक अलौकिक असा रंगाभास निर्माण करते. लोक त्याला चमत्कार समजून नमस्कार करतात. या स्थळी ‘बायांचा आसरा’ आहे असे मला आईने सांगितले होते...

अशा ह्या सावित्रीमध्ये डुंबण्यात आणि मासेमारी करण्यात माझे बालपण गेले. त्या ओल्या दिवसांच्या आठवणी माझे जीवन व्यापून उरल्या आहेत. सावित्रीसारख्या लघुतम नदीपासून ते गंगा-यमुनेसारख्या विशालकाय नद्यांपर्यंत अनेक लहानमोठ्या नद्या मी जवळून पाहिल्या आहेत. त्यांच्या काठावरून फिरलो आहे, त्यांच्यात संचार केला आहे. पण सावित्रीच्या पाण्यात उडी मारून बाहेर पडल्यानंतर जे सुख अंगावरुन निथळत रहाते त्याला कुठेही तोड नाही; हे मुद्दाम सांगावेसे वाटते.

मला प्रत्यक्षपणे मासेमारीचे ज्ञान देण्याची आजोबांची इच्छा जरी अतृप्त राहिली तरी त्यांनी दिलेल्या मूलभूत प्रेरणेच्या छत्राखालीच माझे मासेमारीचे शिक्षण कळत-नकळत चालू राहिले होते... लहानपणी घरात अवती-भवती मासेमारीचे वातावरण असायचे. रात्री-बेरात्री वेगवेगळ्या प्रकारचे मासे घरात आणले जात. चिमणी-कंदिलांच्या उजेडात ते कापण्याचा कार्यक्रम सुरू होई आणि त्यासोबतच त्या माशांची शिकार कशी झाली याच्या सुरस आणि चमत्कारिक कथा सुरू होत. त्या कथांचा आणि एकूणच वातावरणाचा प्रभाव माझ्यावर हळुहळू पडत होता.

मी अगदी लहान असताना एकदा एका सायंकाळी रामचंद्रतात्या मला आपल्या पाठीवर बसवून वांबी मारायला बेडकीत घेऊन गेले होते. तासाभरात गळाने त्यानी काही वांबी मारल्या. हळुहळू अंधार पसरायला सुरुवात झाली होती. घरी जायला उशीर नको म्हणून त्यांनी मधल्या रस्त्याने जाण्याचा निर्णय घेतला.

पूल ओलांडून जाण्याऐवजी नदी पोहून पार केली की घरी लवकर पोहोचता येणार होते. म्हणून त्यांनी मला पाठीवर बसवले आणि आपल्या मानेभवती हाताची पकड घालावयास सांगितले.  ते पाण्यात उतरले आणि एका हाताने पाणी कापत पुढे सरकू लागले. त्यांच्या दुसऱ्या हातात वांबींचे गाठोडे होते. वर विस्तृत निळे आकाश, खाली संथपणे वाहणारी नदी आणि त्यांच्या सायुज्यतेवर संधिप्रकाशाचा तरल पडदा पसरलेला... त्या वातावरणाने माझ्या मनावर गारुड केले आणि पाहता-पाहता मी त्यात हरवून गेलो.

त्या तंद्रीत असताना तात्यांच्या गळ्याभवतीचा माझा एक हात सुटला आणि मी पाण्यात कोसळलो. कोसळलो म्हणजे अगदी एखाद्या निर्जीव गाठोड्यासारखा पार तळालाच गेलो! छातीत हवा होती, त्यात थोडे पाणीही मिसळले गेले, त्यामुळेच की काय पण घुसमटत वर आलो आणि एका आंतरिक प्रेरणेने पाण्यावर हात मारला...

पाण्यावर तरंगण्याच्या त्या पहिल्या क्षणी माझ्या मनात जो आत्मविश्वास निर्माण झाला आणि मला जो आनंद मिळाला तितक्या उच्च प्रतीचा आनंद नंतर मला केव्हाही मिळाला नाही... मासे सदैव प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने पोहत असतात ही अगदी किरकोळ पण महत्वाची गोष्ट! लहानपणीच ती माझ्या मनावर बिंबली होती. पाण्यावर तरंगण्यासाठी मी जो पहिला हात मारला त्याची मूळ प्रेरणा ही त्या गोष्टीतच होती... त्या क्षणापासून सावित्रीशी दोस्ती झाली ती कायमची !

एकदा घरात मासे कापण्याचा कार्यक्रम सुरू असताना आजोबांनी आहीर मारल्याची एक गोष्ट सांगितली होती. ती आजही मला जशीच्या तशी आठवते...

आहीर हा गोड्या पाण्यातील सर्वांत चवदार मासा. त्याच्या अंगाला अतिशय बळकी असते. त्या बळकीमुळे तो इतका बुळबुळीत झालेला असतो की अतिशय अरुंद कपारीतून किंवा बिळातून तो सुखेनैव प्रवास करू शकतो. इतकेच काय पण त्या बळकीमुळे त्याला आलेले चापल्य हे त्याच्या संरक्षणाचे एक साधनही ठरते. शिवाय त्याची बळकी म्हणजे पाण्यातील रोगजंतूंना एक अभेद्य अशी तटबंदीही असते. ह्या बळकीमुळे जिवंत आहीर हातात धरू पाहणे ही पारा चिमटीत पकडण्याइतकी अवघड गोष्ट असते.

आहिराचे तोंड अर्धवर्तुळाकार असते. त्याच्या जबड्यात अणकुचीदार दात असतात. तो मांसाहारी असून पाण्यातील छोटे मासे, कोलंब्या, बेडूक इत्यादींवर तो आपली भूक भागवतो. हा मासा अतिशय सावधपणे आणि सुरक्षितपणे जगणारा असल्यामुळे त्याची शिकार करायला फार मोठा अनुभव आणि कसब लागते.

... तर एकदा गावातल्या कोंबड्या अचानक गायब व्हायला लागल्या. दिवसेंदिवस कोंबड्यांची संख्या कमी व्हायला लागली. पाहून गावकरी संभ्रमात पडले. आपल्या गावात कधी कोल्हा येत नाही, बाऊल येत नाही. चोऱ्या तर कधीच होत नाहीत. मग कोंबड्या नाहीशा कशा होतात ? लोकांना काहीच उमजेना. आजोबांनी ह्या गोष्टीवर बराच विचार केला. त्यांनी आपली कल्पनाशक्ती इतकी ताणली की त्यांनी काढलेला निष्कर्ष अशक्य कोटीतील वाटावा !

त्यांनी स्वतःच्या निष्कर्षाचा प्रथम स्वतःच ताळा करून बघायचे ठरवले... गावाच्या ज्या भागातील कोंबड्या नाहीशा होत होत्या तो भाग नदीपासून जवळचा होता. आजोबांनी त्या भागापासून नदीपर्यंत अनेक चकरा मारल्या, निरीक्षण केले. आणि त्यांना कोंबडीचोराचा पत्ता लागला...

त्या नदीतला एक आहीर कोंबड्या खायला सवकला होता. गुंडाळले असता स्कूटरच्या टायरसारखा दिसेल असा तो अगडबंब आहीर रोज रात्री गावात यायचा आणि कोंबड्या खाऊन पसार व्हायचा. नदीतून जमिनीवर येताना तो

आपल्या अंगाची बळकी सोडून स्वत:ला जाण्यायेण्यापुरती छोटीशी वाट तयार करायचा आणि त्यावरुन येजा करायचा.

दुसऱ्या दिवशी आजोबांनी एक पोते भरुन राखुंडी गोळा करुन ठेवली. रात्री आहीर गावात आल्याबरोबर त्यांनी ती त्याच्या वाटेवर पसरली. राखेने ती सर्व बळकी शोषून घेतल्यामुळे ती वाट कोरडी ठणठणीत झाली आणि त्यामुळे कोंबड्या खाऊन परत फिरलेल्या आहिराला पुढे सरकता येईना....

राखुंडीच्या रिकाम्या पोत्यात आजोबांनी आहिराला भरले आणि पोते घेऊन ते घरी आले. एवढ्या मोठ्या माशाला कापणे ही गोष्ट जवळ जवळ अशक्य असल्यामुळे आजोबांनी जो शब्दप्रयोग केला तो अद्यापही माझ्या लक्षात आहे. त्या माशाला 'कुऱ्हाडीने तोडावा लागला' असे ते म्हणाले. इतकेच काय पण तोडताना तो मासा इतका जोरात ओरडत होता की त्याचा आवाज गावाच्या मध्यवर्ती असणाऱ्या चौकापर्यंत जात होता' असे त्यांनी सांगितले...

ह्या गोष्टीने माझ्या मनावर फार मोठा परिणाम केला. ती खरी असेल का ? तिच्यात अतिशयोक्ती आहे का ? मासापाण्याबाहेर येऊन कोंबड्या खाऊ शकतो का ? तो आवाज काढू शकतो का ? इत्यादी प्रश्नांचे मनात मोहोळ उठले. ते मला स्वस्थ बसू देईना. अशा अस्वस्थ मनःस्थितीत असतानाच त्या प्रश्नांचा वेध घ्यायचा असे मी ठरवले. आणि त्यामुळे मासेमारीविषयीचे अनेक बारीक-सारीक तपशील नंतर माझ्या हाती आले.

मासेमारीच्या वेगवेगळ्या पद्धती का रुढ झाल्या असतील ? एकाच पद्धतीने मासेमारी करता येणार नाही का? असे प्रश्न काही जणांना पडणे शक्य आहे. त्यांच्यासाठी आधी काही गोष्टी सांगाव्या लागतील.

'व्यक्ती तितक्या प्रकृती' ह्या न्यायाने माशांच्याही जातीनिहाय वेगवेगळ्या प्रकृत्ती असतात. प्रत्येक जातीच्या माशाची जगण्याची शैली वेगळी असते. प्रत्येकाच्या खाण्या-पिण्याच्या सवयी वेगवेगळ्या असतात. काही मासे मांसाहारी असतात तर काही शाकाहारी असतात. मांसाहारी मासे आपल्याच लहान भावंडांना, पाण्यातील जीव-जंतूंना, किड्यांना, बेडकांना खाऊन जगतात, तर शकाहारी मासे पाणवनस्पतींवर जगत असतात. काही माशांना जिवंत भक्ष्यावर ताव मारायला आवडते, तर काहींना प्रवाहातून वहात आलेल्या मृत किंवा कुजलेल्या प्राणंचे मांसही चालते. खवलासारखे काही मासे इतके खादाड असतात की त्यांना दोन्ही प्रकारांतील कोणतेही अन्न चालू शकते. शिवाय काही मासे पाण्याच्या वरच्या थरात राहतात, काही मधल्या थरात राहतात तर काही पाण्याच्यातळाशी राहतात. या सर्व गोष्टींचा सूक्ष्म अभ्यास करुनच मासेमारांनी मासेमारीच्या वेगवेगळ्या पद्धती शोधून काढल्या आहेत.

कोलंबी किंवा झिंगा, ज्याला इंग्रजीत प्रॉन्स असे म्हणतात, तो शास्त्रीय परिभाषेत मासा ह्या संवर्गात मोडत नाही हे एकून अनेकांना आश्चर्य वाटेल. अतिशय स्वादिष्ट आणि त्यामुळेच मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळवून देणारी कोलंबी 'क्रस्टेशियन ग्रूप' मध्ये मोडते. खेकडे सुद्धा क्रॅस्टेशियन ग्रूप' मध्ये मोडतात.

कोलंबी आणि खेकड्यांचे आपण जर बारकाईने निरीक्षण केले तर ते कवचधारी प्राणी आहेत हे आपल्या लक्षात येईल. त्यांना स्वतंत्र असे शीर नसते आणि त्यांच्या अंगात रक्तही नसते. रक्त आहे असे मानले तर त्या रक्तात हेमोग्लोबीन नसल्यामुळे ते लाल दिसत नाही असे म्हणता येईल. त्यांना अन्ननलिकेसारखा विकसित अवयवही नसतो. त्यामुळे आपले अन्न ते तुकडे करून त्यातील रसांचे शोषण करुन खातात. त्यांच्या देहाची रचना छोट्या-छोट्या स्वतंत्र कवचांनी झालेली असल्याने, इतर प्राण्यांच्या देहात जो लवचिकपणा आढळतो तो त्यांच्यात आढळत नाही.

मध्यंतरी एकदा देववाली मावशी भेटली होती. गप्पा मारता मारता तिने विचारले, ज्याला काळीज नाही अशा माशाचे नाव सांगू शकशील ? तिचा तो प्रश्न ऐकून मी ताड्कन उडालोच! कारण प्रत्येक सजीव प्राण्याला काळीज (लिव्हर) असते. काळजाशिवाय तो जगूच शकणार नाही असे मी शाळेत शिकलो होता. मावशीने मला बुचकळ्यात टाकणारा प्रश्न विचारला होता. मी निरुत्तर झालो हे पाहून शेवटी तिनेच सांगितले की 'कोलंबीला काळीज नसते.' माझा तिच्या बोलण्यावर विश्वास बसला नाही म्हणून मी माझे मित्र, मत्स्यविशेषज्ञ डॉ. सनील कुळकर्णी यांच्याकडे विचारणा केली. त्यांनी जेव्हा मावशीच्या मताला दुजोरा दिला. शाळेचे कधी तोंडही न पाहिलेल्या मावशीच्या त्या प्रगाढ ज्ञानाने मी आश्चर्यचकित झालो!

कोलंबी ही नेहमी संथ पाण्यात राहणे पसंत करते. पाण्याच्या तळाशी वाढणाऱ्या पाणवनस्पती, झुडुपे किंवा तेथे असणाऱ्या दगड-धोंड्यांच्या अडगळीत वावरणे तिला सोयीचे असते. पाण्यात सरळ बुडालेल्या कातळाला जर मधल्या थरात एखादी कपार असेल तर त्यातही कोलंब्या राहतात. कोलंबी हा प्राणी कळपाने राहणारा असून एकटी-दुकटी कोळंबी कधीही फिरताना दिसणार नाही.
एखाद्या निवांत ठिकाणी जर एखादा मासेमार मासेमारी करत बसला असेल आणि अशा ठिकाणी अचानक जर कोलंब्यांचा थवा अवतीर्ण झाला तर सतत गळ ओढून, ओढून मासेमाराला त्या त्राही भगवान करून सोडतात.

आज्यांनी कोलंब्या पकडण्याची एक सोपी युक्ती सांगितली होती. ज्या ठिकाणी कोलंब्यांचा राहुटा असतो अशा ठिकाणी चांदण्या रात्री तांदळाच्या मूळभर कण्या फेकायच्या. कण्या खाणे कोलंब्यांना फार आवडते. मग त्या कण्या खाण्यासाठी सर्व कोलंब्या एकत्र जमतात. अर्धा-पाऊण तासाचा कालावधी गेला की मग वरून पाग टाकायचा. पाग ओढून बाहेर काढला की त्यात कोलंब्यांचा तांडाच्या तांडा अडकलेला दिसतो.

कोलंबी आणि खेकडे हे शास्त्रीय परिभाषेत मासे नसले तरी लोकांनी त्यांचा माशांच्या जोडीनेच आपल्या अन्नामध्ये समावेश करून घेतला आहे. तसे पाहिले तर खुबे, शिंपले, मगर, कासव इत्यादींचाही मत्स्याहारामध्ये समावेश होतो. त्यांच्या शिकारीसाठी माणसाने वेगवेगळ्या प्रकारच्या पद्धती शोधून काढल्या आहेत.

दांडी, पितुर्डी, खवल, तांबोशी इ. प्रकारचे मासे पाण्याच्या वरच्या थरात राहतात, तर शिवडा, वालजी, शिंगटी, पालू आणि तत्सम मासे मधल्या थरात राहतात. बांब आणि आहिरांसारखे हिंसक व आक्रमक प्रवृत्तीचे मासे पाण्याच्या तळाशी असणाऱ्या खडकांच्या कपारीत किंवा विवरात राहतात, तर मळे किंवा खर्बे यांच्यासारखे मासे उथळ

ठिकाणी असणाऱ्या पाण्याच्या तळावर, तिथली रेती वा लहान लहान दगड यांच्यावर कळप करुन राहतात. त्यांचा रंग हा वाळू किंवा दगडांशी मिळता-जुळता असल्याने ते पटकन कुणाच्याही नजरेस पडत नाहीत. स्वसंरक्षणाच्या दृष्टीने त्यांना निसर्गाकडून मिळालेले हे एक प्रकारचे वरदानच म्हणायला हवे.

हे आणि असे सर्वच प्रकारचे मासे आपापली गुणवैशिष्ट्ये जपत आपापल्या पद्धतीने जगत असतात. भुरटा चोर जसा बँकेवर दरोडा घालणार नाही त्याप्रमाणे खवल कधीही गरीच्या गळावर तोंड टाकणार नाही. मळ्याचा मासा हा फक्त कंडाळात किंवा पागातच सापडू शकेल;तो गळाला कधीही तोंड लावणार नाही. आहीर किंवा वांब यापैकी कोणत्याही पद्धतीला बळी पडणार नाही तर त्यांना फक्त गरवूनच पकडता येईल.

मासेमारीचे पारंपरिक शास्त्र हे अशा प्रकारच्या सूक्ष्म निरीक्षणावर, मासेमारांच्या स्वानुभावावर आणि त्यांच्या दांडग्या मेहनतीवर आधारलेले आहे. ते कोणत्याही ग्रंथाद्वारे, मंत्र वा तंत्राद्वारे सिद्ध झालेले नाही हे लक्षात घेतले पाहिजे !

गोड्या पाण्यातील मासेमारीच्या ज्या पारंपरिक पद्धती आहेत त्यांत प्रामुख्याने कंडाळ लावून मासे मारणे, पागवणे, गरवणे, पालवणे, माच घालणे, चीक मारणे, बांधण घालणे, गळाने मासे मारणे इ. पद्धतींचा समावेश होतो. शिवाय रात्रीच्या वेळी गॅसबत्तीच्या उजेडात मासे मारण्यासाठी जाणे आणि पेटलेल्या टायरच्या किंवा तुराटीच्या चुडीच्या प्रकाशात खेकडी पकडायला जाणे या पद्धतीही अद्याप खेडोपाडी प्रचलित आहेत. अजूनही मी कधी गावी गेलो की असल्या प्रसंगांना साक्षी राहण्याची संधी मला मिळते.

जोवर शासकीय पातळीवरून मत्स्यपालन आणि संवर्धन सुरू झाले नव्हते तोवर एखाद्या गावच्या तलावात नैसर्गिकतः वाढलेले मासे त्या संपूर्ण गावच्या मालकीचे समजले जात, आणि त्या माशांची वाढ पूर्ण झाल्यावर एक ठराविक दिवस मुक्रर करुन सर्व गावकरी तळ्यातील मासे मारण्यासाठी येत असत. ह्या पद्धतीला 'तळे मारणे' असे म्हणत. तळे मारण्याची बातमी लोकांना दवंडीद्वारे दिली जात असे. मी दासगाव येथे असताना 'तळे मारण्याचा प्रकार पाहिलेला आहे आणि त्यात सामीलही झालो आहे.

जगात माशांच्या सुमारे एकवीस हजार जाती आहे. त्यांतील दीड हजाराहून अधिक जातीचे मासे भारतात सापडतात. मात्र आपल्याकडील नदीतील माशांना त्यांच्या जातीवरून ओळखायचे तर अव्वल दर्जाच्या मासेमारांनाही गोड्या पाण्यातील माशांची दीड ते दोन डझनहून अधिक नावे सांगता येणार नाहीत.

ठाणे, रायगड आणि रत्नागिरी पट्ट्यात जी गावे नद्यांच्या प्रदेशात येतात तेथे प्रामुख्याने वांब, आहीर, शिवडा, खवल, पाते, झिंगे, मळे, खर्बे, शिगटी ह्या प्रकारचे मासे सापडतात तर सांगली, सातारा, कोल्हापूर तसेच नाशिक, औरंगाबाद, जळगावकडे असणा-या धरणांच्या मोठ्या संख्येमुळे आणि जलक्षेत्राच्या विस्तृत उपलब्धतेमुळे रोहू, कटला, मृगळ आणि सायप्रिनस ह्या जातीचे मासे मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. माशांच्या ह्या चार जाती संवर्धनास सुलभ, भराभर वाढणाऱ्या आणि उत्पन्न मिळवून देणाऱ्या आहेत, त्यामुळे मासेबाजारातही त्या मोठ्या

प्रमाणावर दिसतात. पण चवीच्या बाबतीत बोलायचे तर वांब, आहीर, शिवडे, मळे, झिंगे इ. मूळ माशांना त्या मागे टाकू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

चवीच्या बाबतीत अगदी क्रमवारीच लावायची म्हटली तर आहिराच्या चवीला जगात तोड नाही. आहीर हा दुर्मिळ मासा असल्यामुळे तो खायला मिळणे ही एक पर्वणीच समजली जाते. सुके खोबरे, सुक्या मिरच्या, कांदा, लसूण इ. पदार्थांचा मसाला वापरून तयार केलेले त्याचे लिपथिपीत कालवण म्हणजे अगदी आनंदाचा ठेवा असतो. आहिराची वरची तैलयुक्त कातडी अतिशय स्वादिष्ट असते. ती जिभेवर ठेवताच वरच्यावर विरघळून उभ्या देहात तृप्तीची सुखद शिरशिरी निर्माण करून जाते. आहिराच्या तुकड्या जणू बर्फीच्या तुकड्या वाटतात. अशा स्वादिष्ट तुकड्यांचा आस्वाद घेतांना अन्न हे केवळ उदरभरण नसून यज्ञकर्म कसे आहे याचा प्रत्यय येतो!

आहीर खाऊन झाल्यानंतर हातावर दीर्घकाळ रेंगाळत रहाणारा त्याचा हवाहवासा ओशट गंध, मैफील संपल्यानंतरही मनात रेंगाळत राहिलेल्या सुरांसारखाच जीवाला सुखावत रहातो. गंमत म्हणजे रात्री तयार करून दुसऱ्या दिवशीचा शिळा आहीर खाण्यात अधिक मजा असते. आठवडाभर तो जितका शिळा होत जाईल तितका स्वादिष्ट होत जातो.

तसे पाहिले तर चव ह्या संज्ञेचा प्रत्यय शब्दांच्या माध्यमातून घेणे चुकीचे आहे, ती प्रत्यक्ष अनुभवण्याची बाब आहे. त्यामुळे जिज्ञासूंनी काहीही करून एकदा तरी आहिराचा स्वाद घेण्याचा निर्धार करून तो अंमलात आणावा ! असो. चवीच्या बाबतीत आहिराच्या खालोखाल वांबीचा क्रमांक लागतो आणि इतर मासे त्यांच्या नंतर येतात. अर्थात हे माझे व्यक्तिगत मत झाले !

ओल्या मिरच्या उभ्या कापून, हळद-मीठ लावून, तेलावर परतलेल्या फडफडीत मुऱ्या, बेसन पीठ लावून तळलेले मळे, सुक्या मसाल्यात केलेले शिवड्याचे लिप्ते किंवा वर तेल- मसाल्याचा लालसर तवंग असलेले वांबीचे कालवण यांची नुसती आठवण केली तरी मासे खाणाऱ्या माणसाचे चित्त विचलित झाल्याशिवाय रहात नाही. मीठ लावून निखाऱ्यावर भाजलेला झिंगा किंवा बोटभर लांबीचा मळ्याचा मासा आतील काट्यांसह हां हां म्हणता खाऊन टाकणे हा तर मत्स्याहारशास्त्राचा पहिला धडा आहे. कोकणातील अनेक मुलं लहान वयातच तो यशस्वीपणे गिरवताना दिसतात. अनेक ठिकाणी नुकतेच अन्न खायला लागलेल्या मुलांनाही आवडीने असले 'वशेट' भरवले जाते. ह्या लहान मुलांनाही त्याची इतकी आवड निर्माण होते की जेवताना जर 'बाऊ' दिसला नाही तर ती रडून घर डोक्यावर घेतात. इतक्या लहान वायातच त्यांची चव विकसित होते त्याचे मुख्य कारण म्हणजे माशाच्या अंगात मुळातच असणारा चविष्टपणा हे होय. आणि म्हणूनच की काय माशांची कोणतीही रेसिपी करायची असेल तर तेल,चटणी, मीठ आणि हळद एवढ्या किमान गोष्टी असल्या तरी भागते.

माणसाला एकदा का माशांची चटक लागली की त्या चवीच्या तावडीतून तो किंवा त्याच्या तावडीतून मासे सुटणे अशक्य असते. प्रत्यक्ष परमेश्वराने मत्स्यावतार घेतला आहे अशी बातमी समजली तरी पिशवी घेऊन बाजारात धावणारी मंडळी आपल्याला आढळून येतील असे विंदा करंदीकरांनी म्हटले आहे ते काय उगीच !

गळाने होणाऱ्या मासेमारीची माहिती करून घेण्यापूर्वी गळाला कोणकोणत्या प्रकारचे आमीष लावले जाते त्याची माहिती करून घेणे आवश्यक आहे. मासेमारांनी आमिषाचा अपभ्रंश 'आवीस' असा केला असून 'गांडूळ' हे सर्वश्रेष्ठ आमीष आहे असे ते मानतात. आणि ते खरेही आहे. कारण माशंच्या बहुसंख्य जाती गांडूळाचे आमीष अगदी आनंदाने खताना दिसतात. वांब आणि शिंगटी यांना तर ते सर्वाधिक प्रिय असते.

गांडूळ हा अपृष्ठवंशीय प्राणी आहे. प्राणिशास्त्रज्ञांनी त्याला 'ॲनालिडा' गटामध्ये भरती केलेले आहे. डास, चिलटे, उवा माश्या, ढेकूण इ. प्राण्यांना 'मनुस्मृती'मध्ये 'स्वदेज' असे म्हटले आहे. स्वदेज म्हणजे स्वतःच्या उबेपासून आणि ओलसरपणातून निर्माण होणारे प्राणी.(?) गांडळांचे अगदी आवडीचे ठिकाण असते.

गांडूळ जरी गरीब आणि निरुपद्रवी वाटत असला तरी तो बिलंदरही तितकाच असतो. यासंबंधीची एक गोष्ट सांगण्यासारखी आहे...

एका पुराणकथेतील एक गांडूळ एकदा चक्क नागाच्या घरी गेला आणि त्याला म्हणाला, 'नागराज' माझ्या मुलाला तुमची मुलगी द्यावी आणि आपण परस्परांचे सोयरे व्हावे या हेतूने मी तुमच्याकडे आलो आहे. ' हे ऐकून त्या क्षणी त्या शेषाच्या मस्तकावरची पृथ्वीसुद्धा क्षणभर हादरली. पण तरीही नागराज शांतपणे म्हणाले, 'हे गांडुळाधिपते, मी आपल्याला वंदन करतो. परंतु आम्ही शेषवंशीय आणि तुम्ही गांडूळवंशीय, तेव्हा आपल्याला सोयरीक कशी काय होणार ?' त्यावर तो गांडूळ म्हणाला, 'का नाही होणार ? तुमच्यात आणि आमच्यात काय फरक आहे ? तुम्ही जमिनीखाली रहाता, आम्हीही जमिनीखाली रहातो. तुम्हीही वळवळ करता, आम्हीही वळवळ करतो, त्यामुळे आपल्यात बेटी व्यवहार व्हायला कोणती अडचण आहे ?'
या युक्तिवादावर त्या नागाने थोडा विचार केला आणि म्हणाला, 'ठीक आहे, तुमची मागणी मला मान्य आहे. आपण वैशाख महिन्यात वऱ्हाड घेऊन लग्नाला या.'
हे ऐकून तो गांडूळ आनंदाने वळवळत निघून गेला.

वैशाखाच्या कडक उन्हाळ्यात गांडूळ जमिनीवर येणे अशक्य असते हे सांगायला नकोच! त्यामुळे गांडूळ आणि शेष यांच्यातील ते शुभमंगल अद्याप पार पडलेले नाही!  तर उन्हाळ्याचा हंगाम सोडल्यास इतर वेळी वर्षभर गांडूळ मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असतात. आंघोळीच्या पाथरीखाली, शेणकीमध्ये, कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली गांडूळांची पैदास मोठ्या प्रमाणावर होत असते.

गांडूळ दोन प्रकारचे असतात. एक म्हणजे जाडे गांडूळ आणि दुसरे बारीक गांडूळ. जाड्या गांडळांना 'दानवे' तर बारीक गांडळांना 'काडू' असे म्हटले जाते. जाडा गांडूळ हा वडाच्या पानाच्या देठाइतका जाड असतो. त्याला मधेमध तोडून एका बाजूने दाबत नेला तर साच्यातून पडावी तशी माती त्याच्या देहातून खाली पडते. बारीक गांडूळ हा इतका बारीक असतो की बॉलपेनच्या रिफीलमधून एका बाजूने शिरुन दुस-या बाजूने सहज बाहेर पडू शकतो. दोन्ही प्रकारचे गांडूळ करड्या तपकिरी रंगाचे असतात. मात्र काळसरपणाची झाक थोडी अधिक असते.

हे मऊ, लुसलुशीत, चटकदार आमीष माशांना फार आवडते. माशांना ते जितके आवडते त्यापेक्षा ते मासेमारांना अधिक प्रिय असते. गरगटाच्या पानात थोडी माती टाकली आणि त्यात थोडे गांडूळ गुंडाळून घेतले की ते बरेच दिवस टिकू शकतात. गरज पडेल तेव्हा काढून गळाला लावल्यामुळे माशांना ताजे आमीष मिळते व ते गळाकडे चटकन आकर्षित होतात. गांडळाच्या आमिषाचा सर्वाधिक महत्त्वाचा फायदा म्हणजे ते गळावर अगदी शिस्तशीरपणे बसते. इतके की त्या गांडळाच्या पोटात गळ असेल असा संशय क्वचितच एखाद्या माशाला येत असावा.

पावसाळ्यात रस्त्यावरचा एखादा दगड जरी उलटा केला तरी त्याखाली दहावीस गांडूळ हमखास सपाडतात... अशा तऱ्हेने विनासायास, विनामूल्य मिळणारे आमीष कुणाला आवडणार नाही ? म्हणून गांडूळ हा जसा शेतकऱ्यांचा मित्र समजला जातो तसाच तो मासेमारांचाही मित्र समजावयास हरकत नाही. अर्थात ही मैत्री एकतर्फी असून ती गांडळांच्या प्राणावर बेतते हे खरे आहे, पण 'जीवो जीवस्य जीवनम्' हा सृष्टीचा नियम आहे, त्याला आपण तरी काय करणार ?

गांडळांच्या खालोखाल, लहान लहान कोलंब्यांचे आमीष माशांना आणि मासेमारांनाही आवडते असे म्हणावे लागेल. छोटी कोलंबी आणि गळ ह्यांचा आकार समान म्हणजे काजुगरासारखा असतो. त्यामुळे छोटी कोलंबी गळावर अगदी सहजगत्या चढवता येते. ती तिच्या शेपटीकडून गळावर चढवली जात असल्यामुळे तिचे तोंड आणि मिश्या गळाच्या बाहेरच रहातात. आणि त्यामुळे जिवंत कोलंबी आपल्यासमोर आली आहे असे माशांना वाटते. तिचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे ती वर्षाचे बाराही महिने नदीत उपलब्ध असते. नदीच्या काठी जेथे पाणवनस्पती वाढलेल्या असतात किंवा जेथे लहान-मोठ्या दगडांचा ढिगारा पडलेला असतो तेथे ह्या कोलंब्या संथपणे तरंगताना दिसतात. मात्र त्यांना फार बारीक नजरेने पहावे लागते. कारण त्यांचा रंग आणि पाण्याचा रंग जवळ जवळ सारखाच असतो. माणसाची नुसती चाहूल लागली तरी त्या झप्कन अधिक सुरक्षित जागी जाऊन लपून राहतात.

नदीवर गेल्यानंतर झेल्याने किंवा वेळप्रसंगी मिळेल त्या कापडाचा जाळ्यासारखा वापर करून कोलंब्या पकडाव्या लागतात. म्हणजे नदीतील मोठी शिकार करण्यापूर्वी आधी ही छोटी शिकार करावी लागते. रामचंद्र तात्या केवळ हातांचा पसा जाळ्यासारखा वापरून कोलंब्या पकडत असत. ज्या ठिकाणी कोलंब्यांची वस्ती असे त्या कपारीतून केवळ हाताच्या पशाने कोलंब्यांना हळूहळू ते बाहेर काढत आणि योग्य जागा मिळताच पसा एकदम दगडावर घट्ट दाबून धरत. त्यांच्या त्या पशात पाचदहा कोलंब्या 'टॅप' झालेल्या असत. केवळ 'बॉडी प्रॉपर्टी' च्या सहाय्याने त्यांनी पकडलेल्या त्या कोलंब्या मला लाख मोलाच्या वाटत.

कोलंबी हे मुळात अतिशय स्वादिष्ट असे आमीष आहे, त्यामुळे ते सर्व मांसाहारी माशांना आवडते. परंतु जेवढ्या मोठ्या प्रमाणावर गांडूळ उपलब्ध होतात तितक्या मोठ्या प्रमाणावर कोलंब्या उपलब्ध होत नसल्यामुळे मासेमार त्यावर विशेष विसंबून रहात नाहीत.

बोटभर लांबीचा मळ्याचा मासा, भिंगुर्डा, किंवा तितक्याच लांबीची पितुर्डीसुद्धा गळाला लावता येते. अर्थातच मोठ्या माशांसाठी हे आमीष मोठ्या गळावर लावायाचे असते. मोठ्या माशांची शिकार करावयाची असेल तर त्याला गांडूळ किंवा कोळंबीचे आमीष चालत नाही. त्यासाठी वापरण्यात येणारा गळही चांगला दीड-दोन इंचांचा असतो. शिवाय तंगूसही जाड असतो. अशा मोठ्या गळावर मळा, भिंगुर्डा, पितुर्डी किंवा दांडी आरामात चढवता येते. पावसाळ्याच्या हंगामात पावसाचा पहिला झपाटा सुरु झाला की प्रचंड पाणी वरून वहात खाली यायला लागते. लालभडक रंगाच्या पाण्याची नदी दुथडी भरुन वाहू लागते. अशा वेळी दूरदूरच्या क्षेत्रातले काही बुजुर्ग मासे विस्थापित होतात आणि पाण्याशी शक्य तितकी झुंज देत स्वतःचा जीव वाचवत वहात रहातात. पाण्याच्या प्रचंड लोंढ्यामुळे त्यांना खायलाही मिळेनासे झालेले असते. पाणी खदूळ झाल्यामुळे त्यांच्या श्वसनासाठी प्राणवायूही कमी पडत असतो. अशा अस्वस्थ स्थितीत जेव्हा त्यांच्यासमोर मोठ्या माशाचे आमीष पडते तेव्हा ते क्षणाचाही विलंब न लावता त्यावर तोंड टाकतात आणि आपले मरण ओढवून घेतात.

नदीला जेव्हा पूर येतो तेव्हा असे अनेक मासेमार एखाद्या उंच ठिकाणाहून किंवा पुलावर उभे राहून लांब दोरीच्या गळाने मासेमारी करताना हमखास दिसतात. त्यांच्यापैकी एखाद्याच्या गळाला चांगला दीड-दोन फूट लांबीचा, हस्तीदंती रंगाचा मिशीवाला शिवडा किंवा सुंदर खाशी सुबक ठेंगणी तांबोशी लागलेली दिसतेच दिसते.

गांडूळ हा जेव्हा आमिष म्हणून लावला जातो तेव्हा तो अर्धवट जिवंत असतो हे खरे आहे. पण पाण्यात टाकल्यावर काही वेळाने तो मरण पावतो हेही. जिवंत आमिष आणि मृत आमिष यांची गुणवत्ता वेगळी असते हेही लक्षात घेतले पाहिजे. गळाला लावल्यानंतर पाण्यातही जिवंत राहील असे एखादे आमीष उपलब्ध नाही का ? ह्या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी आहे. जिवंत पितुर्डी किंवा दांडी लावूनही मासेमारी करता येते. ज्या ठिकाणी पाण्याची खोली अधिक आहे, पात्र विस्तृत आहे आणि पाणी निवळले आहे अशा ठिकाणी या प्रकारची मासेमारी करता येते. त्यासाठी जिवंत दांड्या वा पितुर्ड्या आधीच पकडून पाणी भरलेल्या डब्यात वा पातेल्यात ठेवायच्या असतात. गळाला लावण्यासाठी दांडी वा पितुर्डी बाहेर बाढल्यानंतर ती गळात ओवण्याऐवजी तो गळ तिच्या पाठीच्या कण्यातून अर्धा बाहेर काढायचा. गळाचे पुढचे टोक सापाच्या दातासारखे अर्धे उलटे फिरलेले असल्यामुळे त्यातून ते बाहेर पडू शकत नाही. आणि केवळ त्याच्या मणक्यातून गळ बाहेर काढलेला असल्यामुळे ते आमीष मरुही शकत नाही.

जिवंत आमिषाचा हा गळ नंतर लांब पाण्यात फेकून द्यायचा असतो. पाण्यात पडल्यानंतर तो छोटासा मासा तेथे पोहणे सुरू करतो, परंतु पाठीत गळ अडकलेला असल्यामुळे त्याच्या फिरण्याला मर्यादा पडतात. तो एका विशिष्ट जागेतच रिंगण घालत रहातो. सामान्यत: दांडी किंवा पितुर्डी ह्या जातीचे मासे नदीच्या काठाजवळच्या भागात कळपाने फिरत असतात. त्यामुळे खोल पाण्यात फेऱ्या मारणारी ती एकमेव दांडी किंवा पितुर्डी मोठ्या माशांचे लक्ष चटकन आकर्षित करुन घेते.

माशांच्याही काही सवयी असतात. जर गळाला मृत आमीष असेल तर ते आधी त्या गळाजवळ जाऊन त्याचा वास घेऊन बघतात. नंतर हळूहळू ते त्या आमिषाला ढुसण्या मारु लागतात. आणि पूर्णपणे खात्री झाल्यानंतरच मग ते आमीष गिळतात. परंतु जेथे आमीष म्हणून बोटाएवढा जिवंत मासा फिरत असतो तेथे मोठ्या माशाला अशी

चाचणी घेण्याची गरज वाटत नाही. अशा प्रकरणात तो दुरुनच आपल्या भक्ष्याचा अंदाज घेतो आणि एका झेपेतच जबड्याचा शक्य तितका आ वासून आमीष गिळंकृत करतो. अर्थातच आमिषाच्या पाठत असणारा गळही त्याच्या पोटात जातो आणि तो पोटात अडकून त्याची शिकार होते.

मांसाहारी अमिषामध्ये बेडूक ह्या प्राण्याचाही उल्लेख करावयास हवा. त्याचे आमीष खेकडी पकडण्यासाठी किंवा आहिराला चाळवण्यासाठी वापरले जाते. फार पूर्वीच्या काळी सुसरीची शिकार करण्यासाठीही बेडकाच्या आमिषाचा वापर केला जात असे. गोगलगायी किंवा विविध प्रकारच्या खुब्या आणि हिरव्या रंगाचा टोळ यांचाही आमीष म्हणून वापर केला जातो. खेड - चिपळूण भागात मासेमारीची आणखी एक पद्धत असून त्या पद्धतीत खुब्यांचे मांस आमीष म्हणून गळाला लावले जाते.

साधारपणे कंबरभर पाणी असेल अशा पात्रात ही मासेमारी केली जाते. येथे तंगुसाच्या ऐवजी एक लांबलचक मजबूत असा तागी दोरा वापरला जातो. किना-याच्या एका टोकापासून ते दुसऱ्या टोकापर्यंत पोहोचू शकेल इतकी त्याची लांबी असते. त्या दोन्याला प्रत्येक दीड-दोन फूट अंतरावर एकेक लोंबता गळ बांधलेला असतो. एकदा का तो मोठा दोरा नदीच्या एका काठापासून दुसऱ्या काठापर्यंत बांधला की त्याचे मधले गळ बरोबर नदीच्या पात्रतील पाण्यात पडतात. त्या गळांना खुब्यांचे आमीष लावलेले असते. मात्र हा दोरा बाहेरून कुणालाही दिसणार नाही अशा पद्धतीने पाण्याच्या आतच बांधून ठेवलेला असतो.
ह्या पद्धतीने मासेमारी करणारे मासेमार संध्याकाळच्या वेळेला तो दोरा बांधून निघून जातात आणि पहाटे फटफटण्याच्या सुमारास परत येऊन आपापले दोरे बाहेर काढतात, तेव्हा खर्बे, शिवडे, खवल, शिंगटी, पाती इ. प्रकारचे मासे गळात अडकलेले दिसतात.

ह्या ठिकाणी खुब्यांचेच आमीष का लावले जाते असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. त्याचे उत्तर असे आहे की ते गळ रात्रभर पाण्यात पडून असतात. अशा वेळी विसविशीत किंवा माशांना टोचलून - टोचलून खात येईल अशा प्रकारचे आमीष लावणे धोक्याचे असते. खुब्यांचे आमीष हे अतिशय चिवट असून तुटता तुटत नाही किंवा गळातून सुटतही नाही. त्यामुळे त्याचा अनुनय करून कंटाळलेला मासा अखेर गळासहित आमीष गिळतो आणि स्वत:हून मृत्यूच्या दाढेत जातो.

खवल पालवण्यासाठी हिरवा टोळ अर्थात नाकतोडा गळाला लावला जातो हे ऐकून अनेकांना आश्चर्य वाटण्याची शक्यता नाकारता येत नाही. (पण ही वस्तुस्थिती असून पालवण्याविषयीची माहिती पुढे येणारच आहे.)
खवलासारखे किंवा पाण्याच्या वरच्या थरात राहणारे शकाहारी मासे मारण्यासाठी जाते. पिठात थोडी हळद व मीठ टाकून ते कालवून घ्यायचे. त्याचा उंडा बनवून तो निखाऱ्यावर चांगला भाजून घ्यायचा. नंतर त्याचे वाटाण्याएवढे गोळे करुन गळाला लावून पाण्यात टाकायचे. हे शाकाहारी आमीष खवलांना फार आवडते. त्याचा खरपूस वास आणि चित्ताकर्षक पिवळा रंग माशांना चट्कन आकर्षित करुन घेतो.

प्रत्येक वेळी मासे पकडण्यासाठी आमीष लावावे लागते अशातला भाग नाही, तर काही ठिकाणी कंडाळ लावून, काही ठिकाणी बांधण घालून तर काही ठिकाणी पागानेही मासेमारी केली जाते. इतकेच नाही तर कधी विषारी पाना-फळांनी माशांच्या वसतीस्थानांची नाकेबंदी करुन तर कधी घायाळ करणाऱ्या चिकाने त्यांच्यावर हल्ला करुनही मासेमारी केली जाते.

मध्यंतरी पाण्यात बॉम्बस्फोट घडवून मासेमारी करण्याची पद्धत काही जणांनी शोधून काढली होती. अजूनही अधून-मधून कोठेतरी असा प्रकार होत असल्याचे
आढळून येते. वस्तुत: बॉम्बने मासे मारणे हा प्रकार अगदी अमानुष आहे. कारण बॉम्बच्य स्फोटामुळे फक्त मासेच मरत नाहीत तर त्या परिसरातील संपूर्ण जलजीवनाची हानी होते. हे लक्षात घेऊन बॉम्ब टाकून मासे मारणे हा दखलपात्र गुन्हा ठरविण्यात आला आहे. शासनाने केलेल्या ह्या तरतुदीनंतर मात्र ह्या प्रकारच्या मासेमारीस बराच आळा बसला आहे.

माशांच्या आमिषांविषयी विचार करताना ही जी काही ढोबळ माहिती हाती आली त्यावरून एक गोष्ट लक्षात येते, ती ही की एक तर माशांना त्यांचे आवडते आमीष गिळायला लावून थोड्याफार खिलाडू कृतीने त्यांची शिकार केली जाते किंवा अन्य प्रकारच्या शक्तीचा वापर करुन त्यांचा संहार केला जातो. बहुसंख्य मासेमार माशांकडे केवळ उत्पन्नाचे साधन किंवा अन्न म्हणून पाहतात, परंतु काही निवडक मासेमारांना मासेमारी हा एक अभिजात असा क्रीडाप्रकार वाटतो. जे हाडाचे मासेमार आहेत ते माशाला कधीही कमी लेखत नाहीत किंवा कपटाने त्याची शिकार करीत नाहीत, तर माशाला ते सामर्थ्यशाली प्रतिस्पर्ध्याचा दर्जा देतात. समोरासमोरच्या लढ्याचे आव्हान देतात. माशांकडून पराभूत झाल्याचे प्रसंगही ते पराक्रम गाजवल्याच्या ऐटीत इतरांना सांगताना आढळतात. अशा मासेमारांच्या हातून मरणारे मासेही स्वत:ला भाग्यवान समजत असतील ह्यात शंका नाही. परदेशात अनेक ठिकाणी मासेमारी हा एक क्रीडा प्रकार म्हणून प्रचलित असून पकडलेले मासे पुन्हा पाण्यात सोडून देण्याची पद्धत आहे.

गळाने मासे मारणे ही अगदी सर्वमान्य आणि सोपी पद्धत आहे. मासे खाण्याची वैयक्तिक गरज भागविण्यासाठी अनेक जण गळाने मासे मारायला जातात. तर काही जण छंद म्हणूनही जातात. गळाने एकेक मासा मारत बसणे हे जरी व्यावसायिक मासेमारांना परवडणारे नसले तरी त्यावरही उपजीविका करणारे अनेक मासेमार आहेत.
जी माणसे छंद म्हणून मासे मारायला जातात त्यांच्या त्या छंदाचे हळूहळू व्यसनात रुपांतर होते. पण हे व्यसन मात्र प्रत्येकाला लागावे इतके चांगले आहे असे मी म्हणेन. कारण मासेमारीत वेळ घालवणे ह्यासारखे वेळेचा सदुपयोग करण्याचे दुसरे साधन नाही.

गळाने मासेमारी करणारा माणूस हा जवळजवळ समाधी अवस्थेप्रत पोहोचलेला असतो. त्याच्यामध्ये आणि निसर्गामध्ये एकप्रकारचे सुखद अद्वैत निर्माण झालेले असते. अशा उत्कट क्षणी तो एकप्रकारच्या अवीट आनंदाचा धनी होत असतो. ह्यांत शंका नाही. निर्गुणाचा संग धरिला जो आवडी, त्याने देशोधडी केले मायबापा असे गोरा कुंभाराने म्हटले आहे, पण ज्याने मासेमारीचा संग धरिला तो स्वत:लाही कसा देशोधडी करुन टाकतो याची प्रचिती अनेक अभिजात मासेमारांनी घेतली असेल.

आजच्या धकाधकीच्या जीवनात ज्याला आपल्या दैनंदिन विवंचनांपासून निदान काही काळ तरी मुक्ती मिळवायची असेल तर त्याने इडियट बॉक्स समोर बसण्याऐवजी खुशाल गळाठी खांद्यावर टाकावी आणि मासेमारीसाठी बाहेर पडावे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष निवडणुकांचे निकाल जाहीर होताच थेट मासेमारीसाठी का निघून जातात किंवा नेपोलियनला हौदात मासे पाळून त्यांचे निरीक्षण करण्याचा छंद का होता याचा तरी त्यांनी पडताळा घेऊन पहावा !

गळाने मासे मारण्यासाठी जी साधने लागतात त्यांत एक ते दीड मीटर लांबीची मेसाची काठी, जिला सटका असेही म्हणतात, पाण्याच्या खोलीनुसार तंगूस, गळ, थोडे शिसे आणि आमीष इतक्या वस्तूंचा समावेश असतो. तंगुसाच्या एका टोकाला गळ बांधून त्याच्या वितभर मागे एक छोटासा शिशाचा गोळा बांधायचा असतो. ह्या गोळ्यामुळे गळ पाण्यावर तरंगत न राहता तळाशी बुडून बसतो आणि त्यामुळे आमिषाकडे माशांचे लक्ष आकर्षित होते. शिवाय वाहत्या पाण्यात गळ वहात जाऊन वरच्यावर राहू नये ह्यासाठीही शिशाचा फायदा होतो. ज्या ठिकाणी संथ पाणी असेल तेथे शिसे न बांधताही गळ टाकता येतो, परंतु तो पाण्याच्या तळाशी जाईपर्यंत वरच्या थरातले मासे टोचलून टोचलून आमीष खाऊन टाकतात. त्यामुळे गळामागे थोडे शिसे बांधणे नेहमीच फायद्याचे ठरते. तंगुसाचे दुसरे टोक सटक्याच्या निमुळत्या टोकाला बांधले की झाली गळाठी तयार !

नवशिके मासेमार गळ पाण्याच्या तळाशी जेमतेम पोहोचेल एवढे अंतर सोडून वर तंगुसाला मोराच्या पिसाची किंवा तत्सम अन्य हलकी काडी बांधतात. त्यामुळे आमिषाला एखाद्या माशाने स्पर्श केला किंवा ढुशी दिली की वरती तरंगणारी काडी हलते. त्या काडीच्या हालचालीवरुन पाण्यातील माशाच्या स्थितीचा अंदाज घेत नवशिके मासेमार मासेमारी करतात.

अट्टल मासेमार मात्र आपल्या गळाला अशी कांडी बांधणे अपमानास्पद समजतो. तो आपला तंगूस ज्या ठिकाणी पाण्यात बुडालाय त्या बिंदूवर चित्त एकाग्र करून बसतो आणि त्या बिंदूजवळ उमटणाऱ्या तरंगांवरून तो पाण्यातील माशाची जात, त्याचे वय, वजन इत्यादींचा अंदाज बांधून आपली पुढील व्यूहरचना करीत असतो. निर्णायक क्षण आला की तो हातातल्या सटक्याला योग्य दिशेने योग्य तेवढा ताण देऊन हिसडा मारतो. ह्या क्रियेला मासा फारणे असे म्हणतात. मासा व्यवस्थित फारला गेला की तो गळातून सुटू शकत नाही. मग काही क्षणांतच माशाला बाहेर काढून टोक्यात टाकले जाते.

मासा फारणे ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही. ती एकप्रकारची साधनाच असत. आणि त्यात नशिबाचा भागही असतोच. गळ पाण्यात टाकला की लगेच मासा लागला असे कधीही होत नाही. कधी कधी तर तासन् तास मोडूनही मासेमाराला हात हलवत परत यावे लागते. मात्र एखाद्या दिवशी जर चांगलाच सूर लागला तर भरभर मासे मिळत जातात. ह्या अनिश्चित परिस्थितीमुळे अनेक मासेमार दैववादी झालेले दिसतात. पाण्यात टाकलेल्या गळाला मासा लागावा म्हणून ते उघडपणे आणि मनातल्या मनात देवाला साकडे घालत असतात.

मासे पकडण्यासाठी मासेमार ज्याप्रमाणे डावपेच आखत असतो त्याचप्रमाणे मासेही त्या गळाला बळी न पडता त्यावरचे आमीषच तेवढे कसे लंपास करता येईल याविषयी आपल्याही चाली रचत असतात. ज्याचे डावपेच वरचढ ठरतात त्याचा विजय ठरलेलाच असतो !

हेमिंग्वेची द ओल्ड मॅन अँड द सी ही कादंबरी ज्यांनी वाचली असेल त्यांना त्यातील मासा आणि माणूस ह्यांच्यातील उत्कंठावर्धक संघर्ष आठवत असेल... मासा पाण्यात आणि माणूस भूमीवर असतो. अशा या दोन भिन्न माध्यमांतील प्रतिस्पर्धी एकमेकांवर मात करण्याचा प्रयत्न करीत असतात. दोन्हीही आपापल्या ठिकाणी राजे असतात आणि शत्रुपक्षाला नामोहरम करण्याची स्वप्ने पहात असतात. म्हणूनच या लढतीचा अनुभव घेणे म्हणजे स्वतःच्या सामर्थ्याची परीक्षा घेण्यासारखेच असते.

शिंग्टे नावाचा जो मासा असतो तो अगदी बिलंदर असतो. हुषारही तितकाच असतो. गांडुळाचे आमीष एकापाठोपाठ एक करून त्याच्यासमोर पडायला लागले की तो ओळखतो की हा गांडूळ म्हणजे यमाचा सहोदर असून प्रत्यक्ष यमराज आपल्याला दिसणार नाही अशा ठिकाणी बसून राहिलेले आहेत. अशा वेळी ते शिंग्टे आणि त्याचे आप्तेष्ट मासेमाराला दमविण्यासाइी एक नामी शक्कल लढवतात.
पाण्याच्या तळाशी पडलेला गळ शिंग्टी अगदी जेमतेम तोंडात धरतात आणि सुर्रकन् खबदाडीत नेऊन तेथे अडचणीच्या जागेत अडकवून ठेवतात. अशा तऱ्हेने अडकवण्यात आलेला गळ बाहेर काढणे ही मासेमाराच्या दृष्टीने एक मोठी समस्याच होऊन बसते. कारण पाण्यात तो गळ जेथे अडकवलाय त्या ठिकाणाची अंतर्गत रचना कशी आहे हे त्याला वरुन समजत नाही. तो वेगवेगळ्या दिशांनी गळाला ताण देऊन पहातो. त्याचे नशीब बलवत्तर असेल तर गळ सुटतो, पण तोपर्यंत शिंगट्यांनी टोचलून टोचलून गळावरचे आमीष खाऊन टाकलेले असते.
मग पुन्हा एकदा आमीष लावून गळ पाण्यात टाकायचा आणि पुन्हा शिंग्ट्यानी तो अडकवून ठेवायचा, असा वैतागवाणा खेळ सुरु होतो. अशा वेळी मासेमाराचे मानसिक संतुलन बिघडल्यास गळ सोडवताना अनेकदा तो तुटूनही जातो. शिंगटी वारंवार असा त्रास द्यायला लागली की तिथले मासे चावट झाले आहेत असे म्हटले जाते आणि मग तो मासेमार आपली सारी आयुधं उचलून तेथून चालता होतो.

शिंग्टी चवीला उत्तम असली तरी ती अशी व्रात्य असल्यामुळे कधी कधी मासे नको पण गळ आवर असे म्हणण्याची पाळी येते. शिवाय त्यांच्या कल्ल्याखाली दोन धारदार काटे असतात. त्यामुळे शिंग्टे गळातून सोडवताना काळजीपूर्वक सोडवावे लागते. नाहीतर त्याने जर आपला काटा मारला तर त्या ठिकाणहून रक्त तर निघतेच, पण नंतर विंचवाच्या दंशासारखा फणकाराही मारत रहातो.

गळाने मासेमारी करणारांचे मुख्य शत्रू म्हणजे खेकडे ! ज्या ठिकाणी आपण मासेमारीसाठी जातो तेथे जर खेकड्यांचा राहुटा असेल आणि आपण जर तेथे गळ टाकला तर खेकडी आपल्या धारदार नांग्याने तो तंगुसाजवळ कातरतात आणि हलका झालेला गळविरहित तंगूसच फक्त वर आपल्या हातात येतो. अशा वेळी आपल्याकडे जर अतिरिक्त गळांचा साठा नसेल तर स्वत:वर आणि खेकड्यांवर चरफडण्याशिवाय आपल्या हातात काहीच रहात नाही.

गळाला अनेकदा वांबीही लागतात. चिचुंद्रीसारखे निमुळते होत गेलेले तोंड आणि लांबलचक देहयष्टी आणारा हा मासा अतिशय रुचकर पण मरायलाही तितकाच चिवट असतो. थोडे बारकाईने पाहिल्यास वांबीच्या अंगावर वेलबुट्टीसारखी नक्षी दिसते. तिच्या शेपटीचा तडाखा फार जबरदस्त असतो. आणि तिच्या पाठीच्या कण्यावरील उलट्या करवतीसारखी काट्यांची रांग म्हणजे तर साक्षात् रक्तपाताचे आव्हानच असते !

गळ खबदाडीत नेऊन अडकवून ठेवण्याची सवय जशी शिंग्यांना असते तशी वांबींनाही असते. पण कधी कधी काय होते की गळ ओढून नेता नेता तो वांबींच्या तोंडात अडकण्याचीही शक्यता असते. अशी तोंडात गळ अडकलेली वांब जेव्हा एखाद्या कपारीत जाऊन बसते तेव्हा मासेमाराची खरी पंचाईत होते. कारण गळावर शिकार तर झालेली असते पण ती हाती लागत नाही.  तंगूस जोरात ओढावा तर तो तुटण्याची शक्यता असते आणि वांबीला तशीच सोडून द्यायची तर तेही मासेमाराला अपमानास्पद वाटत असते. अशा वेळी गळ अलगद सोडवून वांबीसह बाहेर काढण्यासाठी एक युक्ती असते.

गळाठीच्या मापाची पण जाडीने त्याहून बारीक आणि लवचिक अशी मेसाची काठी घ्यायची. पाण्यात अडकलेल्या गळाच्या तंगुसाला तिचे पुढचे टोक मागे-पुढे सरकेल अशा पद्धतीने बांधायचे नंतर त्या तंगुसाच्या आधाराने आणि रोखाने ती काठी हळूहळू पुढे सरकवत न्यायची. ज्या ठिकाणी तोंडात गळ अडकलेली वांब बसली असेल ते एखादे अरुंद विवर जरी असले तरी त्यातून ती काठी हळूहळू पुढे घालून वांबीच्या तोंडाला डिवचता येते. एकदा का तिला डिवचले की ती जीवाच्या आकांताने आपली जागा बदलण्याची खटपट करते. त्या मधल्या बेसावध क्षणी तिला झटका देऊन बाहेर काढायचे असते. एकदा का तिला पाण्याच्या मोकळ्या मैदानात आणले की मग तिला काठावर आणणे हे त्या मासेमाराच्या मनगटाच्या जोरावर अवलंबून असते.

या पद्धतीने गळ सोडवण्यासाठी काही जण मेसाच्या काठीऐवजी लव्हाळीचाही वापर करतात. पण ह्या पद्धतीत गळ सोडवताना मासेमारास पाण्यात उतरावे लागत असल्यामुळे त्याला काठावर आणखी एक सहकारी असण्याची गरज असते.

गळाने झिंगे मारणे हा अतिशय वेळकाढू पण कौशल्यपूर्ण असा खेळ असतो. मोठ्या कोलंबीला झिंगा असे म्हटले जाते. तो गळाला लागणे आणि खायला मिळणे हा एक योगच समजला जातो. त्यामुळे झिंगे जर कधी बाजारात आले तर ते विकत घेण्यासाठी गि-हाइकांची झुंबड उडते.
झिंगे कळपाने राहतात हे आपण मागेच पाहिलेले आहे. कधी कधी काय होते की आपण दुसऱ्याच माशांच्या शिकारीसाठी गेलेले असतो. पण तेथे अचानक झिंग्यांचा तांडा उपस्थित होतो आणि मग आपली चांगलीच पंचाईत होते.

झिंगे गळ गिळू शकत नसल्याने आपल्या नांग्यांनी ते गळ पकडतात आणि अतिशय वेगाने ताणत नेतात. त्या वेळी मासेमाराला वाटते की एखादा मोठा मासा आपल्या गळाला लागलेला असावा, म्हणून तो मोठ्याने हिसडा देतो. पण

त्याच क्षणी झिंगा गळ सोडून देतो आणि फक्त हलका झालेला गळच वरती येतो. असे पाच-सहा वेळा झाले की तेथे झिंगा उठलाय हे मासेमाराच्या लक्षात येते आणि मग तो आपली मासेमारीची शैली बदलतो.

झिंगा ज्या वेळी गळ ताणत नेतो त्या वेळी त्याच्या कलाने तंगूस सैल सोडायचा असतो. जोपर्यंत झिंगा गळ ताणत नेतो तोपर्यंत आपणही तंगूस सैल सोडल्यामुळे आता आपल्याला काही धोका नाही असे झिंग्याच्या लक्षात येते व तो थांबतो. थांबला की आपण त्याला आणखी थोडा वरच्या दिशेने ताण द्यायचा असतो. त्यावर तो झिंगा पुन्हा अन्य ठिकाणी गळ ताणत नेतो. आपण पुन्हा तंगूस सैल सोडायचा आणि पुन्हा त्याला ताण देताना झिंग्याला आणखी थोड्या वरच्या पातळीवर आणायचे. प्रत्येक वेळेला ताण देताना झिंग्याच्या लक्षात येणार नाही अशा तऱ्हेने त्याला हळूहळू वर आणायचे असते. अशा तऱ्हेने त्याला खेळवत खेळवत पाण्याच्या पृष्ठभागापर्यंत आणले की मग मात्र एक हळुवार लवचीक झटका देऊन त्याला बाहेर काढायचे असते. एकदा का झिंगा पाण्याच्या माध्यमातून हवेच्या माध्यमात आला की अधिकच घाबरून गळ नांग्यांनी अधिक घट्ट धरून ठेवतो व त्यामुळे खात्रीने आपल्या तावडीत सापडतो.

नाजूक, गोंडस शेपटीचा, कुरळ्या- कुरळ्या पायांचा, कवचाला केशरी झूल असणारा, झोकदार झिपऱ्या मिश्यांचा आणि मुलायम गुलाबी - राजस व्यक्तिमत्वाचा झिंगा पाण्यातून वर येताना लांड्या स्कर्टमधली, बॉबकट केलेली एखादी अँग्लोइंडियन पोरगीच बाहेर आली की काय असे वाटते. अर्थात झिंगा पकडण्यासाठी ज्या कौशल्याने त्याचा अनुनय करावा लागतो त्या कौशल्याने जर एखाद्या मुलीचा अनुनय केला तर झिंग्याच्या आधी ती मुलगीच पदरात पडावयाची शक्यता जास्त !

गरवणे ही मासेमारीची एक अवघड पद्धत असून फक्त सराईत मासेमारच तिचा अवलंब करतात. पाण्यात बुडी मारून, माशाच्या निवासस्थानाचा शोध घेऊन आमीष थेट माशाच्या तोंडासमोरच खेळवणे आणि माशाने त्यावर चावा टाकताच त्याला फारून बाहेर काढणे या पद्धतीत अंतर्भूत असते.

गळाने मासे मारण्याच्या परिपूर्ण आयुधाला जसे गळाठी किंवा सटका असे म्हणतात त्याचप्रमाणे गरवून मासे मारण्याच्या साधनाला गरी असे म्हणतात. गरीमध्ये गळाठीतील तंगूस आणि गळ तसाच असतो. फक्त लांबलचक काठीच्या ऐवजी फूट- दीड फूट लांबीची एक हिरवीगार लवचीक लव्हाळी असते. गरीने मोठ्या माशांची शिकार करावयाची असल्याने तिचा गळ मोठा असतो आणि तंगूसही चांगला जाड असतो.

गळाला गांडळाचे किंवा कोलंबीचे आमीष लावल्यानंतर गळाच्या पुढचे तीक्ष्ण धारदार टोक अलगद लव्हाळीच्या शेंड्याजवळ रोवायचे असते. यासाठी लव्हाळीच्या शेंड्याशी असणारा तुरा आधीच खुडून टाकायचा असतो. नंतर ती लव्हाळी स्वत:भोवती प्रदक्षिणा घालत असल्यासरखी फिरवून तो तंगूस तिच्याभोवती गुंडाळायचा असतो. उरलेला तंगूस आपल्या मनगटाला गुंडाळून त्याचे दुसरे टोक पाण्यात मोकळे सोडून द्यायचे असते.

एवढी तयारी झाल्यानंतर मासेमार एक दीर्घ श्वास घेऊन पाण्यात बुडी मारतो. खाली डोके आणि वरती पाय अशा अवस्थेत माशांच्या बिळांचा शोध घेऊन, त्यात गरी घालून तो ती हळुवारपणे मागे-पुढे करीत रहातो किंवा बिळाच्या तोंडाशी झुलवत ठेवतो. आपल्या घरात आपल्या अगदी तोंडाशी आलेले आमीष हातचे घालवायला वांबी सहसा तयार नसतात. त्या पट्कन आमीष गिळतात आणि त्यानंतर तो मासेमार हातातील तंगुसाला झटका देऊन, योग्य त्या दिशेने फारून वांबींना बाहेर काढतो.

वेळेचे भान राखणे हा या प्रकारच्या मासेमारीतील फार महत्वाचा घटक असतो. कारण मासेमार आपल्या राज्यात म्हणजे जमिनीवर नसून माशांच्या राज्यात गेलेला असतो आणि तेथील सर्वथैव प्रतिकूल अशा जलावरणात जाऊन मासेमारी करीत असतो. हा प्रकार म्हणजे बलाढ्य प्रतिस्पर्ध्याला त्याच्याच घरात शिरून चारीमुड्या चीत करण्यासारखे कृत्य असते. छातीतील श्वास आणि आमीष गिळल्यावर माशाला फारणे यात जर 'टाइमिंग'च्या दृष्टीने विसंवाद निर्माण झाला तर अपयश हे ठरलेलेच असते.
शिवाय घेतली गरी, मारली बुडी की मिळाला मासा, असे कधीही होत नाही. त्यसाठी आधी त्या ठिकाणी बुड्या मारून मारून तिथल्या माशांना मोहात पाडण्यासाठी बरीच खटपट करावी लागते. ह्या प्रक्रियेला वास पाडणे असे म्हणतात. एकदा वास पडला की मासे आमीष घेण्यासाठी धिटावतात आणि मग त्यांची शिकार करता येते.

आहिराच्या शिकारीसाठी जसा शेराच्या झाडाचा चीक मारला जातो त्याचप्रमाणे काही लोक एखाद्या डोहात तिसळाचे कूट टाकून मासेमारी करताना दिसतात. तिसळांना तिरफळे असेही म्हणतात. कोकणात ही फळे मसाल्यात टाकून माशाच्या कालवणाला झणझणीतपणा आणला जातो. परंतु हीच फळे मोठ्या प्रमाणावर एकत्र करून त्यांचा कूट तयार केला तर तो विषारी होतो. आणि म्हणूनच डोहात तिसळाचे कूट टाकल्यावर मासे मरतात.

नियोजित डोहामधल्या सर्व कपारी, विवरे, बिळे आणि उर्वरित संपूर्ण पाण्यामध्ये तिसळांचा कूट टाकल्याने सर्व माशांची नाकेबंदी होते आणि सर्वांगाची आग होऊन तडफडत ते पाण्याच्या पृष्ठभागावर येतात. डोह कोंडून त्यात विषारी फळे टाकल्यामुळे पाण्यातील प्राणवायूवरही त्याचा परिणाम होतो. त्यामुळेही त्या डोहातील सर्व मासे हवालदिल होतात आणि पोट वर करुन पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगू लागतात. त्यानंतर त्यांना पकडले जाते. ह्या पद्धतीच्या मासेमारीमुळे डोहातील संपूर्ण जलचरांच्या जीवितास धोका निर्माण होतो, त्यामुळे तिला अघोरी पद्धत असेच म्हटले पाहिजे. आणि म्हणूनच पट्टीचे मासेमार ह्या पद्धतीला कधीही उत्तेजन देत नाहीत.

पागाने मासे मारण्याच्या पद्धतीला पागवणे असे म्हटले जाते. पाग म्हणजे एक गोलाकार जाळे असते. त्या जाळ्याच्या परिघाला शिशाचे मणी लावलेले असतात. त्यामुळे काठावरून एका विशिष्ट ढंगाने जाळे टाकले की ते गोल आकारातच पाण्याच्या तळाशी बसते आणि तेथील मासे त्यात अडकतात. पागाच्या मधेमध बांधलेल्या दोरीचे दुसरे टोक पागवणाराच्या मनगटाला बांधलेले असते. तो हळूहळू पाग बाहेर काढतो आणि त्याबरोबर आत अडकलेले मासेही बाहेर येतात.

मात्र पागाने खोल पाण्यात मासेमारी करता येत नाही. उथळ पाण्यात किंवा जेथे शास्त्रीय पद्धतीने मत्स्यपालन केले आहे अशा छोट्या-छोट्या तलावांत अशा जाळ्याने किंवा पागाने मासेमारी करणे सोयीचे ठरते.

पाग किंवा जाळे हे पाण्याच्या तळाशी जाऊन बसते, तर कंडाळ हे पाण्यात भिंतीसारखे तरंगत उभे रहाते. कंडाळाची रचना ही लॉन टेनिसच्या नेटसारखी असते. त्याच्या खालील धाग्यांना शिशाचे मणी बांधलेले असतात तर वरील टोकाकडच्या धाग्यांना गवताच्या पोकळ व वजनाने हलक्या कांड्या बांधलेल्या असतात. त्यामुळे कंडाळ पाण्यात सोडले की खालचे मणी पाण्यात बुडू पहातात, पण वरच्या हलक्या कांड्यांनी त्यांना विरोधी ताण दिल्यामुळे कंडाळ पाण्यात सरळ तरंगत रहाते.

पहाटेच्या किंवा संध्याकाळच्या शांत वेळी सुक्या भोपळ्याच्या सांगडीवर बसलेला गोपाळ पाण्यात कंडाळ सोडताना आणि ते काढताना दिसतो. कंडाळाने माशांचा जाण्या-येण्याचा मुख्य रस्ता अडवला जातो. त्यानंतर दुसऱ्या बाजूने गोपाळ पाण्यात विशिष्ट तऱ्हेने आवाज काढत, माशांना हाकलत कंडाळाच्या दिशेने घेऊन जातो. जीवाला घाबरलेले मासे त्या दिशेने पळत जातात आणि कंडाळात अडकतात.

कंडाळामुळे पाण्याच्या तिन्ही थरांत मासेमारी करता येते. माशांचा प्रकार लक्षात घेऊन कंडाळ लावले जाते. म्हणजे तळातील मासे हवे असतील तर शिशाचे वजनदार मणी लावले जातात. मधल्या थरातील मासे हवे असतील तर कमी वजनाचे मणी लावले जातात. या पद्धतीचा आणखी एक फायदा असतो तो म्हणजे, ज्या आकाराचे मासे हवे आहेत त्याच आकाराचे जाळे लावल्यामुळे माशांच्या साठ्यावर योग्य ते नियंत्रण करता येते. ज्या तलावात शास्त्रीय पद्धतीने मत्स्यसंवर्धन केले जाते तेथे ह्या पद्धतीचा फार चांगला फायदा होतो.

कातकरी लहान नदीला बांध घालून जी मासेमारी करतात त्याला बांधण घालणे असे म्हणतात. महाड-पोलादपूर भागात दिवाळीच्या सुमारास कातकरवाडीवरचे सर्व कातकरी पाणी कमी झालेल्या नदीला मोक्याच्या ठिकाणी बांध घालतात. त्या बांधातून पाणी खाली जाण्यासाठी काही जागा ठेवलेल्या असतात. ज्या माशांना वरून खालच्या बाजूला जायचे असते ते रस्ता शोधत शोधत त्या विशिष्ट जागी येतात. तेथून पाण्याचा झोत एकदम खाली खेचला जाईल अशी व्यवस्था केलेली असते. मासा तेथे आल्यानंतर एकदम खाली खेचला जातो आणि खाली लावलेल्या टोक्यात येऊन अडकतो.

या पद्धतीने रात्रभर टोक्यात अडकलेले मासे सकाळी काढले जातात. सर्व कातकरी ते वाटून घेतात आणि विक्रीसाठी बाजारात नेतात. सहकारी पद्धतीने मासेमारी करण्याचा हा आद्य प्रकार म्हणावा लागेल.

पालवणे ही पद्धत फक्त खवल मारण्यासाठी वापरली जाते. गुडघाभर पाणी असणाऱ्या प्रवाहात पात्राच्या मधेमध उभे राहून खवल पालवली जाते. पालवणाराच्या हातात गळ बांधलेला लांबलचक तंगूस असतो. गळाला हिरव्या टोळाचे आमीष लावलेले असते. दिवाळीच्या हंगामात असले अनेक टोळ रात्रीच्या वेळी दिव्याच्या प्रकाशाला आकर्षित होऊन घरात येत असतात. अशा वेळीच त्यांना पकडून, डब्यात बंद करुन ठेवावे लागते.

वाहत्या पात्रात मधेमध उभे राहिल्यानंतर लांबवर गळ सोडून पतंग बदवत असल्याप्रमाणे तो मागेपुढे करत रहायचा असतो. मासेमाराचे नशीब जोरावर असेल तर एखादी खादाड खवल फटकन त्यावर तोंड टाकते. पण ही पद्धत फार वेळकाढूपणाची आणि बिनभरवशाची आहे. 'झक मारणे' ह्या वाक्प्रचाराची निर्मिती ह्या पद्धतीवरुनच निघाली असण्याची शक्यता आहे. मासेमार मासेमारीसाठी
बाहेर पडल्यानंतर त्याला किती मासे मिळतील, तो भरपूर मासे घेऊन येईल की रिकाम्या हाताने परत येईल, याविषयी काहीच अंदाज बांधता येत नाही. हे लक्षात घेऊन 'नदीत मासा आणि घरात भरवसा' असाही एक वक्प्रचार रूढ झालेला आहे. कमी मासे मिळाले आणि त्याचे बेहिशेबी कालवण केले तर त्याला 'एक मासा आणि हंडाभर रस्सा' असा म्हणत हिणवले जाते.

रात्रीच्या वेळेला गॅसची बत्ती खांद्यावर घेऊन नदीच्या काठाने मासे मारण्यासाठी जाणारे अनेक हौशी गट मावोगावी असतात. रात्रीच्या अंधारात अचानक पडलेल्या प्रखर प्रकाशामुळे माशांचे डोळे दिपतात आणि ते जेथे आहेत तेथेच थबकून राहतात. त्यांच्या ह्या अस्वस्थ मनस्थितीचा फायदा घेऊन मासेमार त्यांची शिकार करतात. कोणी जाळे टाकून तर कोणी बर्चीने त्यांना मारते.

टोळकी नावाचा वरच्या थरात राहणारा एक मासा प्रकाशाकडे आकर्षित होणारा असतो. गॅसची बत्ती हातात किंवा खांद्यावर धरून एखादा माणूस नदीत उतरला तर टोळकी माशांचा थवाच्या थवा त्याच्या दिशेने झेपावतो. अशा माशांना केवळ काठीच्या फटकाऱ्याने मारुन त्यांची शिकार करता येते. तळाशी बसणारे खर्बे, मळे किंवा फिरण्यासाठी बाहेर पडलेल्या वांबी ह्या पद्धतीत अनेकदा शिकार होतात. त्यांना बर्चीने मारावयाचे असल्याने, बर्ची चालवणारा माणूस बहाद्दरच म्हणावा लागतो. प्रकाशकिरण एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात जाताना कोन बदलतात याची जर त्याला माहिती नसेल तर मासा एकीकडे आणि बर्चीचा फटका दुसरीकडे असा प्रकार होऊ शकतो. बर्ची चालवणारारांना याची चांगली कल्पना असते, म्हणूनच माशाच्या वितभर पुढे किंवा बाजूला असा नेम धरून बर्ची चालवावी लागते.

पावसाळा कमी झाला की काही जण डोंगरातून वहात येणारे लहानमोठे पऱ्हे मोक्याच्या ठिकाणी, वरच्या बाजूला बांध घालून अडवतात. खाली येणारे पाणी अचानक बंद झाल्यामुळे खालचे मासे तडफडू लागतात. ह्या पद्धतीस पऱ्हे आटवणे असे म्हणतात. सुटीच्या दिवशी कोकणातील शाळकरी मुलेही असा उद्योग करून कालवणापुरते मासे घेऊन घरी जातात.

वल्गन लागणे हा प्रकार कोकणातल्या प्रत्येक गावी वर्षांतून एकदा हमखास पहावयास मिळतो. पावसाळ्याच्या हंगामातील पहिला मोठा पाऊस सुरु झाला की प्रचंड प्रमाणात गढूळ पाणी वाहू लागते. डोंगरातले सर्व लहानमोठे ओढे, विहिरी, तलाव तुडुंब भरुन वाहू लागतात. शिवाय वरून पावसाची संततधार सुरुच असते. त्यामुळे सर्वत्र पाणीच पाणी होऊन जाते. हे सर्व पाणी नदीच्या दिशेने वहात चाललेले असते. आणि नेमके ह्याच वेळी मळ्या,

दांड्या, पितुर्ड्या इ. माशांची अंडी सोडण्याची वेळ आलेली असते. अशा वेळी अंड्यांच्या भारामुळे जडावलेले मासे नदीचा मुख्य प्रवाह सोडून ओढ्यातून किंवा शेतातून येणाऱ्या पाण्याच्या धारेतून संथ गतीने वर चढू लागतात.

पाणी हे नेहमी समपातळीत राहते हा निसर्गाचा नियम त्यांना चांगला माहीत असतो. म्हणून ज्या दिशेने पाणी वहात येत आहे तिकडे नक्कीच एखादा विस्तृत जलाशय असेल, तिथे जाऊन निवांतपणे अंडी सोडावी असा भला विचार करुन ते निघतात. शिवाय अंडी सोडण्यासाठी आणि प्रजननासाठी त्यांना अधिक प्राणवायुयुक्त पाण्याचीही गरज असते. असे पाणी वरती असेल असा त्यांना विश्वास वाटत असतो, पण कधी कधी ते ज्या ठिकाणी जाऊन पोहोचतात  ते असते एखादे डबके, शेत किंवा असा सखल भाग !

वल्गन लागल्याची बातमी हां हां म्हणता गावात पसरते आणि मग पोरासोरांपासून म्हाताऱ्याकोताऱ्यांपर्यंत सर्व जण हातात मिळेल ती पिशवी, टोपल्या, भांडी घेऊन वल्गन लागलेल्या ठिकाणी जमतात. ते जडावलेले आणि थकलेले मासे पकडण्यासाठी त्यांना फार कष्ट करावे लागत नाहीत. फक्त एकेक मासा उचलून पिशवीत टाकायचा एवढेच! ह्या वेळी माशांची फार मोठ्या प्रमाणावर धरपकड होते आणि प्रजननाच्या नैसर्गिक चक्रामध्ये व्यत्यय निर्माण होतो. बॉम्ब टाकून मासे मारणे हा जसा गुन्हा ठरविण्यात आलेला आहे त्याचप्रमाणे वल्गन लागलेल्या ठिकाणचे मासे पकडणे हाही गुन्हा ठरवण्याची गरज असून ते माणसाच्याच हिताचे ठरेल ह्यात शंका नाही.

मागील एका प्रकरणात मी ‘तळे मारणे’ ह्या प्रकाराचा उल्लेख केलेला आहे. ह्या पद्धतीने अलिकडच्या काळात मासेसमारी केली जात नाही, पण एक जुना संदर्भ म्हणून तिचा उल्लेख करणे आवश्यक आहे.... सामान्यपणे प्रत्येक गावात एक तरी लहान-मोठे तळे असते. त्या तळ्यात नैसर्गिकत: माशांची वाढ होत असते. उन्हाळ्यात पाणी आटू लागले की आतील मासे दिवसेंदिवस अस्वस्थ होत जातात. एक दिवस तर असा येतो की पाणी माशांना फिरण्यासाठीही अपुरे पडू लागते. माशांच्या श्वसनासाठी आवश्यक असणारा पाण्यातील प्राणवायू एकदम कमी झाल्यामुळे मासे जीवाच्या आकांताने अस्वस्थ होऊन वर खाली करू लागतात. पृष्ठभागावर येऊन बाहेर कुठे काही आधार मिळू शकेल का याचा अंदाज घेऊ लागतात. त्यांची ही स्थिती लोकांच्या लक्षात आली की गावात लगेच तळे मारण्याची दवंडी पिटवली जाते. गावकरी ठरलेल्या वेळी हातात जे काही सापडेल ते साधन घेऊन तळ्यात शिरतात आणि दिसला मासा की पकड अशा पद्धतीने माशांचा संहार सुरु करतात. कोणी पाग आणलेले असतात, कोणी फडक्यांची जाळी तयार करतात, तर कोणी हातांनीच चिखलात चाचपून मासे पकडत असतात. मत्स्यसंहाराच्या त्या शोकात्म नाट्यावर अंधार झाल्यावरच पडता पडतो.

आहीर हा गोड्या पाण्यातील सर्वाधिक चवदार मासा असतो हे आपण यापूर्वीच पाहिले आहे. आहीर हा सर्पवर्गीय माशांच्या प्रवर्गात मोडणारा मासा आहे. अँग्युला बेन्गलेन्सीस असे त्या प्रवर्गाचे नाव आहे. इंडो-पॅसीफिक प्रदेशातून तो अनेक देशांत स्थलांतर करत गेला आणि बंगालच्या उपसागरातून भारतभर पसरला. त्याला तेलुगूत मालुनगुलू, तामीळमधे सेरम्पाम्बू आणि मल्याळममध्ये मनीमांगल अशी नावे आहेत.

आहीर हा अंगाला सर्वाधिक बळकी असणारा मासा असतो. तशी कमीअधिक प्रमाणात सर्वच माशांच्या अंगाला बळकी असते. पण आहिराच्या अंगाला त्यांच्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक असते. पाण्याच्या तळातील निरुंद खबदाडी, कपारी आणि बिळांतून फिरताना त्याच्या हालचालींना ह्या बळकीमुळे सौलभ्य प्राप्त होते. इतकेच नाही तर ह्या बळकीचा त्याच्या अंगातील ताकदीशी संबंध असतो. आणि म्हणूनच कंबरदुखी किंवा पाठदुखी असणाऱ्यांना आहिराच्या बळकीची भाकरी करून खायला देतात. आहीर हा एक दुर्मिळ आणि शक्तिशाली मासा असल्यामुळे त्याच्या सेवनाने लैंगिक सामर्थ्यात वाढ होते असाही एक प्रवाद आहे.

आहिराला कधीही गळाठीने किंवा गरीने मारता येत नाही. त्याच्या शिकारीसाठी जी पद्धत अवलंबिली जाते तिला चीक मारणे असे म्हणतात.आहिराच्या शिकारीसाठी जाताना सोबत नाचणीचे पीठ घेऊन जायचे. आहीर बाहेर काढला की त्याला त्या पिठात टाकायचे. त्या पिठावर तो गडबडा लोळला की त्याच्या अंगाची संपूर्ण बळकी त्या पिठाद्वारे शोषून घेतली जाते. त्या पिठाची भाकरी करून खाल्ली की कंबरदुखी, पाठदुखी थांबते असे अनुभवी माणसे सांगतात.

वांब आणि आहीर यांच्यात प्रथमदर्शनी जाणवणारा फरक म्हणजे, वांबीचे तोंड चिंचोळे तर आहिराचे अर्धवर्तुळाकृती असते. त्याचे दात अणकुचीदार असतात आणि एकमेकाला चिकटलेले असतात. त्यामुळे तंगुसारख्या क्षुद्र गोष्टींना तो दाद देत नाही. आणि त्यामुळेच त्याच्या शिकारीसाठी चीक मारण्याच्या पद्धतीचा शोध लागला असावा असे अनुमान काढता येते. वांबीच्या पाठीवर जशी करवतीसारखी काटेरी पट्टी असते तशी पट्टी आहिराच्या पाठीवर नसते. त्याला स्वसंरक्षणासाठी आपल्या दातांचा आणि शेपटीच्या फटकाऱ्याचाच आधार घ्यावा लागतो.

चीक मारण्याचे कसब मला बंधुमामाने दिले. चीक मारून आहिरांची शिकार करण्यात तो अगदी अव्वल नंबर होता. वर्षातून एकदा तरी तो खास आहीर मारण्यासाठी पोलादपूरला येई. वर्षभर खेड, चिपळूण, महाड, तळे, भोस्ते इ. ठिकाणी आहिरांचा शोध घेत तो फिरत असे. त्यामुळे कोणत्या भागात आहिरांची वस्ती अधिक, कोठे कमी आहे या सारखी माहिती त्याच्याकडे पक्की असायची. कोणत्या ठिकाणी आपण कोणत्या वर्षी आहीर मारला होता याच्याही नोंदी त्याच्या डोक्यात पक्क्या असत.

ज्या ठिकाणी आहिराची शिकार झाली त्या ठिकाणी मासा पडला असे तो म्हणत असे, तर माशांची मापे सांगण्यासाठी तो मांडी, दंड, पोटरी या सारख्या उपमांचा वापर करी. आश्विनात पौर्णिमेच्या आधी चार दिवस किंवा पौषात अमावास्येनंतर पाचव्या दिवशी असल्या शब्दात काळाचे गणित करीत असे. अंगावर केस कमी इतके मासे आयुष्यात मारले तो नेहमी अभिमानाने सांगायचा.
खेड, चिपळूण, रत्नागिरी, राजापूर तसेच सांगली, सातारा, सोलापूर, पंढरपूर ह्या भागात काही ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा शेराची झाडे दिसतात. ह्या झाडाला पाने नसतात. असतात त्या फक्त चवळीच्या शेंगेसारख्या हिरव्यागार नांग्या. शेराचे झाड ही निवडुंगाचीच एक जात असून रस्त्याच्या कडेला किंवा शेतांच्या बांधावर ते संथगतीने वाढताना दिसते. कितीही प्रतिकूल परिस्थितीत असली तरी ते मरत नाही आणि आपला हिरवटपणाही सोडीत

नाही. बांधावरची माती धुपून जाऊन नये आणि गुरे आत येऊ नयेत ह्यासाठी होणारा त्याचा उपयोग लक्षात घेऊन शेतकरी ते तसेच वाढू देतात.

शेराच्या झाडाचा चीक इतका घातक असतो की तो डोळ्याला लगताच अंधत्व येऊ शकते. त्याच्या नुसत्या संपर्कानेही डोळ्यांची आगाग होऊ लागते. तर अशा ह्या झाडाचा चीक काढून, साठवून तो पिचकारीच्या सहाय्याने आहिरांच्या बिळात मारायचा आणि त्यामुळे घायाळ होऊन वरती येणारे आहीर पकडायचे असा अजब 'अपौरूषेय' शोध मासेमारीच्या इतिहासामध्ये लावण्यात आलेला आहे !

शेराचा चीक, बांबूची पिचकारी आणि सुंठा ही आहिराच्या शिकारीची प्रमुख साधने आहेत. सुंठा म्हणजे पाच-सहा फूट लांबीची लवचीक पण मजबूत अशी काठी असून तिला पुढच्या निमुळत्या टोकाजवळ एक मोठा गळ गोफाने करकचून बांधलेला असतो. दुसरी तेवढ्याच लांबीची आणखी एक काठी असते, तिच्या पुढच्या टोकाला बेडकीचे आमीष बांधून आहिराची चाचपणी आणि वास पाडण्याची कामगिरी करायची असते.

आहिराच्या शिकारीसाठी नियोजित स्थळी गेल्यानंतर प्रथम शेजारच्या डबक्यातील एखादी बेडकी मारून ती त्या चाचपणीच्या काठीला लव्हाळीच्या साहाय्याने उलटी बांधायची असते. नंतर पाण्यात बुडी मारून त्या काठीवरील आमीष आहिरांच्या बिळाच्या तोंडाशी खेळवायचे असते. ह्याला वास पाडणे असे म्हणतात. बेडकीच्या आमिषाचा वास पडल्यामुळे आहीर खोलवर बिळातली आपली सुरक्षित जागा सोडून बिळाच्या तोंडापाशी येऊन बसतात. कधी कधी एखादा हावरट आहीर ते बेडकीचे आमीषच तोंडात धरून खाऊ पहातो. मासेमाराच्या दृष्टीने हा एक शुभशकुनच असतो. कारण तेथे हमखास मासा पडणार अशी त्याला आता खात्री झालेली असते. मग तो आनंदातच वरती येतो आणि चीक मारण्याचे काम वेगाने सुरु करतो.

एखाद्या टोपात चीक साठवून ठेवलेला असतो. तसे तोंड फडक्याने बांधून ठेवलेले असते. ते फडके दूर करुन, त्यात बांबूची पिचकारी बुडवून चीक वर खेचायचा असतो. मग ती पिचकारी त्याच अवस्थेत घेऊन पाण्यात बुडी मारून ती आहिराच्या बिळावर ठेवून आत मोकळी करायची असते. अशा तऱ्हेने आहिरांच्या वस्तीतील सर्व बिळांत चीक मारुन झाला की ह्या पद्धतीतील पहिला महत्वाचा टप्पा संपलेला असतो. त्यानंतर घायाळ होऊन वर येणाऱ्या आहिरांची फक्त प्रतीक्षा करीत बसणे एवढेच काम मासेमारासाठी शिल्लक रहाते.

जो चीक माशांना आंधळे करतो त्यापासून मासेमाराला काहीच अपाय होत नाही का, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. पण शेराच्या चिकाचे वैशिष्ट्य हे असते की तो पाण्यापेक्षा जड असल्यामुळे पाण्यावर न तरंगता तळाशी जाऊन बसतो. त्याची पिचकारी जर काळजीपूर्वक तळाशी घेऊन गेले आणि तितक्याच काळजीने ती बिळात फवारली की मासेमाराला काहीही त्रास होण्याची शक्यता नसते. नाही म्हणायला सतत त्या चिकाच्या संपर्कात राहिल्याने त्याचे डोळे लालेलाल झालेले असतात आणि अंगाची आग होत असते. अर्थातच आहीरप्राप्तीच्या आनंदापुढे हा त्रास अगदी किरकोळच समजला जातो.

चीक मारून झाल्यानंतर तासाभरातच चिकाच्या मान्यामुळे अंधत्व येऊन कासावीस झालेला मासा धडपडत पृष्ठभागावर येतो. त्याच्या सान्या अंगाची आग आग होत असते. त्यामुळे आपल्या घायाळ जीवाला दिलासा कसा द्यावा हे त्याला सुचत नाही. मग तो पाण्याच्या पृष्ठभागावर मान वर करुन ल्हा ल्हा करत तरंगू लागतो. कधी काठाजवळ येऊन आपली मान बाहेर काढून वाळूत टाकतो आणि बाकीचे अंग तसेच पाण्यात ठेवून तडफडू लागतो.
चुंबळ हे जसे सुसरीचे मर्मस्थान असते त्याचप्रमाणे आहिराच्या कानाजवळचा कल्ला हे आहिराचे मर्मस्थान असते. एकदा का आहीर अस्वस्थ होऊन बाहेर आला आणि पाण्यावर मान टाकून पडला की सुंठा उचलून, त्याला बांधलेला गळ त्याच्या कल्ल्याजवळ खुपसून त्याला बसहेर काढायचे असते. एकदा का गळ कानाशी अडकला की कितीही बलाढ्य ताकदीचा मासा असला तरी तो गोगलगायीसारखा निमूट होऊन मासेमाराच्या पोतडीत जाऊन पडतो.

आंधळा झालेला आहीर बाहेर आल्यावर अनेकदा वाळून मान टाकून पडतो असे म्हटले आहे. तो असे का करीत असेल यावर विचार करताना भाऊंनी सांगितलेला एक संदर्भ आठवला. ते म्हणाले होते की, आहिराची उत्पत्ती ही जंगलातील चवेणीच्या झाडापासून झाली असून, तेथून तो पाण्यात गेला आणि तेथेच स्थायिक झाला...

गावात येऊन कोंबड्या खाणाऱ्या आहिराच्या गोष्टीशी ही माहिती सूक्ष्म नाते सांगत होती. आहीर हा एकेकाळचा उभयचर प्राणी असावा असा निष्कर्ष त्यातून काढता येत होता. आणि म्हणूनच धरणीशी असलेल्या आपल्या आदिम नात्याच्या ओढीमुळे आहीर आपल्या आयुष्यातील अंतिम घडीला, आपला अंतिम श्वास धरणीच्या मांडीवर डोके ठेवून घ्यावा ह्या उद्देशानेच बाहेर येऊन वाळूत मान टाकत असावा असे मला वाटते.

***
शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील अनेक नद्यांत विपुल संख्याने सुसरी आढळून येत. कधी कधी त्यांचा उपद्रव इतका वाढे की त्यांच्या शिकारीसाठी खास बंदुकधारी गोऱ्या साहेबाला पाचारण करावे लागत असे. सुसर निघाल्याची बातमी जरी समजली तरी अनेकदा साहेब स्वतःच तिथे हजर होऊन त्या सुसरीचा बंदोबस्त करीत असे.

आता सुसरींची संख्या इतकी कमी झालेली आहे की त्यांची शिकार बघायला मिळणे तर दूरच, पण सुसरीचे दर्शनही दुर्लभ झालेले आहे. माझे दुसरे आजोबा, म्हणजे माझ्या आईचे वडील, सुसरीची शिकार करण्यात पटाईत होते. त्यांचे नाव होते कलनाथ रजपूत. त्यांना मी कधी पाहिलेले नाही, पण गळांच्या साहाय्याने सुसरीची शिकार करण्याऱ्या माणसाचे व्यक्तिमत्व कसे असेल याची मी निश्चितच कल्पना करु शकतो. केवळ गळाच्या साहाय्याने ते सुसरीची शिकार कशी करायचे हे मी आईच्या आणि देववाल्या मावशीच्या तोंडून अनेकदा ऐकलेले आहे, आणि त्या प्रत्येक वेळी त्या आठवणीने नशशिखांत रोमांचित होऊन गेलेलो आहे.

एक चतुर प्राणी म्हणून इसापनीतीतील गोष्टीतून आपला सुसरताईशी परिचय झालेला असतो. तिची मिठी किती भयंकर असते याची कल्पनाही आपल्याला गजेंद्रमोक्षाच्या कथेतून आलेली असते. भोगलालसेचे वर्णन रामदासांनी

काम मगरमिठी ह्या शब्दाने केलेले आहे. अशी भयंकर स्वरुपाची सुसर केवळ गळाच्या साहाय्याने मारायची ही कल्पनाच जीवाचा थरकाप उडवणारी आहे.

खेडजवळ भोस्ते नावाचे एक गाव आहे. ते माझे आजोळ. तिथल्या नदीत सुसरी फार असत. आजोळचे सर्व लोक सुसरीला सुस्वर असे म्हणत. सोप्या शब्दाच्या अवघड अपभ्रंशाचे हे कदाचित एकमेव उदाहरण असावे. सुसरीलाच धज्गी असा आणखी एक प्रतिशब्द होता. आकाराने लहान असणाऱ्या सुसरीसाठी तो वापरला जात असे. तर मगर ही सर्वात मोठी समजली जात असावी.
खरे पहाता पाण्यातल्या सुसरी, जंगलातल्या घोरपडी आणि घरातल्या पाली ह्या सर्व एकाच कुटुंबातल्या होत. उत्क्रांतीच्या प्रक्रियेत जिला जसे वातावरण मिळत गेले तशी ती स्वत:ला बदलवत गेली इतकेच !

... तर सुसर निघाल्याची बातमी समजली की आजोबा तिच्या शिकारीसाठी निघत. सुसरीच्या शरीराची रचना आणि तिची जीवनपद्धती यांचा सूक्ष्म अभ्यास करुन त्यांनी तिच्या शिकारीची पद्धत ठरवलेली होती. आणि त्यामुळेच घोड्याएवढी सुसर असली तरी तिला चारीमुंड्या चीत करण्याचे ते बोलून दाखवत.

सुसरीला गाय, बैल, घोडा, कुत्रा, अशा कोणत्याही प्राण्याचे मांस खाण्यास आवडते. एकदा का एखादा दुर्दैवी प्राणी तिच्या कराल दाढेमध्ये सापडला की ती त्याला खेचत खेचत पाण्याच्या तळाशी नेते आणि तिथल्या एखाद्या कपारीत अडकवून ठेवते. तिथे त्या प्राण्याचे मांस हळूहळू कुजायला लागते आणि मग ती तेथे येऊन-जाऊन ते मांस खात रहाते.

सुसर ज्या वेळी आपल्या भक्ष्याचा शोध घेत असते तेव्हा ती स्वतः मात्र कुणालाही दिसणार नाही याची दक्षत घेत असते. तिच्या शरीराची रचना या दृष्टीने तिला सहाय्यक अशीच असते. तिच्या लांबलचक जबड्यावर मागच्या बाजूला डोळे वरून चिकटवून ठेवल्यासारखे दिसत असतात. त्यामुळे फक्त डोळे तेवढे पाण्याबाहेर काढून व बाकीचे सर्व अंग पाण्याखाली ठेवून ती आपल्या भक्ष्याचा शोध घेऊ शकते. शिवाय तिचे डोळे एकशेऐंशीपेक्षा जास्त कोनातून फिरत असल्यामुळे मागच्या बाजूचे भक्ष्य पहाण्यासाठी तिला मागे वळून पहावे लागत नाही.

भक्ष्याचा सुगावा लागला की त्या आनंदाने तिच्या शरीरातील लाळग्रंथी स्रवू लागतात आणि तिच्या डोळ्यांतून पाणी वाहू लागते. त्यालाच मराठीत नक्राश्रू तर इंग्रजीत क्रोकोडाईल टीअर्स असे म्हटले जाते.

प्रत्येक सुसरीच्या टाळूवर गोलाकार दिसणारा असा एक मांसल उंचवटा असतो. त्याला चुंबळ असे म्हणतात. ही चुंबळ म्हणजे तिचे मर्मस्थान असते. सुसरीला नेस्तनाबूत करण्यासाठी शिकाऱ्याच्या दृष्टीने ती चुंबळ अतिशय महत्त्वाची असते. ती चुंबळ नाजूक असतेच, पण तेथेच जणू काही सुसरीचे पंचप्राण एकवटलेले असावेत. ह्या चुंबळीवर थोडासा जरी आघात झाला तरी सुसरीला मरणप्राय यातना होता, आणि तो घाव जर नेमका असेल तर तिचा मृत्यू ठरलेलाच !!

सुसर निघालेल्या ठिकाणी गळ टाकण्याची जागा निश्चित केली की मग आजोबा नदीकाठच्या डोंगरातील ओढ्याच्या ठिकाणी किंवा भातखाचरात जाऊन एक मोठासा बेडूक पकडून आणत. जवळच्या चाकूने ते त्याच्या मांडीवरील वरच्या पापुद्याला अलगद थोडीशी चीर पाडत. त्यानंतर गवताची एक पोकळ काडी घेऊन त्या काडीचे एक टोक ते चिरलेल्या भागातून आत घालीत व दुसऱ्या टोकाला आपले
तोंड लावून त्यातून ते हवा फुंकीत. आपण ज्याप्रमाणे फुगा फुगवतो त्याप्रमाणे आजोबा त्या बेडकाला फुगवून मोठा करीत आणि मग त्या गळावर बांधत असत.
सुसरीच्या गळाची आजोबांनी केलेली रचनाही त्यांच्या बुद्धिमत्तेला दाद द्यावी अशीच होती. सुसरीला एकाच गळाने मारता येणे केवळ अशक्य असल्यामुळे त्यांनी तिच्यासाठी पाच-सहा गळांचा मिळून एकच गळ तयार केलेला असे. आपले मनगट ही गळाची मुख्य दोरी आहे असे मानले तरपुढची पाच बोटे ही पाच गळांच्या उप-दोऱ्या झाल्या. त्या दोऱ्यांना पुढच्या टोकांना मोठे गळ भक्कमपणे बांधलेले असत. त्या गळांवर बेडूक बांधला जाई.
ही रचना अशी का, तर एकदा का सुसरीने आमीष गिळले की त्यापुढच्या त्या पाच किंवा सहा दोऱ्या तिच्या दाताच्या फटीत शिस्तीत अडकून बसत आणि मुख्य दोरी तिच्या तोंडाच्या बाहेरच राहिल्याने ती तोडणे तिला अशक्यप्राय होऊन जाई. शिवाय मुख्य गळापासून दीड ते दोन मीटर अंतरावर एक गवताची पेंढी आडवी बांधून ठेवलेली असे. सुसर गळाला अडकल्यानंतर ती नदीच्या कोणत्या भागात फिरत आहे हे पाण्यावर तरंगणाऱ्या त्या पेंढीमुळे पट्कन लक्षात येत असे.

सुसर एकदा का गळाला लागली की संतापून सर्व डोहभर धुमाकूळ घालीत फिरत असे. पण कोणत्याही परिस्थितीत गळ तिच्या जबड्यातून बाहेर पडणार नाही याची खात्री असल्यामुळे आजोबा निश्चिंत असत. शिवाय संतप्तपणे धुमाकूळ घालणारी सुसर जितकी अधिक शक्ती वाया घालवील तितकी अधिक थकत जाईल, आणि तेवढा तिच्या शरणागतीचा क्षण जवळ येईल, हे त्यांना माहीत असे.

दोन-दोन रात्री, दोन-दोन दिवस किंवा क्वचित प्रसंगी त्यातूनही अधिक काळ आपल्या सुटकेसाठी आटोकाट प्रयत्न करणारी सुसर अखेर थकून जाई आणि अगदी निश्चल होई. मग आजोबा हळूहळू ताण देऊन आपल्या हातातील दोरी ओढायला सुरुवात करीत. सुसरीने आपली बहुतेक शक्ती तोवर खर्च केलेली असल्यामुळे आणि तिच्या नरड्याला आतून तात लागलेला असल्यामुळे तीही निमूटपणे दोराबरोबर पुढे सरकत राही.

अशा तऱ्हेने खेचली जाणारी सुसर नदीच्या काठापासून दीड-दोन मीटरच्या अंतरावर आली की त्या वेळी आधी ती गवताची पेंढी आता आजोबांच्या हातात आलेली असे. ती ते हातात घेत आणि एक अंतिम झटका देऊन सुसरीला बाहेर खेचत. त्याच वेळी ती सुसरही आपला जबडा संपूर्णपणे वासून आजोबांवर झेप घेई, आणि तो आडाखा आधीच बांधलेले आजोबा तिच्या वासलेल्या जबड्यात ती पेंढी आतपर्यंत आडवी घालत. आता तिच्या जबड्यात ती पेंढी आतवर घट्ट बसल्यामुळे तिला आपला जबडा धड उघडताही येत नसे आणि बंदही करता येत नसे. या तिच्या संभ्रमित मन:स्थितीचा फायदा घेऊन पुढच्याच क्षणी उडी मारुन आजोबा तिच्या पाठीवर स्वार होत आणि तिच्या चुंबळीवर एक निर्णायक प्रहार करत... मासा विरुद्ध

माणूस, शक्ती विरुद्ध युक्ती असा तो विलक्षण चित्तथरारक संघर्ष काही सेकंदांत संपे आणि विजयश्री आजोबांकडे सोपवून ती सुसर राम म्हणे...

***

पेटलेल्या टायरच्या प्रकाशात खेकडी पकडायला जाणे हा एक रोमहर्षक अनुभव असतो. कोकणपट्टीतील बऱ्याच खेडेगावांतून हा प्रकार नेहमी पहावयास मिळतो. जगात खेकड्यांच्या सुमारे पाच हजार जाती आहेत. त्यांतील सहाशे चाळीस जातीची खेकडी भारतात सापडतात. त्यांतील फक्त चौदा जातींची खेकडी खण्यायोग्य असतात. त्यांतही गोड्या पाण्यातील तीन आणि खाऱ्या पाण्यातील अकरा, असा भेद आहे.

खेकड्यांना काही जण चिंबोऱ्या असे म्हणतात. तर काही जण किर्वी असेही म्हणतात. किर्वे हे सामान्यपणे चप्पट चौकोनी आकाराचे आणि रंगाने काळे असते. त्याचा आकार मुठीपासून दोन्ही हातांच्या ओंजळीइतपत असू शकतो. त्याच्या दोन्ही बाजूंना चपट्या आकाराच्या चार चार नांग्या आणि एकेक नांगडा असतो. दोन नांगडे म्हणजे किर्व्याचे आंगठेच होत. चिंबोरीच्या शरीराची रचनाही अशीच असते. मात्र तिच्या रंगात तपकिरी छटा अधिक असते. तसेच तिच्या नांग्यांना आणि शरीराला गोलाई अधिक असते.

ज्या खेकड्याचा आकार मुठीसारखा असतो त्याला मुठा असे म्हणतात. त्याचा रंग पांढरा असतो. टिपकागदावर शाईचा थेंब पसरावा तसा त्याच्या पाठीवर काळ्या रंगाचा ठिपका पसरलेला असतो. पूर्णपूणे काळ्या रंगाचे मुठेही आढळून येतात. मुठा ओळखण्याची खात्रीची खूण म्हणजे त्याचा उजवा आणि डाव्या नांगडा ह्यांत खूपच फरक असतो. सामान्यत: त्याचा डावा नांगडा उजव्यापेक्षा अधिक लहान असतो. मुठा कधी नदीत सापडत नाही, तर तो फक्त शेताच्या बांधावर आढळतो.

काही खेकडी अशी असतात की ती नदीतही रहात नाहीत किंवा शेतातही रहात नाहीत. तर ती डोंगरकड्यात रहातात. पावसाळ्यात डोंगरावरून अनेक लहानमोठे ओढे वहात खाली येतात आणि नदीला मिळतात. लहान ओढ्याला पऱ्हा आणि त्याहून थोड्या मोठ्या ओढ्याला विरा असे म्हणतात. तर ह्या पऱ्ह्यांच्या किंवा विऱ्यांच्या काठावरही अशी खेकडी वस्ती करुन राहिलेली दिसतात.

डोंगरातली खेकडी ही शेंदरी रंगाची असतात. त्यांचे व्यक्तिमत्व पाण्यातील खेकड्यांपेक्षा अधिक चपळ आणि सशक्त असते. चवीलाही ती सरस असतात. कधी कधी कवच पूर्णपणे विकसित न झालेले एखादे किर्वे आढळते. त्याचे कवच अगदी मऊ आणि कागदासारखे पातळ आणि मऊ असते. मात्र त्याच्या इतर सर्व अवयवांची आढ पूर्ण झालेली असल्यामुळे ते हिंडूफिरु शकते. अशा किर्व्याला मेंगुर्ले किर्वे असे म्हणतात.

समुद्रातल्या खेकड्यांचा आकार चप्पट, अंडाकृती असून त्यांचा लालसर तपकिरी रंग पॉलिश केल्यासारखा चमकत असतो. विशेष म्हणजे त्यांच्या कवचाचा परिघ हा करवतीसारख्या काटेरी दात्यांचा असतो. अगदी लहान किंवा बाळ-खेकड्यांना कुर्ली असे म्हणतात. त्यांचा रंग खर्बा असतो तर त्यावर पांढऱ्या रंगाचे ठिपके असतात. कुर्ली

विपुल संख्येने उपलब्ध असतात आणि ती चवीला रुचकर असतात ! समुद्रातील काही खेकड्यांच्या नांग्यांना टोकाशी वल्ह्यासारखे पाते असते. त्या आधाराने ती खेकडी पाण्यात पोहू शकतात आणि म्हणूनच त्यांना पोहणारी खेकडी असे म्हटले जाते.

वस्तुतः नदी, शेत, डोंगर आणि समुद्रातली खेकडी ही सर्व भावंडेच आहेत. फक्त परिस्थितीनुरूप वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन स्थायिक झाल्यामुळे त्यांच्यात थोडा थोडा फरक झालेला आढळून येतो इतकेच!

खेकड्याच्या शरीराची रचना एखाद्या पेटीसारखी असते. पेटीचे झाकण उघडावे त्याप्रमाणे त्याचे कवच आणि उर्वरित देह असे दोन भाग होतात. त्याच्या कवचाला कपची असे म्हणतात. त्यात त्याचे जे शरीर बसवलेले असते त्याला पेंदा असे म्हणतात. पेंद्याच्या दोन्ही बाजूंना खेकड्याच्या चार चार नांग्या असतात. त्या आधारे तो चालू किंवा पळू शकतो. पेंद्याच्या मध्यभागी असणाऱ्या पट्ट्यात निसर्गत:च एक उभी खाच निर्माण झालेली असते. तिथे जोर देऊन मोडताच पेंद्याचे दोन समान भाग होतात.
खेकड्यांचे नांगडे स्वतंत्रपणे वाढलेले असतात. त्यांची बाहेरच्या टोकाच्या बाजूची रचना कैचीसारखी असते. त्या कैचीच्या आतील पाती करवतीसारखी दातेरी असतात. आपण ज्याप्रमाणे पापण्या मिटून घेतो त्याप्रमाणे खेकडे आपले डोळेच आत खोबणीत ओढून बंद करतात. त्यांच्या डोळ्यांचा आकार आणि रचना चवळीच्या दाण्यासारखी असते.

खेकडी कापता येणं अशक्य असल्यामुळे त्यांचा पेंदा आणि कपची हे दोन्ही भाग उपसूनच एकमेकांपासून दूर करावे लागतात. उपसून काढलेल्या पेंद्याच्या वरच्या बाजूला मधूमध एक काळ्या रंगाचा गोळा असतो. त्याला बेडकी असे नाव पडले आहे. खेकडे साफ करताना त्यातील ही बेडकी कटाक्षाने काढून टाकावी लागते, कारण ती अतिशय कडू असते. पेंद्यामध्ये दोन्ही बाजूंना वरच्या भागात पिवळ्या रंगाची चरबी अते, ती मात्र अतिशय स्वादिष्ट आणि पौष्टिक मानली जाते.

बाजूला काढून ठेवलेल्या कपचीमध्ये लहान चमचा भरेल इतका लाख मोलाचा एक मऊ भाग असतो. त्याला लाख असेच म्हणतात. घरात खेकडी आणली की त्यांच्या पाठीतील लाख स्वतंत्रपणे काढून त्यांच्याच एका कपचीमधे साठविली जाते. नंतर त्या लाखेत तिखट-मीठ टाकून ती कपची जणू काही एखादे भांडेच आहे असे समजून निखाऱ्यावर ठेवली जाते. काही वेळाने त्या लाखेपासून एक अद्भुत असा अन्नपदार्थ तयार होतो. त्याच्या चवीचे वर्णन करणे हे अमृताच्या ताटात नरोटी ठेवण्यासारखेच होईल.

साफ केलेल्या पेंद्याचे दोन तुकडे करून सुकी मिर्ची, खोबरे, कांदा इत्यादीच्या मसाल्यात त्याचा झणझणीत रस्सा केला जातो. त्याला सर्वसामान्यपणे काढा हाच शब्द प्रचलित आहे. वस्तुत: काढा हा शब्द आयुर्वेदिक असून औषधी गुणधर्मयुक्त द्रवपदार्थ असा त्याचा अर्थ आहे. तो या काढ्यालाही लागू पडतो. खेकड्यांचा काढा अतिशय उष्ण असल्यामुळे त्याच्या सेवनाने वाताचे विकार नष्ट होतात. अनेकदा असा काढा करताना त्याच्या नांग्या आणि नांगडे ठेचून मसाल्यातच त्यांचे मिश्रण केले जाते. त्यामुळे काढ्याचा स्वाद अधिक वाढतो.

खेकड्याच्या अंगात रक्त नसते. तो साफ करताना त्याच्या अंगातून जो द्रवपदार्थ सांडतो त्याला लस असे म्हणतात. ही लसही अतिशय गुणकारी असून, ती साठवून रश्शातच समाविष्ट केली जाते.

खेकड्यामध्ये व्हिटॅमीन बी व सी तर असतेच, पण त्यात आयोडिन, फॉस्फरस, सल्फर आणि कॅल्शियमही असते. त्यामुळे त्यात औषधी गुणधर्म निर्माण झालेले आहेत. दम्याच्या रोगावर खेकड्याचा काढा रामबाण उपाय म्हणून दिला जातो. दम्याच्या मुलांना तो औषध म्हणून पाजला जातो. तर बाळंतपणानंतरही खास शक्तिवर्धक म्हणून ह्या काढ्याची शिफारस केली जाते. मलेरिया किंवा टॉयफाईडसारख्या आजारामुळे शरीराची झालेली झीज भरून काढण्यासाठीसुद्धा ह्या काढ्याचाा वापर केला जाते. चरक व सुश्रुत संहितेत खेकड्याच्या काढ्याच्या औषधी गुणांची माहिती दिलेली आहे.

खेकड्यामधील नर आणि आणि मादी यांतील फरक ओळखण्याची एक सोपी युक्ती असते. त्यांच्या पोटाखाली उघडझाप करू शकेल असा एक पट्टा असतो. विमानाच्या पोटात सामान ठेवण्यासाठी जसा कप्पा असतो तशीच त्याची रचना असते. त्याचा रंग खेकड्याच्या रंगाशी मिळताजुळता असतो. मात्र नराच्या पोटावरील पट्टा करंगळीएवढ्या रुंदीचा तर मादीच्या पोटावरील पट्टा दोन बोटांहून अधिक रुंद असतो. त्याचे कारण म्हणजे त्यात तिची अंडी असतात. एकदा का ती परिपक्व झाली की मादी खेकड्याची चाल मंदावते. पिल्ले घालायची वेळ आली की तिचा तो पट्टा पोटाखाली आपोआप उघडतो आणि त्यातून अनेक छोटी छोटी खेकडी तुरुतुरु बाहेर पडू लागतात.

दिवाळीच्या सुमारास खेकडी चांगली पुष्ट झालेली असतात. त्यामुळे याच हंगामात खेकड्यांची मोठ्या प्रमाणावर शिकार केली जाते.

पाण्यातली खेकडी साधारणतः ज्या ठिकाणी चांगली विस्तृत कपार असेल किंवा पाण्याच्या ओघामुळे जिथे घळ निर्माण झालेली असेल अशा ठिकाणी राहतात. कपारीत रहाणे त्यांना घळीत रहाण्यापेक्षा सुरक्षित वाटते. तरीही घळीत आत खोलवर बिळे पाडून त्यांनी सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक ती तरतूद केलेली असते. खेकड्यांना पकडण्यासाठी पाण्यात बुडी मारावी लागत नाही. कारण ती काठाजवळच गुडघाभर पाण्यात किंवा कंबरभर पाण्यात रहात असतात.

मीटर- दीड मीटर लांबीची एक मेसाची काठी घ्यायची. तिच्या पुढच्या निमुळत्या टोकाला बेडकीचे आमीष घोड्याच्या केसाने बांधायचे, आणि नंतर ते आमीष खेकड्यांच्या कपारीत किंवा बिळाच्या तोंडाशी खेळवत रहायचे. हळूहळू खेकडी त्याकडे आकर्षित होतात.
खेकडा हा प्राणी अतिशय आळाशी आणि मूर्ख असतो. असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी हे जणू त्याच्या आयुष्याचे ब्रिद असते. त्यामुळे तोडाशी आलेले आमीष तो पटकन पकडतो. ह्या आमिषाच्या रुपाने प्रत्यक्ष मृत्यूच आपल्या समोर उभा ठाकला आहे हे कधीही त्याच्या लक्षात येत नाही.

एकदा का खेकड्याने आमीष पकडले की त्याला हळुहळू खेळवत कपारीच्या किंवा बिळाच्या तोंडावर आणयचे असते. ही शिकार नितळ स्वच्छ पाण्यात होत असत्यामुळे आपल्याला खेकड्याची स्थिती स्पष्टपणे दिसत असते. खेकड्यालाही आपण दिसत असतो, पण आता तो त्या आमिषाच्या इतक्या मोहात पडलेला असतो की 'किं न करोती पापं...' ह्या अवस्थेप्रत पोहोचलेला असतो.
तोंडावर आणलेल्या खेकड्याला दोन प्रकारे बाहेर काढता येते. हातातली काठी बिळाच्या वरच्या भिंतीशी दाबून धरली की खेकडा तिरपा होता. त्याचे दोन्ही नांगडे आमीष धरण्यात गुंतलेले असतात. खाली आपले पोट उघडे पडलेले आहे हे त्याच्या लक्षात येत नाही. मग हळूच खाली हात घालून, त्याच्या पोटाला मधेमध धरून त्याला अलगद बाहेर काढता येते. दुसरा प्रकार म्हणजे आमीष पकडलेला त्याचा एक नांगडा वरच्या बाजूने पकडून चट्कन त्याला बाहेर काढायचे आणि काठी सोडून आपल्या दुसऱ्या हाताने त्याचा दुसरा नांगडा वरच्या बाजूने पकडून तसेच त्याला पोतडीत टाकायचे. पण ह्या दुसऱ्या प्रकारात तो खेकडा आपला नांगडा गाळण्याची शक्यता अधिक असते. शत्रूचे लक्ष विचलित करण्यासाठी पाल जशी आपली शेपटी गाळते त्याचप्रमाणे खेकड्यालाही नांगडा गाळण्याचे वरदान मिळालेले आहे. त्यामुळेच अनेकदा त्याच्या जीवावर बेतलेले नांगड्यावर निभावते. गाळलेल्या नांगड्याच्या जागी रि-जनरेशन होऊन नवीन नांगडा येतो.

पकडलेल्या खेकड्यांना उभट आकाराच्या टोपल्यात ठेवले तर ते पळून जाण्याची शक्यता नसते. एखादा वर जाण्याचा प्रयत्न करु लागला की दुसरे त्याला खाली ओढण्याचा प्रयत्न सुरु करतात.

जेथे अगदी लहान नदी आणि तिला मिळणारे चिंचोळे पऱ्हे किंवा विरे असतात किंवा ज्या ठिकाणी एखाद्या उंच शेतातून खालच्या शेतात पाणी वहात असते तेथील खेकडी पकडण्याची पद्धत वेगळी आहे. ती समजून घ्यायची असेल तर कोईण म्हणजे काय तेही समजून घ्यावे लागेल.
कोईण हा टोपलीसारखाच एक प्रकार असतो. त्याला दूरान्वयाने टोक्या असेही म्हणता येईल. कोईणीचा वापर खेकडे पकडण्यासाठी तर टोक्याचा वापर मासे पकडण्यासाइी केला जातो. कोईण ही लव्हाळीपासून, शेरणीपासून किंवा माणग्याच्या काठीपासून विणली जाते. ती दंडगोलाकृती, सुगरणीच्या खोप्यासारखी किंवा प्रयोगशाळेतील चंबूसारखी वर चिंचोळी आणि खाली रुंद होत गेलेली, अशा तीन आकारांत विणली जाते.
बांधामधून पाणी वाहण्यासाठी जेथे जागा ठेवलेली असते तेथे कोईण लावली जाते. वरून येणारे पाणी तिच्यातून गाळून बाहेर पडेल अशा रितीने ती लावलेली असते. कोईणीमध्ये बकऱ्याचा थोडासा पोटला ठेवला जातो. त्याच्या वासाने खुळी होऊन खेकडी कोईणीकडे आकर्षित होतात आणि आत अडकून पडतात. आत अडकल्यानंतर त्यांना पुन्हा बाहेर येता येत नाही. रात्रभर कोईण लावून ठेवली आणि सकाळी काढली की ती खेकड्यांनी भरून गेलेली दिसते. हल्ली तर काही ठिकाणी कुणबी किंवा शेतमजूर घोंगडीचा धडपा बांधूनही ह्याच पद्धतीने खेकडी पकडताना दिसतात.

शेताच्या बांधावरील मुठे पकडणे हा अनेक शाळकरी मुलांचा सुट्टीतील उद्योग झालेला असतो. फूटभर लांबीची छत्रीची ताडी घेऊन तिला खालच्या टोकाला दोऱ्याचा छोटासा फास तयार करुन बांधला की एवढ्या साधनसामुग्रीच्या आधारे मुले तासाभरातच पिशवीभर मुठे घेऊन घरी येतात.

एखादा पुष्ट मुठा हेरल्यानंतर तो ज्या बिळात गेला असेल तिथे ती छत्रीची ताडी फास खालच्या बाजूला करुन आत घालायची. आतील मुठा एक तर रागाने किंवा भीतीने ती दोरी पकडतो. मग त्याला हळूहळू खेळवत खेळवत बिळाच्या तोंडावर आणायचे आणि त्याचे पोट वर करून त्याला अलगद उचलून पिशवीत टाकायचे असा हा प्रकार असतो. काही जण तो दोरीचा फास त्याच्या नांगड्याभवती टाकून पिळतात आणि त्यात अडकलेला मुठा थेट बिळातून ताडीसह बाहेर काढून पिशवीत टाकतात.

कोल्ह्याला खेकडी खाणे फार आवडते हे आपल्याला माहीत आहे. तो खेकड्यांच्या बिळात आपली शेपटी घालून खेकडी बाहेर काढतो. आणि बाहेर काढलेला खेकडा शेपटीनेच जमिनीवर आपटून नंतर त्याला गट्ट करून टाकतो. आमिषाशिवाय खेकडे पकडण्याची उपरोक्त पद्धत म्हणजे माणसांनी केलेले कोल्ह्याचे अनुकरण होय यात काही शंका नाही.

कधीकधी मुठ्यांसोबत एखादी चिंबोरीही एखाद्या बिळात आढळून येते. ती बाहेर येण्यासाठी फार चिवट असते. ती ज्या ठिकाणी हटून बसली असेल तिथे एक दुसरी काठी घालायची आणि ती चिंबोरी जिथे आहे तिथेच तिला दाबून धरायची. त्यानंतर मग ते बीळ त्या चिंबोरीपर्यंत एका बाजूने उकरत न्यायचे आणि मग तिला उचलून पिशवीत टाकायचे, असाही एक प्रकार असतो.

डोंगरातील खेकडी पकडण्याच्या पद्धतीला खेकडी भरडणे असे म्हणतात. खेकड्यांच्या निसर्गविषयक अज्ञानाचा किंवा आकलनाचा माणसाने घेतलेला हा विलक्षण गैरफायदा पाहून माणसाच्या बुद्धिमत्तेला दाद द्यावी की त्याच्या दुष्टपणाबद्दल त्याला दूषणे द्यावी असा प्रश्न पडतो.
आपल्याला कल्पना असतेच की आभाळात काळे ढग दिसायला लागल्याबरोबर मोर आपला पिसारा फुलवून नाचायला लागतो. वळिवाच्या सरीपूर्वी आलेल्या मातीच्या धुंद वासाने खिल्लारे वारा प्यायल्यासारखी उधळू लागतात. वादळाचा सुगावा लागला की शहामृग वाळूत डोके खुपसून बसते, त्याचप्रमाणे एकदा का आभाळात ढगांचा गडगडाट सुरू झाला की खडकाखाली खोलवर तळाशी जाऊन बसलेली खेकडी भराभरा बाहेर येतात. त्यांची ही सवय लक्षात घेऊनच माणसाने ‘खेकडी भरडणे’ ह्या अभूततपूर्व पद्धतीचा शोध लावला आहे.

डोंगरामध्ये मोठमोठे शिलाखंड पसरलेले असतात. त्याखाली खोलवर जाणारी लहान-मोठी अनेक बिळे असतात. कधीकधी एखादा मोठा कातळ दिसतो. पण
वर्षानुवर्षांच्या ऊन-पाऊस - थंडी इ. च्या माऱ्यामुळे त्याला खोलवर भेगा पडलेल्या असतात. असा मोठा खडकाळ भाग हेरून गावातली काही मोजकी मंडळी मे महिन्यात, म्हणजे जेव्हा खेकडी मिळणे अत्यंत दुर्मिळ झालेले असते अशा वेळी, खेकड्यांच्या शिकारीसाठी तेथे जातात.

चारपाच जण मिळून उचलू शकतील असा एक मोठा दगड ते घेतात आणि उचलून त्या मोठ्या खडकावर ठेवतात. नंतर ते सर्व मिळून तो दगड त्या खडकावर फिरवीत घाडघूड घाडघूड असा आवाज काढत रहातात. हा आवाज ऐकून खोलवर खाली पावसाची वाट पहात बसलेल्या खेकड्यांना वाटते की ढग गडगडायला लागले, आता पाऊस येणार आणि मग ती सगळी खेकडी आनंदाने बेहोष होऊन भराभर बाहेर पडतात.

बाहेर खडकाच्या तळाशी इतर माणसे टपून बसलेली
असतात. त्यांनी सोबत गोणपाट आणलेले असते. बाहेर आलेल्या खेकड्यांवर गोणपाट टाकून ते ती पकडतात आणि आपल्या पिशवीत टाकतात.

खेकडी ही फार मूर्ख असतात असा उल्लेख सुरुवातीस केलेला आहे. पण ती इतकी मूर्ख असतात की पुन्हा दुसऱ्या दिवशी त्याच ठिकाणी भरडणे सुरु झाले तरी शिल्लक राहिलेली किंवा बचावलेली सर्व खेकडी पुन्हा बाहेर येतात आणि स्वत:चा बळी देतात.

खेकड्याचा नांगडा हे त्याचे शक्तिस्थान असते. तो जर एखाद्याच्या बोटाला कडकडून चावला तर ते बोट टच्कन फुटते आणि रक्ताची धार वाहू लागते. खेकडी पकडणारी काही सराईत माणसे सोडली तर इतरांना त्याचा हा प्रसाद अधून-मधून चाखावा लागतो.

एकदा का खेकडी पकडून घरी आणली की त्यांचे पुढचे सर्व सोपस्कार घरातील महिलांना करायचे असतात. शिवाय घरातल्या लहान मुलांना त्या सर्व क्रिया जवळून आणि खेकड्यांना हात लावून पहावयाच्या असतात. ह्या दोन्ही गोष्टी लक्षात ठेवून, आणलेली पिशवी जर तशीच बायकोच्या हातात दिली तर काय अनर्थ होईल याची कल्पनाच केलेली बरी. म्हणून खेकड्यांची शिकार करणारे, खेकडे पकडल्यानंतर प्रथम त्यांना नांगवतात व नंतरच पिशवीत टाकतात, किंवा घरी आल्यावर मग स्वतःच खेकडी साफ करून देतात.

खेकड्यांचे चावणे बंद करणे ह्या पद्धतीला खेकडे नांगवणे असे म्हणतात. खेकडा नांगवण्यासाठी खाली बसून त्याला आपल्या उजव्या पायाखाली दाबून धरायचे. त्यानंतर त्याच्या ज्या नांग्या असतात त्या नांग्यांपैकी दोन नांग्यांची पुढची अणकुचीदार पेरे मोडून काढायची. ती करवंदीच्या काट्यासारखी टोकदार व मजबूत असतात. नंतर त्यापैकी एक काटा त्या खेकड्याचा जो आंगडा असतो त्याच्या पुढच्या कैचीत अशा तऱ्हेने खुपसायचा की त्याची ती कैची बंद होऊन जाते. दुसऱ्या नांगड्याचीही अशीच गत करायची. अशा तऱ्हेने दोन्ही कैच्या बंद झाल्यामुळे त्याचे नांगडे निकामी होतात आणि मग त्याला महिला किंवा मुलांसमोरही पांढरे निशाण पकडावे लागते.

खेकडी चावण्याचा त्रास नको म्हणून इंग्लंडमध्ये जिवंत खेकडी उकळत्या पाण्यात टाकून शिजवली जातात. तर काही ठिकाणी पाण्याचे तपमान हळूहळू वाढवून खेकडी शिजवली जातात. बळी तो कान पिळी हा निसर्गाचा न्याय असतो. खेकड्याला त्याचीच शस्त्रे लुबाडून नांगवणे हे त्याचे सर्वाधिक बोलके उदाहरण आहे.

पेटलेल्या टायरच्या प्रकाशात खेकडी पकडायला जाणे हा जितका रम्य तितकाच साहसी प्रकार असतो. डिसेंबर - जानेवारीच्या दरम्यान नदीचा प्रवाह संथ झालेला असतो. पाण्याचा रंगही कावळ्याच्या डोळ्यासारखा निवळशंख झालेला असतो. खेकडे पकडण्यासाठी हे वातावरण योग्य असते. श्रमिक, मजूर, गरीब शेतकरी, कुणबी दिवसभर काम करुन थकले की त्यांना 'रातच्याला' काहीतरी झणझणीत कालवण हवे असते. मग सायंकाळी त्यांची पावलं आपोआप नदीकडे वळतात. अंधारात पेटलेला टायर घेऊन नदीच्या काठावरून आठ-दहा जणांचे एक टोळके हळूहळू पुढे सरकताना दिसते.

महाड-पोलादपूर भागात अशी अनेक खेडी आहेत की त्यांची विभागणी केवळ मधल्या नदीमुळे झालेली असते. हे अंतर इतके कमी असते की अलीकडच्या काठावर उभा राहिलेला माणूस पलिकडच्या माणसाशी, आवाजाची पट्टी थोडी वरची ठेवून गप्पाही मारु शकतो. तर पलिकडच्या गावातील असा एखादा गट रात्रीच्या वेळी खेकडी पकडण्यासाठी निघाला की अलीकडून ते दृश्य पहाणे हा एक सोहळाच असतो.

टायर उपलब्ध नसल्यास तुराटीच्या काड्यांची चूड पेटवून त्या प्रकाशतही खेकडी मारायला माणसं बाहेर पडतात. त्या लसलसत्या उजेडात पुढे पुढे सरकत जाणाऱ्या त्यांच्या त्या लांबलचक सावल्या, पाण्यात क्षणाक्षणाला विखुरणारी त्यांची ती प्रतिबिंबे, खेकडे दिसतातच त्यांनी मारलेल्या उत्साही आरोळ्या, त्यानंतरचे त्यांचे हर्षोन्मादक चित्कार, मधूनच शेवाळलेल्या दगडावरून कुणाच्या तरी घसरून पडण्याचा आवाज इ. चे एक दृक्श्राव्य चित्र माझ्या मनावर कोरले गेले आहे. अशा मोहिमांत मी स्वत:ही अनेकदा सामील झालेला आहे आणि त्यातील खुमारी अनुभवलेली आहे.

खेकडी पकडता पकडता मध्यंतरीच्या फावल्या वेळात भुताखेतांच्या गप्पांना ऊत येणे हा एक अटळ असा भाग असतो. कोणत्या डोहात कोणती भुते आहेत, कोणता डोह किती वर्षांनी अवधीला येतो, कोणत्या डोहात कोणत्या गरोदर बाईने आत्महत्या केली इ, विषयांवर चर्चा चालू असते. चर्चेच्या ओघात कळत-नकळत प्रत्येकांच्या मनावर भीतीचे एक तरल सावट पडत जाते आणि मग त्यामुळे निर्माण झालेल्या थोड्या भयप्रद, थोड्या गूढ अशा वातावरणात तो घोळका कुणी तरी अज्ञात शक्ती खेचत असल्यासारखा पुढे पुढे जात रहातो...

नदी अवधीला येणे म्हणजे तिची बळी घेण्याची वेळ येणे. ही वेळ ठरलेली असते असे म्हणतात. सावित्रीतील हंडी हा डोह दर चार-पाच वर्षांतून एकदा अवधीला येतो... तर चार-पाच वर्षांनी कुणाचा न कुणाचा तरी त्या डोहात अपघाती मृत्यू होतो. कधी तो एखादा निरुपद्रवी वयस्क माणूस असेल, कधी कुणाच्या घरातला एकुलता एक, कर्ता-सवरता, नुकतेच लग्न झालेला तरुण असेल, तर कधी उन्हाळ्याच्या सुट्टीत पाहुणा म्हणून आलेला आणि पोहायला म्हणून गेलेला शाळकरी मुलगा असेल...

दर चार- पाच वर्षांनी एकदा तरी ती अप्रिय बातमी कानावर पडते. चारदोन दिवस सारे गाव हळवे बनते. प्रत्येकाच्या तोंडी तोच विषय रहातो. बाया-बापड्या चुकचुकतात. पण सावित्रीसारखाच प्रत्येकाच्या जीवनाचा प्रवाह अखंडपणे सुरु राहतो. अशा वेळी जीवनाच्या गतीशी एकरुप होऊनच जगण्यात आयुष्याची सार्थकता आहे हे

पटते.मासेमारीतील अटळ तन्मयता आणि अनेक उत्कट क्षणांमुळे मी अधिक लवकर ह्या सत्याच्या जवळपास पोहोचू शकलो असे मला वाटते.

***

पाण्यामध्ये मासा नीज घेई कैसा
जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे
असे जरी तुकारामाने म्हटले असले तरी हल्ली शास्त्र इतके प्रगत झाले आहे की पाण्यात मासा कसा झोपतो याचा उलगडा तर झालेला आहेच, पण त्याहीपेक्षा अधिक किचकट प्रश्नांचीही उकल झालेलली आहे. मात्र एक अतिशय अवघड प्रश्न म्हणून पाण्यात मासा कसा झोपतो, ह्या प्रश्नाचे महत्त्व काळाच्या ओघात कमी झालेले नाही. वनपर्वात युधिष्ठिराला यक्षाने जे प्रश्न विचारले त्यांत एक प्रश्न माशांशी निगडित होता हे लक्षात घेतले पाहिजे, सदैव नेत्र उघडे ठेवणारा प्राणी कोणता, हा तो प्रश्न !

माशाचे डोळे सदैव उघडे असतात हे त्याचे उत्तर होय. पण ह्याचे कारण त्याची सदैव जागरुकता हे नसून, त्याच्या डोळ्यांना पापण्या नसतात हे होय. अर्थात डोळे उघडे ठेवूनच माशाला झोप घ्यावी लागते. घोडा जसा उभ्या उभ्याच झोप घेतो त्याप्रमाणेच माशालाही उभ्या उभ्या डोळे उघडे ठेवून झोप घेणे भाग असते.

***

अनेकदा भर दुपारी उन्हाच्या तल्लखीत जेव्हा मी पोहायला जात असे तेव्हा काही मासे डोहात पडलेल्या वटवृक्षाच्या प्रशांत सावलीत निश्चलपणे तरंगताना दिसत. त्या वेळी ते इतके स्थिर असत की स्वत:हून आपल्या शरीराची यत्किंचितही हालचाल करीत नसत. घार जेव्हा उंच आकाशात पंख पसरून नुसतीच तरंगत रहाते तेव्हा ती आपल्या शरीरातील कोणत्याही शक्तीचा वापर करत नसते. केवळ हवेच्या प्रतिकाराचा शिस्तशीर फायदा उठवून ती विश्रांतीचे अनुपमेय सुख भोगत असते. त्याचप्रमाणे अत्यंत स्थिर अवस्थेत पाण्यात तरंगणारा मासा हा निद्राधीन असला पाहिजे असे माझे मत झाले होते. त्याविषयी डॉ. सुनील कुळकर्णी यांना विचारले असता त्यांनी या मताला दुजोरा दिला.

माशाच्या पोटामध्ये जन्मजात अशी हवेची एक पिशवी असते. इंग्रेजीत तिला एअर ब्लॅडर, स्वीम ब्लॅडर किंवा गॅस ब्लॅडर असे म्हणतात. तिचा रंग चंदेरी - पांढरा असतो. मासा जेव्हा जन्म घेण्याच्या अवस्थेत असतो तेव्हा त्याच्या पोटात ती उघडी असते. माशाची जसजशी वाढ होत जाते तसतशी ती भरत जाते आणि बंद होते. माशांच्या काही जाती अशाही आहेत की त्यांच्या पोटातील ती पिशवी अखेरपर्यंत उघडी रहाते.

ह्या पिशवीचा आकार पेनात शाई भरण्याच्या ड्रॉपरसारखा एकीकडे निमुळता होत गेलेला असतो. मधोमध तिढा मारल्यासारखे तिचे दोन भाग झालेले असतात. मासे कापताना त्यांच्या पोटातील अन्य अवयवासोबत ही पिशवीसुद्धा बाहेर पडते. लहानपणी आम्ही तिचा खेळण्यासारखा वापर करीत असू. तिचा एक भाग दाबला की

तिकडची हवा दुसऱ्या भागात जात असे आणि दुसरा भाग दाबला की तिकडची हवा पहिल्या भागात येत असे. नेमक्या अशाच हालचाली घडवून आणणारी एक यंत्रणा माशाच्या पोटात विद्यमान असून, त्या हालचालींवरच त्याचे पाण्यात वर-खाली जाणे किंवा स्थिर रहाणे अवलंबून असते. या कामात त्याची शेपटी आणि पंख यांचा त्याला जरुर फायदा होतो. पण त्याच्या स्थिर राहण्याच्या प्रक्रियेशी हवेच्या पिशवीचा मूलभूत संबंध असतो.

माशाच्या डोळ्यांवर जरी पापण्या नसल्या तरी त्याच्या डोळ्यांची रचना मात्र आपल्या डोळ्यांसारखीच असते. डोळ्यांत अश्रुग्रंथी नसल्यामुळे त्याला माणसासारखे रडता येत नाही. त्याच्या शरीरात बाह्यकर्ण व मध्यकर्णाचा अभाव असतो. मात्र त्याचा अंतर्कर्ण पूर्णपणे विकसित झालेला असतो. त्यामुळे त्याला कोणताही ध्वनी व ध्वनीमुळे पाण्यात निर्माण होणारी कंपने चांगल्या तऱ्हेने ऐकू येऊ शकतात. स्वतः ध्वनी निर्माण करण्याची यंत्रणा त्याच्या शरीरात विकसित झालेली नसते. तरीही विशिष्ट पद्धतीने पंखावर पंख आपटून किंवा पाण्यात शेपटीचा विशिष्ट दिशेने फटका मारून किंवा जबड्यातील हाडांची विशिष्ट तऱ्हेने हालचाल करून मासे आवाज काढू शकतात. ट्यूना मासा हा याला अपवाद म्हणावा लागेल. कारण तो गाणारा मासा म्हणून प्रसिद्ध असून अनेक ठिकाणी पर्यटकांचे आकर्षण ठरला आहे.

हवेच्या पिशवीचा वापर काही जाती ध्वनी उत्पन्न करण्यासाठी करतात. आहिरामध्ये हवेच्या पिशवीतील हवा वायुनलिकेतून जाताना ध्वनी निर्माण होतो असे आढळून आले आहे. त्या लहानपणीच्या गोष्टीत आजोबा जेव्हा आहिराला तोडत होते तेव्हा जो आवाज होत होता त्याचे वर्णन अतिशयोक्त आहे असे गृहित धरले तरी त्याचा संबंध येथे जोडला जाऊ शकतो. काही मासे त्यांच्या प्रजननकालात एकमेकांना आकर्षित करण्यासाठी ध्वनी निर्माण करतात असेही आढळून आलेले आहे.

माशांच्या मनातील भाव-भावनांची देवाण-घेवाण त्यांच्या डोळ्यांनी होत असावी असे मला वाटते. माशांचे डोळे अत्यंत आकर्षक असून भिन्न तऱ्हेच्या भावभावना व्यक्त करण्याचे सामर्थ्य त्यांत असते. काही मासे आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी रंग बदलतात असे आढळून आले आहे तर काही बाबतीत रंगबदल हे माशांच्या वयाच्या वाढीचे निदर्शक असते असेही आढळून आले आहे.

कासवी आपल्या पिलांचा प्रतिपाळ कसा करीत असेल ह्याविषयी ज्ञानेश्वरीत फारच उत्तम विश्लेषण सापडते. आई मुलाला आपल्या कुशीत घेते, पाखरं आपल्या पंखाखाली घेतात, गाय वासराला चाटते, पण कासव हा एक कवचधारी प्राणी असल्यामुळे कासवी आपल्या पिलांवरील प्रेम कसे व्यक्त करीत असेल, हा कोड्यातच टाकणारा प्रश्न आहे. त्यावर ज्ञानेश्वरांनी केलेली मल्लीनाथी बोलकी आहे. ते म्हणतात की आपल्या विलक्षण स्नेहार्द्र डोळ्यांनी ती आपल्या पिलांना प्रेम देत असते. केवळ तिच्या स्नेहाळू नजरेवर तिची पिले बाळसे धरत असतात...

व्हेलचा अपवाद वगळता कासवासह इतर सर्व मासे अंडज प्रकारात मोडत असल्यामुळे इतर माशांच्या डोळ्यांनाही हा नियम लावायला हरकत नाही असे मला वाटते.

माशांचे गंधज्ञान अतिशय तीव्र स्वरुपाचे असते. त्यांना आपल्या भक्ष्याचा फार दूरवरुनही वास येऊ शकतो. डोळे बांधलेला शार्क केवळ वासावरून आपल्या खाद्याकडे झेपावतो असे प्रयोगांती सिद्ध झालेले आहे. नदीचे पाणी आणि विशिष्ट प्रवाहांचे गंधही त्यांना जाणवत असतात. माशाला स्वतंत्रपणे विकसित झालेली जीभ नसते, पण चवीच्या ग्रंथीमुळे त्याला विविध पदार्थांची चव कळते. त्याचे स्पर्शज्ञानही तीव्र स्वरुपाचे असते.

आपण जसे आजारी पडतो तसेच मासेही आजारी पडू शकतात. त्यांच्या अंगावरील रोगप्रतिकारक बळकीचे प्रमाण कमी झाले तर त्यांना बाह्य जीवाणूंचा संसर्ग होऊ शकतो. कॅलिफोर्नियामध्ये तर सस्तन माशांसाठी एक दवाखानाही कार्यरत आहे.

माशांची वाढ कधीही खुंटत नाही. ते मरेपर्यंत वाढत राहतात. काही क्षणांपासून अनेक वर्षांपर्यंत जगणारे व एका औंसापासून शंभर टनांपर्यंत वजनाचे मासे आढळून आले आहेत. १०० फुटांपासून ते अगदी १८०० फुटांपर्यंत खोलवर पाण्यात रहाणारे मासे अस्तित्वात आहेत. जगातील सर्वात पहिला मासा ३६० ते ४०० दशलक्ष वर्षांपूर्वी आढळल्याचे नमूद करण्यात आले आहे.

ह्या विविध प्रकारच्या माशांचे प्रजनन कसे होत असेल हाही एक व्यापक स्वरुपाचा प्रश्न आहे. एखादा अपवाद सोडता सर्व मासे हे अंड्यातून जन्मणारे असल्यामुळे मादी पाण्यात अंडी सोडते आणि नर त्यावर वीर्यसिंचना करतो. त्यामुळे अंडी फलित होऊन मासे जन्मतात, हे त्याचे सोपे शास्त्रीय कारण आहे. परंतु पाण्यामध्ये हजारो प्रकारचे मासे असतात, अन्य जीवजंजूही असतात. शिवाय पाणी सतत वहात असते. असे असताना विशिष्ट जातीच्या माशांची अंडी आणि विशिष्ट जातीच्या माशांचे वीर्य यांचा अचूक संयांग होऊन विशिष्ट जातीतीलच माशांची पैदास कशी काय होते, ह्या प्रश्नाचे उत्तर केवळ ‘चमत्कार!’ असे द्यावे लागेल.

वाहत्या पाण्यामुळे किंवा तत्सम अन्य आपत्तींमुळे अंड्यांचा मोठ्या प्रमाणावर विनाश होणार याची कल्पना असल्यामुळे की काय, मासे कोट्यवधीच्या संख्येने अंडी सोडत असतात. त्या त्या विशिष्ट जातीच्या माशांचे योग्य तेवढे प्रमाण राखले जावे या दृष्टीने आवश्यक तेवढी अंडी फलित होतील याची काळजी निसर्गच घेत असावा असे म्हणावे लागते.

माणसांच्या जगात जेवढे वैचित्र्य आढळते त्याहून अधिक वैचित्र्य माशांच्या जगात आढळून येते. तिलापिया जातीचा मासा आपल्या तोंडातच अंडी उबवतो. त्यातून पिले बाहेर पडेपर्यंत त्याला उपाशी रहावे लागते. तर दुसरा एक मासा स्वतः नर असूनही त्यालाच बाळंत व्हावे लागते. काही मासे आपल्या प्रियेला आकर्षित करण्यासाठी पाणवनस्पती व दगडगोट्यांपासून घरटी तयार करतात. बेट्टा जातीचा मासा तर तोंडाने हवेचे बुडबुडे तयार करुन, एका चिकट द्रवाने ते सांधून बुडबुड्यांचेच घुमटासारखे घर तयार करतो व त्यात माद्यांना आकर्षित करतो. त्याच्या ह्या वास्तुशास्त्राच्या ज्ञानाचे माणसानेही अनुकरण केले असल्याचे आढळते. अनेकांनी पाण्यामध्ये बुडबुड्याच्या आकाराची हॉटेल्स बांधलेली दिसतात ती त्यामुळेच!

समुद्रकाकडी नावाचा मासा आपली आतडी बदलू शकतो, तर डॉक्टरमासा मोठ्या माशांच्या दातात अडकलेले कण, बुरशी, सूक्ष्म जंजू खाऊन जगतो. लचूक नावाचा एक छोटा मासा शार्कच्या पोटाला चिकटून सर्वत्र संचार करीत रहातो आणि शार्कच्या तोंडातून जे अन्नकण सांडतील ते खाऊन आपली उपजीविका करतो. पाल जशी भिंतीला चिकटते त्याच तत्वानुसार त्याच्या डोक्यावर असलेल्या पोकळीच्या साहाय्याने तो शार्कला चिकटून बसतो.

माशांच्या विश्वात आपण जितके खोलात जाऊ तितकी अधिकाधिक आश्चर्यकारक माहिती मिळत जाते. माशांचा पाऊस पडण्याच्या नोंदीही मत्स्येतिहासात आढळून येतात. आकाशातून मासे, बेडूक इत्यादी जलचर पावसाप्रमाणे जमिनीवर कोसळल्याचे प्रकार लोकांनी पाहिले आहेत. प्रचंड वादळामुळे एखाद्या समुद्रातील किंवा जलाशयाच्या पृष्ठभागावरील जलचर हवेत उडून दुसऱ्या ठिकाणी जाऊन पडल्यामुळे हे अघटित घडले आहे.

इतर सर्व सजीव प्राण्यांना स्वतंत्र वीज शोधून काढावी लागली. पण मासे स्वत:ची वीज स्वतः निर्माण करु शकतात. म्हणून त्यांना लिव्हिंग बॅटरी असे म्हटले जाते. इलेक्ट्रिक ईल नावाचा मासा घोड्याला आपटून ठार करु शकेल इतकी वीज निर्माण करु शकतो. अर्थात ही वीज माणसाला घातक नसते. बहुसंख्य माशांमध्ये वीज निर्माण करणारे इंद्रिय असते. खोल पाण्यात राहणारे मासे त्या विजेवर हालचाली करतात, तर काही मासे शत्रूला चकविण्यासाठी किंवा आपल्या भक्ष्याला आकर्षित करण्यासाठी तिचा वापर करुन घेतात.

मासे अप्रतिहतपणे तोंडात पाणी घेतात आणि कल्ल्यांवरुन मागे फेकून देतात. त्यामुळे सर्व माशांचे कल्ले लालबुंद दिसतात. मासेबाजारात जाणारी दर्दी मंडळी कोणताही मासा विकत घेण्यापूर्वी त्याचे कानशील वर करुन बघतात. कल्ले जितके लाल तितका तो मासा ताजा, आणि कल्ले जितके निस्तेज तितका तो शिळा, हे साधे गणित असते. माशांच्या कल्ल्यांवर असंख्य रक्तवाहिन्या असतात. पाण्यात विरघळलेला प्राणवायू त्या शोषून घेतात आणि माशांना चैतन्य देतात. लाखो वर्षांपासून आजतागायत त्यांची ही क्रिया अशीच सुरु आहे.

सृष्टीची निर्मिती झाल्यानंतर जे काही घटक प्रथम निर्माण झाले त्यांत पाणी प्रमुख होते. आजही पृथ्वीचा तीन-चतुर्थांश भाग पाण्याने व्यापलेला आहे. हळूहळू पाण्यात जीव-जंतू निर्माण होऊ लागले व काळाबरोबर विकसित होत गेले. निर्मितीच्या पहिल्या टप्प्यात जलचर प्राण्यांची संख्या अधिक होती. परमेश्वराने मत्स्यावतार घेतला असेल तर तो ह्याच टप्प्यावर घेतला असावा. पाण्यातील जीवसृष्टीला घातक उभयचरांपासून जीवदान देणारा एखादा महाकाय मासा म्हणूनच तो आपली भूमिका रंगवीत असावा. अर्धे शरीर माणसाचे आणि अर्धे माशाचे असणाऱ्या मत्स्यकन्या ही कविकल्पना नाही असे मानले तर त्याही ह्याच टप्प्यातून उत्क्रांत होत गेल्या असतील, आणि मछींद्रनाथनेही ह्याच काळात माशाच्या पोटातून जन्म घेतला असेल असे म्हणावे लागेल.

जलचरांना अभय देण्याची भूमिका परमेश्वर रुपांतरित होऊन करीत असावा असे म्हटले आहे. येथे ‘मनू आणि मासा’ ह्या गोष्टीची अनेकांना आठवण झाल्याशिवाय राहणार नाही. त्या महाभयंकार जलप्रलयाच्या आधी एका माशाने मनूला एक मोठी नाव बांधायला सांगितले होते. जलप्रलयाला सुरूवात झाली तेव्हा मनूने शक्य तेवढे प्राणी, पक्षी आपल्या नावेमध्ये भरून घेतले आणि मग त्या माशाने ती नाव आपल्या शिंगाला बांधून त्या प्रलयातून तारून

नेली... हा मासा म्हणजे देवमासाच असावा आणि त्याला परमेश्वराचा अवतार मानायला काहीही हरकत नाही असे वाटते. आजही डोक्यावर शिंग असणारा नार व्हेल नावाचा मासा अस्तित्वात आहे.

माणूस हा जरी स्वतंत्रपणे विकसित झालेला प्राणी आहे असे आपण मानत असलो तरी त्याचे आदिमत्व माशांशी निगडित आहे यात शंका नाही. पण वर्षानुवर्षांच्या उत्क्रांतीने माणूस आणि मासे ह्यांच्यातील ऋणानुबंधाचे, प्रेमाच्या नात्याचे धागे नष्ट करुन टाकले आणि काळाच्या विराट झंझावातात माणूस आणि मासे ह्यांच्यातील भक्ष्य भक्ष्यक ह्या नव्या नात्याचा जन्म झाला.

येथे शतपथ ब्राह्मणामधील एक संदर्भ आठवतो. मनू नदीत उभा राहून अर्ध्य वहात असताना एक मासा त्याच्या ओंजळीत आला. तो मासा त्याला म्हणाला, : 'बिबृही मां पारयिष्यामी त्वां' मला सोडून दे, मी तुझे कल्याण करीन. आज त्या माशाने दिलेला शब्द सत्य करून दाखवल्याचे दिसते. कारण आज मासेमारी हा माणसाचा फायदेशीर व्यवसाय आणि मत्स्याहार हा प्रमुख आहार झाल्याचे दिसून येत आहे. माणसाला जेव्हा आपल्या पोटासाठी भूमीवरचे अन्न पुरेना तेव्हा त्याने जलसृष्टीकडे नजर वळवली आणि जलचरांनाही आपल्या अन्नाच्या यादीत समाविष्ट करुन टाकले. ह्या बदलाचा इतिहासही शेकडो वर्षांचा आहे.

मोहनजोदारो आणि हरप्पा येथील उत्खननात बंदर, गोदी, नौका, जाळे, गळ इ. चा वापर होत असल्याचे दाखले मिळालेले आहेत, वराहमिहिराच्या सुनेने, मासे असलेल्या तळ्याच्या काठावर भाजीपाल्याची लागवड करावी अशी शिफारस केलेली सापडते. मानसोल्लास ह्या ज्ञानकोशातील मत्स्यविनोद ह्या प्रकरणात मासे जाडजूड कसे करावेत ह्याविषयीची माहिती आलेली आहे. रामायणात राम-लक्ष्मणांनी मासेमारी केल्याचे उल्लेख आहेत. अरण्यकांडाच्या ७४व्या सर्गामध्ये चक्रतुंड नीलवर्ण, स्थूल, कंटकयुक्त अशा प्रकारचे मासे साफ करुन लोखंडाच्या सळीवर भाजून लक्ष्मण तुला खायला देईल असे रामाने सीतेला सांगितल्याचा उल्लेख आहे. रामायणात वांबीचाही उल्लेख करण्यात आला असून, ती रुचकर असल्यामुळे भारतभर प्रिय असल्याचे म्हटले आहे....

कधी कधी असे वाटते की माशांना माणसांशी बोलता आले असते तर किती बरे झाले असते ! आपला सर्व इतिहास त्यांनी स्वत:च माणसासमोर उलगडून ठेवला असता. आपल्या सुख - दुःखाच्या गोष्टी सांगितल्या असत्या. प्रसंगी शिळोप्याच्या गप्पाही मारल्या असत्या. आपले मन कुठेतरी मोकळे करावे असे त्यांना वाटत असेलच. मग अशा वेळी ते काय करत असतील ? अनावर झालेल्या भावनांना कोणत्या ठिकाणी वाट मोकळी करुन देत असतील ? कदाचित नदीशीच ते हितगुज करीत नसतील ना ? नदीच त्यांच्या सुखदुःखाची, आयुष्याची एकमेव आणि खरीखुरी साक्षीदार असते. अशा वेळी ते तिच्याशीच आपलं मन मोकळं करीत असतील ह्यात शंका नाही...

सारे काही त्या गंगामाईलाच ठाऊक आहे असे आई का म्हणायची ते फार उशिरा समजले. तिच्या बोलण्याला एवढा व्यापक अर्थ असेल असे कधी वाटलेच नव्हते. ह्या अर्थप्रत्ययामुळे जाणिवेचा एक नवाच किनारा आता दृष्टिपथात येऊ लागला आहे. माणसाला आपला इतिहास सांगण्यासाठी नदी सदैव आसुसलेली असते, तिच्या काठावरच्या लाटा म्हणजे तिच्या ओठावरचे शब्द असतात हे समजू लागले आहे...

**- प्रल्हाद जाधव**

९९२००७७६२६

pralhadjadhav.one@gmail.com